
अभंग
चिंतन
श्रीगुरुमहिमा
योग आणि नाम

श्री गुलाबरावमहाराजांची अभंग गाथा

यष्टी ९ पूर्वार्ध


३,१५८ अभंगांपैकी १ ते १८३ अभंग

# अभंग चिंतन


| | |
|---|---|
| मंगलाचरण | (१ - १०) |
| सगुण रूप | (११ - ४२) |
| नामपर | (४३ - ८६) |
| संतमहिमा | (८७ - १३२) |
| सद्गूरुमहिमा | (१८४ - २९८) |

**अनुवाद**

**डॉ. कृ मा. घटाटे**










**डी.टी.पी.**

**सौ.स्मिता अनझोडे.**



## मंगलाचरण



१..

सूर्यकोटीसम भासे ज्याची प्रभा । विद्येलागी गाभा चौदाही तो ।।१।।
वंदिताचि भावे विघ्ने निवारिता । ज्यावाचोनि रिता ठाव नाही ।।२।।
सर्व कार्यारंभी जयाचे पूजन । करिताती जन जीवेभावे ।।३।।
तो मज निर्विघ्न करो या कार्यासी । श्रीकृष्णचर्येसी वर्णावया ।।४।।
ज्ञानेश्वरप्रभु आणि गजानन । न पाहूचि भिन्न कोणे काळी ।।५।।

**चिंतन :-**

श्रीगणेशा, आपली प्रभा म्हणजे कोटीसूर्यांसम सर्वत्र पसरलेला प्रकाश.
आपण चौदाही विद्यांचा मूळ गाभा.
आपणास प्रेमभावाने वंदन करीताच आपण सर्व विघ्नांचे निवारण करणारे.
आपणावाचून पूर्ण ब्रह्मांडात रिकामा ठाव नाही.
सर्व कार्यांच्या आरंभी सर्वजण जीवाभावाने आपलेच पूजन करतात.
हे गजानना,
श्रीकृष्णचरित्र वर्णन करण्याच्या माझ्या या कार्याला निर्विघ्न पूर्ण करा.
ज्ञानेश्वरप्रभो आणि हे गजानना आपण दोघे एकरूप असल्याचे आम्ही जाणतो. नमोस्तु ते.

* मंगलाचरण करताना श्री गुलाबराव महाराजांनी परंपरेप्रमाणे गणपतीची स्तुती केली. त्यांचे उपास्य असलेल्या ज्ञानदेवांची आणि श्रीगणेशाची एकरूपता कायम ठेवली आणि गणेशाच्या मंगलाचरणाची पूर्तता श्रीगुरूस्मरणाने केली.

२

## अति भायशाली विद्या

(आधपद)

तोचि सुलग्न सुदिन । तोचि नक्षत्रादि गण।
ताराशशिबल पूर्ण । हरिस्मरण सर्वदा ।।१।।
तेचि दैवरूपी विद्या । तेथे आटे विपरीत विद्या ।
तया नमो परम आद्या । वेदवंद्या व्यापका ।।२।।
षष्ठी नवमी भद्रायुक्त । वैधृति व्यतिपात ।
विष्कुंभादिक समस्त । मंगळ होत हरिनामे ।।३।।

रमा राहे ज्याचे चरणी । तोचि माझे अंतःकरणी ।
ज्ञानेश्वराची नंदिनी । मंगळ चरणी वाहियली ।।४।।

चिंतन :-

शुभनक्षत्रादि गण, ताराबळ व चंद्रबळ इत्यादिंनी परिपूर्ण असलेला उत्तम मुहूर्त म्हणजे सुलग्न असलेला मंगल दिवस कोणता म्हणावयाचा?

हरिनाम स्मरणयुक्त दिवस हाच सर्वोत्तम मुहूर्त होय.

अचानक दैवयोगाने मिळणारी भाग्यशाली विद्या म्हणजेच नामस्मरण.

हिच्या योगाने विपरीत ज्ञान म्हणजे ब्रह्म नसून जग आहे, असा समज नाहीसा होतो.

तो सगुण स्मरणीय भगवान् सर्व विश्व उत्पन्न करणारा आदिकारण आहे.

वेदांना वंदनीय आहे.

आत-बाहेर सर्वत्र व्यापून आहे.

षष्ठी, नवमी, भद्रा, वैधृति, व्यतिपात, विष्कुंभ वगैरे सर्व अमंगल करणारे योग हरीचे स्मरण केले असता त्यांचे अमांगल्य जाते. ते मंगलकारक होतात.

लक्ष्मी ज्याची चरणसेवा करते तोच माझ्या अन्तःकरणातही आहे.

मी ज्ञानेश्वरांची नंदिनी आहे. मी स्वतःलाच हरिचरणावर ओवाळून टाकले आहे.

३

येई येई मंगलधामा । मंगल मुनिविश्रामा ।।१।।
जे कां कीर्तनासी येती । करी मंगल त्यांप्रती ।।२।।
श्रोत्या वक्तिया मंगल । देव मंगल मंगल ।।३।।
चिंती ज्ञानेश्वरपाय । सर्वाभूती मंगल होय ।।४।।

चिंतन :-

सर्व मांगल्याचे कोठार असलेल्या भगवंता तू ये.

तू मुनींच्या विश्रामाचे मंगलस्थान आहेस.

जे किर्तनाला येतील त्यांचे तू मंगल कर.

श्रोत्यांचे आणि वक्त्याचे मंगल होवो.

देवा तू केवळ मंगलस्वरूप आहेस.

श्रीज्ञानेश्वरांच्या चरणांचे चिंतन केले की,

सर्व चराचर भूतमात्रांचे मंगल होते.

## ४. . .ज्ञानेश्वर म्हणा वाणी

मंगळ मंगळ । गुरुचरणकमळ ।।१।।
पाहता सुंदरपण । जीवे करा निंबलोण ।।२।।
झणी लागेल का दृष्टी । कळवळा म्हणुनी पोटी ।।३।
तुम्हां जननीउदरी । स्वामी होत अवतारी ।।४।।
मग आम्ही करू सेवा । पायी वाहोनिया जीवा ।।५।।
ऐसी इच्छा धरा मनी । ज्ञानेश्वर म्हणा वाणी ।।६।।(यष्टि९पू.पान १)

चिंतन :-

श्रीगुरूंचे चरणकमळ अतीशय मंगल आहेत.
त्यांचे सुंदरपण पाहून त्यावरून जीवरूपी मीठलिंबू ओवाळून टाका.
कारण त्या सुंदर चरणांना माझ्या जीवभावाचीच दीठ लागेल की काय, असे पोटी कळवळून येते.
आपणासारख्या जननीच्या उदरी स्वामी श्रीकृष्ण अवतरतात.
ते अवतरले की आम्ही त्यांच्या पायी जीवेभावे वाहून घेवू.
सदासर्वदा त्यांची सेवा करीत राहवे अशी मनामध्ये इच्छा करतो.
यासाठी चहूं वार्णीनी ज्ञानेश्वरांचे स्मरण करू या.

## ५

उमानाथ गायी वाचे । फिटे पारणे जीवाचे ।।१।।
कृपादृष्टि जयाचिया । तारी आपण जीवा या ।।२।।
सर्व मंगळ मंगळ । त्रिलोचन जाश्वनीळ ।।३।।
ज्ञानेश्वररूपे मज । भेटी द्यावी काशीराज ।।४।।

चिंतन :-

हे वाणी, उमानाथांचे गायन कर.
जीवनाचे सार्थक होईल.
आतापावेतो अनंत जन्मात केलेल्या तपांची पूर्ती होईल.
संकल्प पूर्ण सफल होईल.
अन् या परमार्थ यात्रेचे पारणे फिटेल.
त्याची कृपादृष्टी जीवाचा आपणहून उद्धार  करील.
सर्वात मोठे मांगल्याचे कोठार त्रिलोचन शंकरच आहेत.

हे काशीराजा, तुम्ही ज्ञानेश्वरांच्या रूपानेच मला भेट द्या.
गुरुरूपाने शंकर असले तरी महाराजांना ओढ आहे ती श्रीज्ञानेश्वरांची.
म्हणूनच ते आग्रह करतात -
हे शंकरा, ज्ञानेश्वरांचे रूपाने दर्शन द्या पाहू.

६

मंगळ ज्ञानेश्वरकृपा । मंगळ भक्तिमार्ग सोपा ।
मंगळचि अनुतापा । समर्पण जयाचे ।।१।।
मंगळ लग्न कन्यादान । मंगळ माथां करसंधान।
मंगळ श्रीहरीचे ध्यान । रूप सगुण सुंदर ।।२।।
मंगळ नंदजीची राणी । मंगळ गौळ्यांच्या कामिनी।
मंगळ मूर्ति वृंदावनी । तेही नयनी देखिली ।।३।।
मंगळ अवघे गोकुळ । मंगळ रासक्रीडा-खेळ ।
सर्वांहूनी मंगळ-बळ । ज्ञानेश्वर कृपाळ ।।४।।

चिंतन :-
ज्ञानेश्वरमाऊलींची कृपा अती मंगल करणारी आहे.
भक्तिमार्ग सोपा आणि मंगल आहे.
अनुतापाने तप्त होऊन स्वतःला समर्पण करणे मंगल आहे.
माऊलीने कन्यादान करून माथ्यावर कर ठेवला हेहि मंगल आहे.
सगुण सुंदर रूपाचे ध्यान करणे मंगल आहे.
नंदराणी यशोदा, गौळ्यांच्या कामिनी गोपिका मंगल आहेत.
वृंदावनातील अत्यंत मंगल असलेली श्रीकृष्ण मूर्ति मी डोळ्यांनी पाहिली.
आणि लक्षात आले की, अवघे गोकुळ मंगल आहे.
रासक्रीडेचा खेळ मंगल आहे.
परंतु -
या सर्वाहून मंगल करणारे अमोघ बळ कोणात आहे तर ते माझ्या कृपाळू ज्ञानेश्वरमाऊलींचे ठिकाणी आहे.
श्री महाराजांचे प्रेम श्रीकृष्णावर आहे परंतु हे अलोट प्रेम ज्यांच्या कृपेने मिळाले ते श्रीज्ञानेश्वर महाराज सर्वाहून बलवान आहेत. हे त्यांच्या अन्तःकरणातून कधीहि विसरले जात नाही. उलट संपुटी जपाप्रमाणे महाराजांच्या अन्तःकरणातल्या सर्व वृत्ती असतात. म्हणजे -

आधी माऊलीचे वात्सल्य. नंतर श्रीकृष्णाचे पतिप्रेम आणि पुनः माऊलीचे वात्सल्य - या प्रकारे त्यांची कृष्णभक्ती ज्ञानेश्वरमाऊलीच्या प्रेमाच्या संपुटीत साठविलेली असते.

७

मंगळ स्मरता पाय । देह मंगल हा होय ।।१।।
इतर जी कां साधने । अमंगळ देवाविणे ।।२।।
रूप सगुण सावळे । तेचि मंगळ सोवळे ।।३।।
शुद्ध भक्तिमार्ग सोपा । शुद्ध ज्ञानेश्वरकृपा ।।४।।

चिंतन :-

अत्यंत प्रेमाने भगवंताच्या चरणांचे स्मरण केले असता आपला अमंगल देह सुद्धा मंगल होऊन जातो.

सगुण भगवंताच्या ध्यानाशिवाय इतर सर्व साधने अमंगलच होत.

सगुण सावळे रूप हेच खरे सोवळे मंगल आहे.

हा भक्तिमार्ग शुद्ध आहे आणि सोपा आहे.

या भक्तिमार्गाची प्राप्ति होणे, हे शुद्ध ज्ञानेश्वरकृपेवर अवलंबून आहे.

आशय :-

भगवंताच्या ध्यानाने आपला देह सुद्धा ब्रह्मरूप होऊन जातो.

ब्रह्मरूप काया होतसे कीर्तनी । (श्रीतुकाराम महाराज) म्हणजे भगवंताचा देह जसा अनध्यस्तविवर्त म्हणजे मायागुणरहित शुद्धब्रह्म आहे. तसाच भक्ताचा देहहि अनध्यस्तविवर्त होतो.

८

मंगळ हे पाय हृदयी चिंतिता । संसाराची व्यथा सुटे सर्व ।।१।।
मंगळ हे नाम मंगळ हे रूप । मंगळ संकल्प स्मरणाचा ।।२।।
मंगळ हे ध्यान मंगळ चिंतन । मंगळ गायन चौ अक्षरी ।।३।।
मंगळ चरण मंगलाचरण । ज्ञानेश्वर पूर्ण मायबाप ।।४।।

चिंतन :-

ज्ञानेश्वरमाऊलीचे मंगल चरणांचे हृदयात चिंतन केले की संसारातील सर्व व्यथा सुटून जातात माऊलीचे नाम मंगल आहे, रूप मंगल आहे. मी त्यांचे स्मरण करीन असा संकल्प जरी केला तरी तोही मंगल आहे.

माऊलीचे ध्यान करणे, चिंतन करणे किंवा ज्ञानेश्वर या चार अक्षरी मंत्राचे गायन करणे हे सर्व मंगल आहे.

माऊलीच्या चरणाच्या स्मरणापासून त्यांचेसाठी केलेले सर्व काही आचरण, अथपासून इतिपर्यंत मंगल आहे. असे हे ज्ञानेश्वर महाराज परिपूर्ण आहेत आणि माझे मायबाप आहेत.

आशय :-

संसारातील व्यथा दूर होण्यासाठी महाराजांनी माऊलीचे चिंतन - स्मरण - ध्यान - गायन करण्याचा मार्ग सांगितला आहे.

९

**एकचित्त समर्पण । करू मंगलाचरण ।।१।।**
**ऐसे म्हणावया काही । मज अधिकार नाही ।।२।।**
**मन ठायीचे चंचळ । माझे नायकेचि पळ ।।३।।**
**परी एक भरंवसा । नाम तुझे श्रीनिवासा ।।४।।**
**नित्य मंगळ मंगळ । आन आघवे ओंगळ ।**
**आळंदीच्या नाथा । नांवें उडी घाली आता ।।६।।**

चिंतन :-

चित्त एकाग्र करून, ते तुला समर्पण करून मग मंगलाचरण करतो, असे म्हणावयाला मला अधिकार नाही.

कारण माझे मन मुळातच चंचल आहे. एक क्षणभर देखील माझे ऐकत नाही. पण श्रीनिवासा, तुझे नाम नित्य मंगलस्वरूप आहे आणि बाकी सर्वकाही ओंगळ आहे - हा एक मला पूर्ण विश्वास आहे. हे आळंदीच्या नाथा तुझ्या नावासाठी (मी तुझे नाम घेतल्यामुळे) मला या संसार समुद्रातून वाचविण्यासाठी उडी घे.

आशय

मन एकाग्र करून नामस्मरण करणे जास्त श्रेष्ठ आहे पण जरी मन पूर्णपणे एकाग्र झाले नाही तरी केवळ बाह्यनामस्मरणाने (एकाग्र करण्याचा प्रयत्न करीत) पापनाशन होते आणि सतत नामस्मरणाचा प्रयत्न करीत राहिले असता हळू हळू ते एकाग्रही होऊ लागते. आणि शेवटी भगवंत नामधारकाचा उद्धार करतातच.

१०

**सकळ मंगळ श्रीहरीचे नाम । इच्छिले ते काम पुरतील ।।१।।**
**नवमी षष्ठी भद्रा हो का व्यतिपात । जपता श्रीनाथ उत्तम ते ।।२।।**
**उदंड मुहूर्ते साधियेली कोटी । कृष्णावीण पोटी सौख्य नाही ।।३।।**
**ज्ञानेश्वरप्रभु उपाध्या सुजाण । श्रीकृष्णस्मरण मुहूर्त दे ।।४।।**

**चिंतन :-**

**सर्वात मंगल श्रीहरीचे नाम हेच आहे. इच्छा कराल त्या कामना नामस्मरणाने पूर्ण होतील? नवमी, षष्ठि, भद्रा, व्यतिपात हे कुमुहूर्त देखील नामजपाने उत्तम सुमुहूर्त होऊन जातात. कोट्यावधि खूप मुहूर्ते जरी साधली तरी भगवान कृष्णाशिवाय खरे सुख कसे मिळणार? ज्ञानेश्वरप्रभू हेच खरे ज्ञानी उपाध्याय आहेत आणि म्हणूनच त्यांनी श्रीकृष्ण स्मरणाचा उत्तम मुहूर्त काढून दिला आहे.**

**आशय कितीहि विपरीत काळ असो त्याला अनुकूल करण्याचे साधन एकच आहे आणि ते म्हणजे भगवंताचे सतत स्मरण करणे - नामजप करीत राहणे. असे केल्यानेच सर्व कुमुहूर्त देखील सुशोभन सुमुहूर्त होतात.**



# २

# सगुण रूप

## ११ / बाल रामरूप

**शरयूतीरी राम कौसल्येचे बाळ । दिसे घननीळ मेघतनू ।।१।।**
**चिमण्या पादुका चिमणा पितांबर । चिमणे तोडर गजरे वाकी ।।२।।(य९पू.२)**
**चिमणी मेखळा चिमणे धनुबाण । चिमणे कंकण हातातील ।।३।।**
**चिमणे बाजुबंद चिमण्या मुक्तमाळा । चिमणा चिमणा गळा सुनीळ तो ।।४।।**
**चिमणी हनुवटी चिमण्या दंतपक्ति । चिमणी सरस्वती जिव्हा माता ।।५।।**
**चिमणे नासिक चिमणे नयन । चिमणे ते कान कुंडलादि ।।६।।**
**चिमण्या भोवया चिमणे चंदन । चिमणा तिलक जाण मृगमद ।।७।।**
**कुरळ अलकावलि चिमणा मुकुट । चिमणा मणि स्पष्ट भानुतेज ।।८।।**
**भरतशत्रुघ्नसह लक्षुमण । पुढे हनुमान सीता अंकी ।।९।।**

ऐसा माझा पिता देवकार्या आला । तो आम्ही देखिला शरयूतटी ।।१०।।

चिंतन :-

शरयूनदीचे तीरावर कौसल्यातेचा बाळ म्हणजे रामचंद्र घननीळ असून मेघ हेच जणु तनुरूपाने आहे. असा हा चिमणा म्हणजे लहानगा राम कसा दिसतो याचे वर्णन आहे.

असा हा चिमुकला रामचंद्र असला तरी लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न आणि हनुमान , सीता सारेचजण त्या चिमुकल्या रूपासोबत चिमुकले होऊन महाराजांना दिसताहेत.

महाराज म्हणतात - त्या रामाबरोबर खेळू आणि रामरूपात मिळून जाऊ - अन् हे कशामुळे होईल तर ज्ञानदेवांच्या कृपेने!

## १२ / श्रीकृष्णरूप

भक्तभजनाची आस । भूमिवरी करी वास ।।१।।
वैकुंठीचे राहणार । वेद जयाचे किंकर ।।२।।
ब्रह्म सत्यज्ञानानंत । सगुण सर्व शक्तिमंत ।।३।।
ज्ञानेश्वररूपे डोळा । हृदयी देखिला सांवळा ।।४।।

चिंतन :-

भक्तजनांची ओढ असल्याने भगवान कृष्ण भूमीवर दिसतो.

वैकुंठात राहणारे वेद हे ज्याचे सेवक आहेत असे ब्रह्म, हे सत्तारूप, ज्ञानरूप आणि आनंदरूप (अनंत- कधीहि नाश न पावणारे) आहे.

ते सगुण आहे. सर्व शक्तिसहित आहे.

ते सावळे साकार परब्रह्म ज्ञानेश्वररूपाने मी माझ्या हृदयात पाहिले.

भक्तप्रेमाने साकार होणारे शुद्ध ब्रह्मच भक्तांना अनुभूत असते.

## १३

परमानंद मनी । हरी देखिला नयनी ।।१।।
रूप सांवळे चिद्ग्रंथी । पाहता तुटे अहंग्रंथी ।।२।।
सर्व शास्त्रांचे माहेर । रूप गोपीमनोहर ।।३।।
नाम मुखामाजी आले । रूप हृदयी राहिले ।।४।।
दीनानाथ ज्ञानेश्वर । माथां दिला कृपाकर ।।५।।

**चिंतन :-**

**अन्तरात परमानंद आणि बाहेर नयनापुढे सगुण श्रीहरी.**
**चैतन्याचा गाभा असलेले सावळे रूप पाहताक्षणी अहंकाराची निरगांठ तुटून पडली..**
**गोपींचे मन हरण करणारे हे हरिरूप हे सर्व शास्त्रांचे माहेर आहे.**
**येथूनच सर्व शास्त्रे निर्माण झाली आहेत.**
**नाम मुखाने घेतां क्षणी ते रूप हृदयातही दिसू लागते.**
**आम्हां दीनांचे नाथ ज्ञानदेव आहेत.**
**त्यांनी माथ्यावर कृपेचा हस्त ठेवला. आणि**
**सगुण श्रीहरीचा साक्षात्कार होताच अहंता पूर्ण नाहीशी झाली.**
**....**
**निर्गुण ब्रह्म सर्व शास्त्रांचे उगमस्थान राहू शकत नाही.**
**भगवंताच्या मुखातून ॐकार आणि नंतर वेद निर्माण होतात आणि त्यातूनच नंतर सर्व शास्त्रे निर्माण होतात म्हणून सगुण रूपाला सर्व शास्त्रांचे माहेर असं बिरूद महाराजांनी लावले आहे.**

**१४ (आधपद)**

**मोतियांचा हार गळा । आणि वैजयंती माळा ।**
**हरि पाहावया डोळा । कळवळा अंतरी ।।१।।**
**गाई चारी यमुनातीरी । खेळे हमामा हुंबरी ।**
**मोही गोकुळीच्या नारि । पूतनारि सांवळा ।।२।।**
**वेद वर्णिताचि स्तब्ध । हारपले सर्व शब्द ।**
**म्हणोनिया वेणुनाद । मुग्धाबंध आवरी ।।३।।**
**मयूरपिच्छ शिरी । ध्याती विधि त्रिपुरारी ।**
**तो हा गोकुळी श्रीहरी । आला ज्ञानेश्वरकृपे ।।४।।**

**चिंतन :-**

**गळ्यात मोतियांचा हार आणि वैजयंती माळ असलेला श्रीहरी डोळ्यांनी पाहण्यासाठी अंतरात ओढ निर्माण झाली आणि मी इथं आली.**
**पहाते तों काय -**
**पुतनेला मारणारा सावळा श्रीहरी यमुनेतीरी गायी चारत आहे.**
**हमामा, हुंबरी खेळत आहे.**
**गोकुळींच्या गोपकन्यांना मोहवीत आहे.**

याचे वेदांनी वर्णन केले खरे, पण त्याला पाहतांच ते वेद स्वतःच स्तब्ध होऊन गेले, आपणच मौनावले.
जणुंकाय वेदांची सारी शब्दसंपदा हारवली.
हे कृष्णा, कोवळ्या गोपकुमारींना प्रेमबंधनात अडकवणारा,
तो तुझा वेणुनाद आवरता घे.
मयुरपिच्छाने शोभत असलेल्या गोपीवल्लभा तुझे ब्रह्मदेव आणि शंकरादी ध्यान करतात.
असा तो श्रीहरी ज्ञानेश्वरांच्या कृपेमुळे गोकुळात आला आहे.
चला-चला, आपण आपल्या प्राणप्रियाचे दर्शन घेऊ.

१५

हा तो डोळियांचा डोळा । चहू पाळा दिसत ।।१।।
दृष्टि सामोरी सामोरी । रूप हेरी सावळे ।।२।।
देखे ते ते नारायण । निर्धारण निजचित्ती ।।३।।
आम्हा अलकावतीराये । निजपाय दाविले ।।४।। (य९पू३)

चिंतन :-
हा सगुण भगवान डोळ्यांनाही पाहणारा डोळा आहे,
म्हणजे- मी पाहत आहे, या पाहण्यालाहि तो पहात आहे.
म्हणजे साक्षी आहे.
हा आत असलेला साक्षीच सगुणसाकाराचं लेणं लेउन बाहेरहि
चहुंदिशी नटलेला दिसत आहे.
पाहण्याच्या वृत्तिसमोर सांवळे कृष्णरूप पहात आहे. दृष्टी जशी जशी पुढे पुढे पाहू लागते तशी तशी ती दृष्टी सावळया रूपालाच पाहते.
जे जे दिसते ते ते सर्व नारायण आहे, हीच पक्की धारणा चित्तात रूजली आहे.
अलकावतीराय ज्ञानेशांनी आम्हाला स्वतःचे चरण दाविले आणि वरील सोहळा भोगावयास मिळाला.
आतील साक्षी असलेले आत्मरूपच बाहेरही हरीरूपाने दिसू लागले.

१६ / ज्ञानेश पंचायतन

सुंदर ते ध्यान इंद्रायणीतीरी । सावळी गोजिरी मूर्ति मध्ये ।।१।।
पांडुरंगकर तयाचे आसन । सामोरे निधान निवृत्तिराज ।।२।।

सोपान मुक्ताबाई शोभती आणीक । नारदादि लोक पूजिताती ।।३।।
हृदयीचे गुह्य उमटले आता । अंतर्बाह्य चित्ता समभाव ।।४।।
ज्ञानेश्वर तात आणि कृष्ण पति । सौभाग्यसंपत्ति नित्य मज ।।५।।

चिंतन :-

इंद्रायणीतीरी ज्ञानदेवांचे ध्यानातले सुंदर रूप दिसत आहे.
सर्वांच्या मधोमध सावळी गोजिरवाणी मूर्ती विराजमान आहे.
पांडुरंगाने करकमलावर ज्ञानेशांना घेतले आहे.
विठोबाचे हात हेच माउलीचे आसन आहे.
समोर कल्याणनिधान गुरूराज निवृत्तिनाथ आहेत.
माझ्या हृदयातील मानसपुजेतील गूढभाव बाहेर साकारला आहे.
हृदयाचे आत आणि बाहेर दोहीकडे ब्रह्मभावच दाटून राहिला आहे.
पिता म्हणून ज्ञानेश्वरमहाराज आणि पति म्हणून श्रीकृष्ण,
ही माझी सौभाग्यसंपत्ति आहे आणि ती कमी होणारी नाही.
अखंड आहे. नित्यनूतन आहे.
श्री ज्ञानेश्वरताताची मानसपूजा करताना -
श्री पांडुरंग, निवृत्तिनाथ, सोपान, मुक्ताबाई, नारदादि प्रभृति पुजेत सहभही.ागी असतातच.
महाराजांची सौभाग्य संपत्ति म्हणजे ज्ञानेश्वरतात आणि कृष्णपति हीच होय.

१७

जया ध्यानी मनी चिंतिताती मुनि । वेगळे होऊनी विषयांसी ।।१।।
तो हा नारायण आला नंदघरा । धरुनी अवतारा दिव्यरूप ।।२।।
सच्चितसुखतनु जयाची सुंदर । अनध्यस्तमात्र विवर्त जो ।।३।।
जयालागी नित्य वंदिताती ज्ञानी । दहर-स्मरणी चिंतिताती ।।४।।
ज्ञानेश्वरकृपे कांत गोपिकांचा । सज्जन डोळ्यांचा विषय झाला ।।५।।

चिंतन :-

विषयांपासून दूर होऊन मुनिजन ज्याचं ध्यान करतात ज्याचं चिंतन करतात. तो भगवान नारायण दिव्यरूप घेऊन नंदाचे घरी अवतरला.

सत् चित् आनंदघन असे ज्याचे शरीर आहे आणि जो केवळ शुद्ध अनध्यस्तविवर्त आहे. त्या

श्रीहरीला ज्ञानी नित्य वंदन करतात.
हृदयात स्मरण करून त्याचेच चिंतन करतात.
ज्ञानेश्वरमाऊलीच्या कृपेने, गोपिकांचा कांत हाच संतसज्जनांना डोळ्यांनी पाहता येईल असा साकार झाला आहे.

१८

आजिचिये दिनी । नवल देखिले लोचनी ।।१।।
योगियांचे समाधान । शूलपाणीचे जे ध्यान ।।२।।
ते हे खेळे वृंदावनी । सवे नाना गवळणी ।।३।।
ज्ञानेश्वर दिनानाथ । आशा आघवी पुरवीत ।।४।।

चिंतन :-
आज डोळ्यांनी नवल पाहिलं.
जेथे योग्यांची समाधी साधिली जाते,
शूलपाणी शंकर ज्याचे ध्यान करतात
तेच हे रूप वृंदावनात खेळत आहे.
सभोवती गवळिणींचा मेळा आहे.
माझी परम मंगल रासोत्सव पाहण्याची मनीषा पूर्ण झाली.
माझे ज्ञानेश्वर दीनांचे नाथ आहेत.
ते माझी सर्व आशा पुरवितात.
त्यांच्या कृपाप्रसादानेच हा परममंगल दिन दृष्यपथाला आला.
योग्यांचे निर्गुण स्वरूप हे गोकुळात साकार होऊन अवतरले.
आणि ह्याची देही ह्याची डोळां म्यां ते पाहिले.

१९

जयाते वर्णितां लाजती निगम । तो हा मेघश्याम मायेपुढे ।।१।।
जयाच्या अंगुष्ठी वाहे मंदाकिनी । पायांवरी न्हाणी माय तया ।।२।।
जाणे शुभाशुभ सकळांचे गुणी । तयाची गाऱ्हाणी देती गोपी ।।३।।
ज्ञानेश्वर गडी पूर्ण ब्रह्मचारी । तो हा व्यभिचारी प्रेमवशे ।।४।।

चिंतन :-
जयाचे वर्णन करताना वेदांनाहि संकोच वाटतो, तो मेघःशाम आईने पुढ्यात मांडीवर घेतला

आहे.

ज्याच्या आंगठ्यापासून सर्वांना पावन करणारी गंगा निघाली आहे त्याला पायावर घेऊन यशोदामाता न्हाऊ घालते आहे.

जो सर्वांचे शुभाशुभ कर्मे जाणे त्याचीच गाऱ्हाणी गोपी यशोदेला सांगत आहेत.

ज्ञानेश्वरमहाराज पूर्ण ब्रह्मचारी आहेत खरे पण तेच गोपीच्या भक्तिप्रेमामुळे श्रीकृष्णरूपाने व्यभिचारी झाले आहेत.

वात्सल्य रसातून महाराज शेवटी माधुर्य भावात पोहोचतातच त्याचे हे उदाहरण आहे.

२०

रूप सुंदर सांवळे । पाहुनिया गर्व गळे ।।१।।
ब्रीद बांधले चरणी । निववाया दासजनी ।।२।।
माळ वैजयंती गळां । भाळी मृगमद टिळा ।।३।।
स्वामी आळंदीवल्लभ । कांत सुनीळ सुलभ ।।४।।

चिंतन :-

सुंदर सावळे रूप पाहून सौंदर्याचा गर्व गळून जातो.

सेवकांचा ताप हरण करण्याचे चरणी ब्रीद बांधले आहे.

गळ्यात वैजयंति माळा आहे. कपाळावर कस्तुरीचा टिळा लावला आहे.

माझ्या स्वामी आळंदीवल्लभांनी निळासावळा पती मला सुलभ करून दिला आहे.

ज्ञानेश्वरांच्या म्हणजे श्रीगुरूंच्या कृपेने श्रीहरी पतिरूपाने प्राप्त होतो.

२१

देखियेला डोळा । निज ब्रह्मींचा सोहळा ।।१।।
रूप सांवळे सुंदर । दास-मानस-मंदिर ।।२।।
ओवाळावे कोटी काम । सर्व कल्याण जे धाम ।।३।।
म्हणे ज्ञानेश्वरबाळा । आलिंगावे वेळोवेळा ।।४।।

चिंतन :-

मीच ब्रह्म आहे या अनुभवाचा साकार सोहळा म्हणजे तू भगवान श्रीकृष्ण. तुला मी डोळ्याने पाहिले.

दासाच्या मानसरूपी मंदिरात तुझे सावळे सुंदर रूप वास करते.

अशा सर्व कल्याणाचे निवासस्थान असलेल्या तुजवरून कोट्यावधि म्हणजे सर्व कामना ओवाळून दूर टाकाव्यात. हे श्रीकृष्णा, मला ज्ञानेश्वरांच्या कन्येला वेळोवेळी आलिंगन दे.

**आशय :-**

आत्मस्वरूपच बाहेर सगुण रूपाने व्यक्त होते.

## २२ / रामाचे ध्यान

सुंदर ते ध्यान हृदयकमळी । सगुण सांवळी मूर्ति शोभे ।।१।।
निवाला शंकर गातां प्रेमभरे । ते नाम सोपेरे तारी जीवा ।।२।।
नाही वेदशास्त्री गति नामावीण । बोलती निर्वाण महंतही ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या नाम तेचि रूप । ध्यान कुळदीप अयोध्येशू ।।४।।

**चिंतन :-**

हृदय कमळातील ध्यान अतिशय सुंदर आहे. सगुण सावळी मूर्ति हृदयात शोभत आहे. भगवान शंकरांनी प्रेमाने नामाचे गायन केले आणि त्याने त्यांचा दाह शांत झाला. आणि तेच नाम सर्व जीवांना तारून नेते. नामस्मरणाशिवाय उद्धाराचा मार्ग नाही असे वेदशास्त्रात आहे. मोठे मोठे सत्पुरूषहि साधनांचा शेवट नामातच होतो असे बोलतात.

ज्ञानेश्वरकन्याहि म्हणते की नाम आणि रूप एकच आहे. आणि भक्तांच्या कुळातील दीप अयोध्येचा राजराम आहे.

रूपाचे ध्यान आणि नामाचा जप हेच सर्व साधनांमध्ये सर्व श्रेष्ठ आहे.

## २३ / आळंदीवल्लभा

कवणाचे वानी । तुज म्हणो चक्रपाणी ।।१।।
आडळीला डोळा । तुजसम तूं सांवळा ।।२।।
रमाकांता भगवंता । दीनबंधो कृपावंता ।।३।।
आळंदीवल्लभा । प्रेमसंपन्नसुलभा ।।४।।

**चिंतन :-**

हे चक्रपाणी तुला कोणासारखे म्हणावे. कोणासारखेच म्हणता येत नाही.

तू इतका आगळा वेगळा सुंदर आहेस की माझा डोळा तुझे ठिकाणी जो अडकला तों तेथून हटतच नाही.

तुझ्यासारखा तू आहेस - हेच म्हणावं लागतं.

रमाकान्ता, भगवंता, कृपावंता दीनबंधो आळंदीवल्लभा तू प्रेमसंपन्नांनाच सुलभ आहे.

तू अतुलनीय आहेस आणि प्रेमसंपन्न असलेल्यांनाच तू प्राप्त होऊ शकतोस.

## २४ / नृसिंहध्यान

सुंदर ते ध्यान प्रल्हादासमीप । हिरण्यकश्यप विदारोनी ।।१।।
भक्ताचिये हांके पावला कृपाळ । स्तंभ दोन्ही फाळ करोनिया ।।२।।
अभक्तांसी भय भक्तांते निर्भय । नित्य सुखमय ब्रह्मतनू ।।३।।
लडिवाळ प्रेमे झाले एकवट । श्रीआळंदीपीठनिवासी जे ।।४।।

चिंतन :-

हिरण्यकशिपूचे विदारण केल्यावर प्रल्हादाजवळचे नरसिंहाचे ध्यान अतिशय सुरेख होते.
खांबाचे दोन तुकडे करून कृपाळू भगवान प्रल्हादाचे हांकेसरशी त्याला प्राप्त झाला.
अभक्ताला भय वाटणारे आणि भक्ताला नित्य सुखमय आणि ब्रह्मरूप असल्याने निर्भय वाटणारे ते नरसिंहाचे रूप वात्सल्यप्रेमाने प्रल्हादाला मांडीवर घेऊन एकवट झालेले - आलिंगन दिलेले ते भगवद्रूप माझ्या आळंदीवल्लभाचेच आहे.
भगवंताचे कोणतेहि रूप असो, महाराजांचे तात मात गुरु श्रीज्ञानेश्वर महाराज त्या त्या वेगवेगळ्या रूपाने नटतात आणि प्रेमाचे विविध भाव महाराजांच्या अन्तःकरणात व्यक्त होतात.
नानाविध भासणारी एकविध भक्ती ही अशी असते.

## २५ / ज्ञानेश्वरांचे ध्यान

तुझी एक आशा लागलीया मना । नावडे कामना आन काही ।।१।।
सोळा वरूषाची मूर्ति गोजिरवाणी । पाहावी लोचनी वाटे माये ।।२।।
आज येवोनिया दिवस मंगळ । हृदय उजळ करा स्वामी ।।३।।
आळंदीवल्लभा गुणदोष माझे । न पाहता साजे तैसे करा ।।४।।

चिंतन :-

मनाला तुझी एकान्तिक ओढ लागली की दुसरी कोणती कामना पूर्ण करावी अशी आवडच राहत नाही.
तुझी सोळा वर्षांची गोजिरवाणी मूर्ति डोळ्यांनी पाहावी असे वाटते.
आजचा दिवस मंगल आहे, तुम्ही या आणि माझे हृदय उजळून टाका
आळंदीवल्लभा माझे गुणदोष पाहू नका आणि तुम्हाला साजेल असे करा. म्हणजे हृदयात लवकर या.
श्री ज्ञानेश्वर दर्शनाची ओढ लागली असता मनाची होत असलेली तळमळ या अभंगात व्यक्त झाली आहे.

## २६ / श्रीकृष्णवर्णन

रूप कोवळे कोवळे । राहे अग्रसूक्ष्म मेळे ।।१।।
रूप कोवळे कोवळे । पाहुनी उन्मीलती डोळे ।।२।।
रूप कोवळे कोवळे । चुंबन घ्यावे वाटे बळे ।।३।।
रूप कोवळे कोवळे । ज्ञानेश्वर कृपे कळे ।।४।।

चिंतन :-

भगवान श्रीकृष्णाचे रूप अगदी कोवळे आहे. ते पुढे जेव्हा दिसते तेव्हा सूक्ष्म अशा पंचतन्मात्रापेक्षाहि सूक्ष्म परमाणुपासून जणु बनलेले आहे असा अनुभव येतो. ते पुढे दिसल्यावर त्याचं प्रेमाने चुंबन घ्यावेसे वाटते. आणि असं कोमल रूप ज्ञानदेवांची कृपा होते तेव्हांच कळतं आणि त्याचा अनुभव येतो.

## २७

सकळहि सुख माझे वृंदावनी । देखिले लोचनी नंदसुनू ।।१।।
सकळ गौळिणी जया समभाव । देऊनिया खेव आनंदती ।।२।।
डोळियांचा डोळा उघडिली दृष्टि । लाधले शेवटी पाय त्यांचे ।।३।।
ज्ञानेश्वरकृपा वचन उघड । जाहले सुघड कृष्णपत्नी ।।४।।

चिंतन :-

नंदाचा पुत्र श्रीकृष्ण हेच माझे सर्वसुख आहे. ते मी माझ्या डोळ्यांनी वृंदावनात पाहिलं. सर्व गोपी ज्याला ब्रह्मभावाने आलिंगन देतात आणि आनंद घेतात तो डोळ्यांचा डोळा आहे. डोळ्याला पाहण्याची शक्ती देणारा तो आहे. असा हा डोळ्याचा डोळा मला मिळाला आणि त्यामुळे शेवटी मला भगवंताचे पाय लाभले.

ज्ञानेश्वरांच्या स्पष्ट कृपावचनाने (वाग्दत्त) मी उत्तम रीतीने कृष्णपत्नी झाले.

## २८

सकळ आनंदा एक अधिष्ठान । सुंदर लोचन दृष्टी उभे ।।१।।(य९पू५)
आंगे सुकुमार बोलणे कोमळ । जवळ प्रेमळ गोपी उभ्या ।।२।।
ऐसे पाहोनिया सगुण हे ध्यान । जीवे निंबलोण उतरावे ।।३।।
ज्ञानेश्वरप्रभु मंत्रचि हा स्पष्ट । उभा की प्रगट डोळ्यापुढे ।।४।।

चिंतन :-

सकळ आनंदाला एकच आधार आहे. तो हा सुंदर डोळे असलेला श्रीकृष्ण पुढे उभा आहे.

सुकुमार अंग आहे. बोलणे अत्यंत मृदू आहे. जवळ प्रेमळ गोपी उभ्या आहेत. असं हे सगुण ध्यान पाहून जीवाचं निंबलोण उतरून जीवपणा ओवाळून टाकावा असं वाटतं.
ज्ञानेश्वरांचे नाम हा एक मंत्रच श्रीहरीला डोळ्यापुढे प्रकट करून साक्षात् उभा करतो.

२९

सुंदर ते ध्यान मायमांडीवरी । सावळी गोजिरी मूर्ति शोभे ।।१।।
कोमळ उमर रसभरी प्रेमा । उदय उगमा निका केला ।।२।।
करी वेणुवाद्य गळां वैजयंती । भोवती जयंती विजयाने ।।३।।
मुखामध्ये श्वेत नवनीत गोळा । ज्ञानेश्वरबाळा प्रसादेच्छी ।।४।।

चिंतन :-

बाळ कृष्ण यशोदा आईच्या मांडीवर सुरेख दिसत आहे.
सावळी गोजिरी मूर्ति शोभायमान झालेली आहे.
अगदी कोवळं वय आणि वात्सल्य रसाने भरलेले प्रेम उमटले आहे.
हातामध्ये सुरेल बासरी आहे.
गळ्यात वैजयंती माळा आहे.
मुखामध्ये शुभ्र लोण्याचा गोळा आहे.
अशा भगवान श्रीकृष्णाचा प्रसाद मला मिळो, अशी ज्ञानेश्वराची बाळा इच्छा करीत करीत आहे.

३०

डोळा पाहिल्याचे सुख । तनू सांवळी सुरेख ।।१।।
राधेसह गोजिरवाणी । कारवे वेत्र वेणुपवाणी ।।२।।
मखे पाहतांचि निळे । ब्रह्म आकारले नवे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्येसाठी । कान्तमूर्ति ही गोमटी ।।४।।

चिंतन :-

डोळ्यांनी पाहिली सुरेख सावळी तनू (देह) आणि सुख झाले. ही सुरेख गोजीरवाणी मूर्ति राधेसह असून काखेत काठी आहे आणि हातात बासरी आहे.
हिला पाहताच मनाचे संकल्प विकल्प विरून जातात. आणि परब्रह्माला नित्य नवनवीन आकार आल्याचे जाणवते.

ज्ञानेश्वर कन्येसाठी ही गोमटी प्रियकर कान्ताची मूर्ति साकारली आहे.

### ३१

सुंदर ते ध्यान मायमांडीवरी । मूर्ति ही गोजिरी श्यामतनु ।।१।।
खेळताचि हाती लोण्याचा कवळू । ब्रह्मगर्भगोळु सच्चित्सुख ।।२।।
दृष्टिलागी शांति होय सावकाश । समाधी कळस भक्तीमाजी ।।३।।
शत्रुमित्रां दोही सम मुक्तिदाता । सर्व हरी चिन्ता भवजाळ ।।४।।
नामरूपग्रासे अस्ति-भाति-प्रिय । सांपडले पाय प्रत्यक्ष ते ।।५।।
ज्ञानेश्वरकृपा वोळली आगळी । हृदयावेगळी मूर्ति नोहे ।।६।।

चिंतन :-

शामस्वरूप गोपाळकृष्णाची गोजिरवाणी मूर्ति आईच्या मांडीवर बसली आहे हेच आमचे ध्यान आहे.

मांडीवर बसून खेळत आहे. हातात लोण्याचा घास आहे. अन् हा घास सत् चित् आनंद असा ब्रह्माच्या गर्भासारखा मृदू आहे.

त्याला पाहिल्याबरोबर मन सावकाश शांत होते आणि नंतर

समाधीच्या सुखाचा कळस भक्तिमध्ये होतो. हा सगुण भगवान् शत्रु व मित्राला सारखीच मुक्ती देतो आणि संसार जाळ्यात गुरफटून जाण्याची सर्व चिंता हरण करतो.

भगवंताच्या सगुण साकार हरिरूपाने म्हणजे श्रीहरीच्या नामरूपांनी अस्ति (सत्) भक्ती (चित्) प्रिय (आनंद) यांची जाणीवच नाहीशी होते. हे सर्व सगुण रूपात एकवटून जातात.

भक्तीमध्ये समाधीची पराकाष्ठा म्हणजे कळस होतो. त्यात सच्चिदानंद हे तिन्ही अंश एकवटतात. त्यांची जाणीवही नाहिशी होते. अन् हे सर्व माऊलीच्या कृपेने होते. आणि या पराभक्तीचे आलंबन श्रीहरीचे रूप हृदयातून केव्हाच दूर जात नाही.

### ३२ शिवध्यान

जीव माझा कासावीस । दृढ आस पायाची ।।१।।
केव्हां पाहीन मी डोळां । शिव भोळा सद्गुरु ।।२।।
जटेमाजी जन्हुसुता । उमा माता अर्धांगी ।।३।।
उरी उरगांच्या माळा । गळा निळा सुंदर ।।४।।

गुरू ज्ञानेश्वरताता । कृष्णकांता आळवी ।।५।।

चिंतन :-

माझा जीव पायाची दृढ ओढ लागल्यामुळे कासावीस झाला आहे.
माझ्या सद्गुरु भोळा शंकराला मी केव्हा पाहीन बरे !
शिवाच्या मस्तकावरील केसांच्या जटेत गंगा आहे, अर्ध्या मांडीवर उमामाता बसली आहे, गळ्यात सर्पांच्या माळा घातल्या आहेत. आणि त्यांचा गळा सुरेख निळा दिसत आहे.
हेच गुरू सदाशिव म्हणजेच माझे ज्ञानेश्वर पिता आहेत. त्यांना मी कृष्णपत्नी आळवीत आहे.
शिव आणि ज्ञानेश्वर महाराजांना एकरूपाने पाहून त्यांचे ध्यान करीत आहे.

३३

आजि माझे पुण्य फळले साजणी । देखिले आंगणी नारायण ।।१।।
अनंत जन्माची सांपडली ठेव । चैतन्य सावेव पुढे उभे ।।२।।
नाकळे ते ध्यातां योगियांचे ध्यानी । तो हा चक्रपाणि डोळा दिसे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या पाहोनी विस्मय । जाहली निर्भय भवावीषी ।।४।।

चिंतन :-

हे सखी, आज माझे पुण्यं फळाला आले.
माझ्या आंगणात आज मी नारायणाला पाहिले.
अनंत जन्मात शोधूनहि जी ठेव सांपडली नाही ती आज सांपडली.
निखळ चैतन्य साकार होऊन पुढे उभे ठाकले आहे.
योग्यांच्या ध्यान करूनहि ध्यानात जे लवकर येत नाही ते श्रीकृष्णरूपाने डोळ्यापुढे दिसत आहे.
ज्ञानेश्वरकन्येने ते पाहिले आणि ती विस्मित झाली. आणि संसाराविषयी एकदम निर्भय होऊन गेली.

३४

मूर्ति सांवळी गोजिरी । चला पाहू डोळेभरी ।।१।।
चिरोनियां पोट । आत बैसवूं वैकुंठ ।।२।।
प्रेमभावे लागू पाया । निंबलोण करू काया ।।३।।
सोडूं भोगमोक्ष-आस । होऊ ज्ञानेश्वरदास ।।४।।

चिंतन :-

श्रीहरीची गोजिरवाणी सावळी मूर्ति डोळे भरून पहावयाला जाऊ.
दुसरीकडे जाण्याऐवजी आपल्या अन्तरंगात वैकुंठाचा अनुभव घेऊ.

तेथे श्रीहरीच्या पाया पडू आणि हे शरीर निंबलोण करून ओवाळून टाकू.
विषयभोगांची आशा आणि मोक्षाचीहि आशा सोडून ज्ञानेश्वरांचे दास होऊ.
संसार नको आणि मोक्षहि नको ज्ञानेश्वरांची -गुरुमाऊलीची सेवा करण्याचे भाग्य मिळाले म्हणजे ते सर्व श्रेष्ठ आहे.

३५

सोनियाचा दिन आज उगवला । हृदयी देखिला यदुनाथ ।।१।।
ज्ञानध्यान सारे जाहले पांगळे । पाहतां सांवळे डोळेभरी ।।२।।
नारीनर झाले नारायणरूप । आळंदीचा भूप सर्वाठायी ।।३।।

चिंतन :-
आज सोन्याचा दिवस उगवला.
हृदयात भगवंताला पाहिले.
सावळ्या कृष्णाला हृदयात डोळे भरून पाहताक्षणी
ब्रह्मज्ञान आणि ध्यानाचे सर्व प्रयत्न संपले.
स्त्रीपुरुष सर्वजण नारायणरूप आहेत असे अनुभवाला आले.
नारायण म्हणजेच आळंदी राजे ज्ञानेश्वरमहाराज सर्व ठायी दिसूं लागले.

३६ मोहरी अभंग / हिंदी-मराठी

मोहनकी छबी देखोरी सजनी । दिसतसे खाणी प्रेममय ।।१।।
पीककलरव वेणु जिसे लियो । जहां तहां गयो सहितामा ।।२।।
खांदेपर राखे गोपीनको चीर । स्मरतांचि थोर मिळे शांती ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या बोले मृदुबाणी । ध्यावो चक्रपाणी हृदयमां ।।४।।

चिंतन :-
मनाचे मोहन करणाऱ्या श्रीकृष्णाचे रूप, हे सखी तू पहा. ते रूप म्हणजे प्रेमाने भरलेली खाण आहे.
मोरांच्या सुरेल स्वराप्रमाणे असलेली बासरी हातात घेऊन भगवान इकडे तिकडे सर्वत्र विहार करीत आहेत. त्यांच्या खांद्यावर ऐका गोपीचे वस्त्र शोभत आहे. अशा रूपाचे स्मरण करताच अशांत झालेले मन शांत होते. ज्ञानेश्वर कन्या कोमल वाणीने सर्वांना उपदेश करतात, की अशा श्रीकृष्णाच्या सुरेख रूपाला आपल्या हृदयात ध्यान करून कायमचे धारण करा.

## ३७ / भक्ती : व्यतिरेक व अन्वय

वेदाचे रहस्य देखियेले डोळा । हृदयी सांवळा व्यापक हा ।।१।।
व्यतिरेके एक अखंड हृदयी । अन्वये ते ठायी विश्वभरी ।।२।।
ज्ञानेश्वरकन्या रुप पाहोनिया । स्वये झाली मायाविरहित ।।३।।

चिंतन :-

वेदाचे रहस्य म्हणजे परब्रह्म मी डोळ्यांनी पाहिले. ते म्हणजे हृदयात ज्याचा अनुभव घेतला ते श्रीकृष्णाचे सगुण सावळे रूप मर्यादित दिसले तरी व्यापकच आहे. असा अनुभव आला. व्यतिरेकाने अनुभव घेतला तर ते हृदयात अखंड दिसते आणि अन्वयाने त्याचा अनुभव घेतला तर सर्व विश्वात भरलेले दिसते. ज्ञानेश्वरकन्येने ते रूप पाहिले आणि ती माया (अज्ञान) विरहित झाली.

मर्यादित दिसणारे सगुण भगवंताचे रूप हेच व्यापक आहे.

## ३८ / योग काकीमुख

काकीमुख एक उघडले वाटे । न दिसे मनाते बाह्य भाग ।।१।।
आरुढोनि मग पवनमस्तकी । धरुनी हस्तकी पुष्पहार ।।२।।
प्रकाशांधकारा जाहली आटणी । पाहताती मुनी चैतन्य हे ।।३।।
ते हे सनातन देखिले लोचनी । खेळत आंगणी नंदाचिया ।।४।।
नाचतां वाजती वाकी रुणुझुणू । नखी कोट्यतनु * ओवाळावे ।।५।।
ज्ञानेश्वरकृपे सबाह्य अंतरी । ओळखिल्या हरी ब्रह्मानंद ।।६।।
(* कोट्यतनू = कोटी + अतनू = कोट्यावधि मदन)

चिंतन :-

जिभेच्या मुळाशी काकी मुख असते. योगसाधना केल्याने त्यातून अमृत स्त्राव होत असतो. आत आणि बाहेर हा दोनपणा जाऊन केवळ आत्मस्वरूपाचाच अनुभव येतो. ते वेळी श्रीकृष्णाचे बालरूप खेळत असताना दिसते.

प्रकाश आणि अंधःकार दोन्ही नाहीसे होतात. आणि मुनी आत्मस्वरूपाचा अनुभव घेतात.

तेच आत्मस्वरूप सनातन आहे. तेच डोळ्यांनी पाहिल्या जाते.

नंदांच्या आंगणात खेळत असलेले ते बालरूप नाचत बागडताना दिसते.

त्याच्या पायातील बाकी रुणुझुणू आवाज करीत आहेत असा अनुभव येतो.

अशा भगवंताच्या पाऊलाच्या नखावरून आपली कोटी शरीरे ओवाळून टाकावीत असे वाटते.

ज्ञानदेवाच्या कृपेने तो सगुण श्रीहरी आत बाहेर आहे असे ओळखले की, ब्रह्मानंद मिळाला असे

समजावे.

३९

आजिचा सुदिन देखिले लोचनी । अक्षय मोचनी सादर जे ।।१।।
अधरी मुरली वाजवी मंजुळ । नाशी अमंगळ त्रैलोक्याचे ।।२।।
मिळोनियां चला वंदू तया पाया । ओवाळूनि काया चारि सांडू ।।३।।
ज्ञानेश्वरप्रभु सहाय्य घेवोनी । रहावे होवोनी कृष्णमय ।।४।। (य९पू७)

चिंतन :-

नेहमी मुक्तिदेण्यासाठी तयार असलेले सगुण ब्रह्म आज डोळ्यांनी पाहिले - म्हणून आज सुदिन आहे.

ओठात मुरली ठेवून व मंजुळ स्वर वाजवितो आणि त्रैलोक्याचे अमांगल्य नाहिसे करतो.

आपण सर्व मिळून त्याचे चरण वंदन करू आणि चारी देह ओवाळून टाकू.

श्रीगुरू ज्ञानदेवांचे साह्य घेऊन आपण कृष्णमय होऊन राहावे हेच खरे.

सगुण साक्षात्कारात चारहि देहांचा निरास होतो.

४०

परम मोहक तुझे हे सुगुण । ऐकोनिया मन पिसे होय ।।१।।
त्रैलोक्यसुंदर सुकुमार मूर्ति । सत्त्वाची हे वृत्ति रुपो पाहे ।।२।।
वाहोनिया जीव जावे आलिंगनी । हृदयशिराणी तेव्हा फिटे ।।३।।
ज्ञानेश्वरस्वामी सोयरा सज्जन । दाखवी निधान डोळ्यांपुढे ।।४।।

चिंतन :-

अत्यंत मोहविणारे हे तुझे चांगले गुणवर्णन ऐकले की मन वेडे होते.

त्रैलोक्यात सर्वात सुंदर आणि सुकुमार अशा तुझ्या मूर्तीला माझ्या सात्विक वृत्ति आलिंगन देतात तेव्हा त्याहि तुला रुततात.

जीव तुला वाहून टाकावा जीवत्व सोडून द्यावे आणि तुला आलिंगन द्यावे म्हणजे हृदयातील तळमळ (शिराणी) फिटते.

ज्ञानेश्वरस्वामीं हेच खरे सज्जन आणि आप्त आहेत आणि तेच सगुण भगवद्रूप आपल्या डोळ्यापूढे आणून ठेवतात.

माझ्या प्रियकराला सात्विक वृत्ति देखील खुपतात असे वाटून भक्ताला अत्यंत दुःख होतं. पण प्रेम अधिकाधिक वाढत जातं.

## ४१ / शिवध्यान

सुंदर ते ध्यान कैलासशिखरी । वामांकी सुंदरी हैमवती ।।१।।
अत्रिसुत माथा जटेत जान्हवी । नेत्री नवीनवी वह्निज्वाला ।।२।।
गळां फणिमाळा । विभूतिभूषण । शोभे शुभ्रवर्ण नीलकंठ ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या संप्रदायेश्वरा । हृदयी दातारा प्रगटावे ।।४।।

चिंतन :-

श्रीगुरु शंकर हे नाथसंप्रदायाचे आदिगुरु. ते कैलासपर्वतावरील शिखरावर डाव्या मांडीवर हिमालयाची कन्या पार्वती हिला घेऊन बसले आहेत हेच माझे ध्यान आहे.

अत्रिऋषींचा पुत्र म्हणजे चंद्र ज्यांच्या कपाळावर शोभत आहे, जटेत गंगा आहे. तिसऱ्या नेत्रातून (भक्तांच्या ठिकाणी असलेल्या कामविकाराला जाळणारी) अग्निज्वाळा नव्यानव्याने दिसत आहे.

गळ्यात सर्पाचे भूषण, अंगाला भस्माचे भूषण शोभत आहेत.

आंग सर्व शुभ्र आणि गळाच तेव्हढा निळा अशी शोभा आहे.

संप्रदायाच्या आदिनाथा श्रीगुरो तुम्ही ज्ञानेश्वरकन्याच्या हृदयात प्रगट व्हावे हीच आर्त.

..............................

संप्रदायेश्वर श्री भगवान् शंकराचे ध्यान या अभंगात सुरेख आले आहे

## ४२. पैंजणाचा नाद

पायात पैंजण वाजताती वाळे । त्या नादे रसाळे विश्व स्तब्ध ।।१।।
अनाहत नाद लाजे योगियांचा । घोष तपियांचा तटस्थचि ।।२।।
निकट हृदयी आणिक पालोडे । देखिले नवाडे अनुदानी ।।३।।
आळंदीवल्लभ पाहुनी सुंदर । निवाले अंतर साजणीये ।।४।।

चिंतन :-

श्रीहरीच्या पायातील पैंजण आणि वाळे रासक्रीडेत मधुरनाद करू लागले की सारे विश्व त्या रसमुग्ध करणाऱ्या नादाने स्तब्ध होऊन जाते.

योग्यांना ऐकू येणारा अनाहत नाद, तप करणाऱ्यांचा (आम्ही तपस्वी आहोत हा) घोष तटस्थ होऊन जातात आणि पैंजणांचा नाद ऐकतात.

अत्यंत जवळ म्हणजे कुठे तर हृदयात - ते सुद्धा कसे तर झांकून असलेले असे श्रीहरीचे नित्यनवीन रूप पाहिले.

श्रीकृष्णाच्या रूपाने आळंदीवल्लभांना पाहून हे सखे माझे हृदयातील गाहीला झाला.



# ३. नाम संकीर्तन

## ४३ / हरिकथा

संसार हा नाही आधीच तो कोठे । विवेचन खोटे त्याविषीचे ।।१।।
ब्रह्म तंव आहे सर्वत्र समान । त्याचे विवेचन काय व्यर्थ ।।२।।
परी जे असोनी प्रकट न वाटे । तयाते गोमटे विवरावे ।।३।।
पूर्वी होती आता प्रकट न दिसे । ऐसी गुप्त असे हरिकथा ।।४।।
मंथोनिया तेचि काढावी बाहेरी । तेथेचि वैखरी झिजवावी ।।५।।
ज्ञानेश्वरप्रभुमुखे उपदेश । कथाप्रेमरस पीत जावा ।।६।।

**चिंतन :-**

संसार हा पूर्वीपासून कोठेच नाही त्यामुळे त्याबद्दलचे सर्व विवेचन खोटेच राहणार आहे.
ब्रह्माचे विवेचन म्हणाल तर तेही व्यर्थ आहे. कारण ते सर्वत्र समान आहे.
पण जे अस्तित्वात आहे पण प्रगट नाही त्याचे विवरण करणे योग्य.
हरिकथा ही मात्र पूर्वी प्रगट होती पण आता लुप्त झालेली दिसते.
तिला प्रगट करावी आणि आपल्या कथन कराव्यात. आपली वाणी इतरत्र व झिजवता तेथेच झिजवावी.
ज्ञानेश्वरांच्या मुखातून निघालेला उपदेश आणि हरिकथेचा रस प्राशन करीत जावा.
हरिकथेच्या गुणानुवादात वाणी झिजवावी आणि आपल्या आयुष्याचे सार्थक करावे.

## ४४ / कथा व ज्ञान

कथा-ज्ञानामध्ये कोणते अद्वैत । प्रत्यक्ष निश्चित पाहू आता ।।१।।
ज्ञान ते केवळ पंडिता आवडे । मूढासी रोकडे कळेना की ।।२।।
म्हणोनिया द्वैत ब्रह्मज्ञानी वाटे । परिच्छेद थाटे वस्तूचा की ।।३।।
विषयी-मुमुक्षु-मुक्ता हरिकथा । समान सर्वथा गोड वाटे ।।४।।
मूढा-पंडितासी कथा वाटे गोड । नाही अवघड मार्गही हा ।।५।।
म्हणोनिया हरिकथाचि अद्वैत । भावान्ती सिद्धांत ऐसा झाला ।।(य९पू८)

वेदान्त तो वाद भावात समाधी । शेखी ऐक्यबुद्धि प्रेममेळे ।।७।।
वेदान्त उपदेश भावात भावना । सगुणोपासना दोही ठायी ।।८।।
वेदान्त तो गुरु भावात तो आत्मा । सगुण परमात्मा दोही ठायी ।।९।।
गुरू आणि शिष्य एकरूप अर्थ । गर्भभाव सार्थ हाचि एक ।।१०।।
परी भेद आहे एवढाचि वाटे । शिष्याचिया वाटे गुरु न ये ।।११।।
गुरुचिया पोटी शिष्य होय लीन । भेदचि हा जाण अभेद की ।।१२।।
ज्ञानेश्वरप्रभुमुखे उपदेश । प्रतीतीचा अंश दाखविला ।।१३।।

चिंतन :-

कथाकीर्तन आणि ज्ञान यात खरे अद्वैत कोठे आहे ते आता आपण प्रत्यक्ष पाहू.
ज्ञान हे केवळ पंडित लोकांना आवडते, सामान्य मूढ लोकांना मात्र ते कळतहि नाही.
म्हणून ब्रह्मज्ञानच ज्ञान व अज्ञानी यांना वेगवेगळे करते. त्यामुळे ब्रह्मवस्तू विभागली जात नाही काय?
विषयी असो, मुमुक्षू असो, की मुक्त असो. सर्वांना हरिकथा सर्वथा सारखीच गोड वाटते.
म्हणून हा हरिकथेचा मार्ग सोपा आहे. कठीण नाही.
म्हणून हरिकथा ऐकणे हेच खरे अद्वैत आहे. भक्तिभावात अद्वैत साधते -
स्वतःला विसरले जाते - म्हणून ज्ञानात अद्वैत नसून भावात अद्वैत आहे.
वेदान्त ही शाब्दिक कसरत असून भावनेच्या बळावर समाधीचा अनुभव येतो. शेवटी प्रेमामुळेच ऐक्यबुद्धी होते.
वेदानतात उपदेश असतो तर भावात प्रेमभावना प्रधान असते. आणि सगुणाची उपासना दोन्ही ठिकाणी असते.
वेदान्त हा गुरुउपदेश असून, प्रेमात आत्म्याचा अनुभव आहे.
सगुण परमात्मा, गुरुरूपाने, कृष्णरूपाने, दोन्ही ठिकाणी सारस्वाद आहे.
गुरु आणि शिष्य हे दोन वाटले तरी त्यांचा अर्थ एकच आहे.
दोघेही प्रेमात एकरूप होऊन जातात. खरा गर्भितार्थ हाच आहे.
फक्त भेद आहे. एवढे फक्त वाटते.
गुरुंच्या पोटी शिष्य लीन होतो हा भेद वाटला तरी खरा अभेदच आहे.
ज्ञानेश्वरप्रभूंच्या मुखातील उपदेशाने हा अनुभवाचा अंश व्यक्त झाला.

### ४५ / नामोपासना

तीव्र अग्नीवीण न पेटे पर्वत । वरील गवत बीजासह ।।१।।

तैसे मुखी नाम जंव तीव्र नाही । तंव हा विदेही न होय की ।।२।।
पाकासी उशीर उगी उतावेळ । करिता जवळ तृप्ति न ये ।।३।।
जैसी उतावळी तैसी पाकत्वरा । तेव्हा तृप्तिथारा शीघ्र मिळे ।।४।।
तैसे नामी मंद सुखी उतावेळ । शुष्क तळमळ दुःख देई ।।५।।
उतावळी जैसी तैसे नाम तीव्र । जपता साचार सुख नित्य ।।६।।
तीव्र स्मरणाने जरी न आनंद । पश्चिमे मार्तंड उदयेल ।।७।।
ताट वाढणे हे जननीचे काम । ग्रासहि सप्रेम घाली मुखी ।।८।।
परी ते गिळिले पाहिजे बाळास । तेव्हांचि तृप्तीस पावेल ते ।।९।।
तैसे सच्चित्सुख आणि हरिनाम । अनुभवधाम देती गुरु ।।१०।।
मग त्यांचे तीव्र शिष्याने करावे । अर्धक्षणी व्हावे हरिरूप ।।११।।
ज्ञानेश्वरकन्या हातावरी हात । ठेवोनी सांगत सुख नामी ।।१२।।

चिंतन :-

जोरदार वडवाग्नी पेटल्याशिवाय गवताच्या बीजासह पर्वत पेटत नसतो.

जोपर्यंत अखंड आणि तीव्र प्रेमाने नामस्मरण होऊ लागत नाही. तोपर्यंत देहाचे विस्मरण होऊन विदेह मुक्ती प्राप्त होत नाही.

स्वयंपाकाला उशीर करायचा आणि लवकर जेवण पाहिजे असे म्हणावयाचे याने काही तृप्ती होत नाही.

भुकेने उतावीळ असले तर स्वयंपाक लवकर करायला पाहिजे. तरच भुकेची तृप्ती लवकर होऊ शकते.

नामस्मरण मंदगतीने करायचे आणि ब्रह्मसुखाची उतावीळ करायची असे केल्यास ती कोरडी तळमळ राहते त्याने दुःखच होते.

जशी उतावीळ तसे तीव्र या नामस्मरण केले तर ब्रह्मसुख नित्य मिळणार.

तीव्र नामस्मरणाने जर आनंद मिळणार नसेल तर पश्चिमेला सूर्य उगवला असे म्हणावे लागेल.

ताट वाढणे, घांस तोंडात प्रेमाने खाऊ घालणे हे आईचे काम आहे पण -

लेकुराने ते स्वतःच गिळिले पाहिजे तेव्हाच बाळाची तृप्ती होईल ना.

त्याप्रमाणे सत् चित् आनंद असा निर्गुणाचा अनुभव आणि भक्तीने हरिनामाचे स्मरणाचा अनुभव श्रीगुरु कृपाळू होऊन देतात.

असे गुरुंनी दिल्याबरोबर शिष्याने नामस्मरणाला तीव्रता आणावी आणि त्या अर्ध्या क्षणात हरिरूप व्हावे.

ज्ञानेश्वरकन्या हातावर वचन देऊन सांगते की नामाने खरे ब्रह्मसुख मिळते यांत संशयच नको.

नामस्मरणाने विदेहमुक्ती, सदेह सच्चिदानंदरूप होता येते.

# ३
# नाम आणि योग

४६...८६

................................................................................

## ४६ / नामात अष्टांगयोग

योगाची अष्टांगे नामीच मिळती । नाम ते वेदान्ती मिश्रीत की ।।१।।
नाम घेता वाचे इंद्रियविस्मृति । या नांव बोलती यम भक्त ।।२।।
नामामध्ये शुद्धि तोष आणि दया । हरिभक्तराया नियम हा ।।३।।
नाम घेता देह स्तब्धहि होऊन । भक्तासी आसन हेचि नित्य ।।४।।
नाम घेता कंठ होतसे सद्गद । श्वास तोही बंद पडे तेव्हा ।।५।।
हेचि हरिभक्ता प्राणसंयमन । कुंभकादि जाण एका काळी ।।६।।
नाम घेता वाचे मनासी आकळ । प्रत्याहारबळ हरिभक्ता ।।७।।
नाम घेता वाणी-मनाते एकाग्र । भक्तासी प्रकार धारणा हा ।।८।।
नामे श्रीहरीचा होय आविर्भाव । हरिभक्ता ठाव हेचि ध्यान ।।९।। य९पू९
हरिसंगे पडे सकळ विसर । समाधि साचार संप्रज्ञात ।।१०।।
गुरु कृपे हरीसांगाते खेळणे । सर्वत्र पाहणे गुरुमाय ।।११।।
गुरु हरीमाजी नाही काही भेद । स्वये झाला सिद्ध गुरु भक्ती ।।१२।।
शिष्य तोचि हरि गुरु तोचि नंद । प्रेमांत प्रसिद्ध गोपीरूप ।।१३।।
हाचि निर्विकल्प समाधीचा ठेवा । परी तीव्र व्हावा नामवेग ।।१४।।
नव्हे हे रुपक नव्हे सन्निवेश । पहाता प्रत्यक्ष प्रतीति हे ।।१५।।
योगाचे हे गुह्य ज्ञानेश्वरपाय । तेथे भक्तिमाय नेवो आम्हां ।।१६।।

**चिंतन :-**

अष्टांगयोग नामस्मरणानेच प्राप्त होतो. पण ते नाम वेदान्त तत्व ज्ञानाने युक्त पाहिजे. वाणीने नाम घेतले की इंद्रियांची विस्मृति होते - म्हणून भक्त त्याला यम म्हणतात.

नामानेच अन्तःकरणाची शुद्धी होते, संतोष प्राप्त होतो आणि सर्वाभूती दया निर्माण होते - हाच हरिभक्तांना नियम होय.
नाम स्मरताना देह निश्चळ स्तब्ध होऊन जातो तेच भक्ताचे आसन होय.
नाम घेताना कंठ सद्‌गदित होतो, श्वास बंद पडतो - हाच भक्ताचा प्राणायाम होय. कुंभक वगैरे यातच साधले जातात.
नाम घेताना मनाला आकळले जाते, तोच प्रत्याहार होय.
नाम घेताना मन वाणी एकाग्र होते - हीच भक्ताची धारणा होय.
नामाने हरी समोर प्रकट होतात - हरिभक्तांचे ध्यान हेच होय.
हरीच्या सान्निध्याने सर्वांचा विसर पडतो - हीच संप्रज्ञात समाधि होय.
गुरुच्या कृपेने हरिबरोबर क्रीडा केली जाते आणि त्यामुळे सर्वत्र गुरुमाऊलीचा अनुभव येतो.
गुरु आणि हरी यातील भेद नाहीसा होतो - गुरुभक्तीने तो सिद्ध होतो.
शिष्य हाच स्वतः हरिरूप होतो आणि गुरु नंदरूपाने म्हणजे पिता रूपाने होतात. आणि प्रेमाची उत्कटता वाढली की भक्त गोपीरूप होतो.
निर्विकल्प समाधीचा ठेवा हाच आहे पण ही स्थिती नाम स्मरणाचा वेग तीव्र झाल्याने प्राप्त होते.
हे रूपक नाही किंवा सन्निवेशही नाही - हा प्रत्यक्ष अनुभव आहे.
सर्व योगाचे गुह्य जे आहेत ते ज्ञानदेवाचे चरण आहेत.
भक्तिमाऊलीने आम्हाला तेथपर्यंत पोहवून द्यावे हीच प्रार्थना!
भक्तीतील नाम स्मरणाने योगाचे पूर्ण स्वरूप अनुभवाला कसे येते हे श्रीमहाराजांनी स्पष्ट विस्ताराने सांगितले आहे.

## ४७ / योगातील कष्ट

योगामाजी जरी तीव्र प्राणायाम । नव्हे तरी काम सिद्धी नोहे ।।१।।
नाक दाबोनिया इंद्रियासी कष्ट । आणिक ती स्पष्ट तीव्रापेक्षा ।।२।।
पुनः प्राणायाम सोडतसे जेव्हा । धांवतसे तेव्हा भोगी चित्त ।।३।।
इतुक्या दुःखाते कोण मूर्ख घेई । कृपे गुरू-आई भेटलीया ।।४।।
इतुके करोनी न भेटे तो हरी । शेखी वनांतरी जाणे जागे ।।५।।
घरी हडहड वनी भूकचिंता । मठाची सर्वथा आसक्ति की ।।६।।
ऐशा बंधनाते बळे उरावरी । कोण मूढ तरी घेईल हो ।।७।।
इतुकेचि तीव्र नामी होता श्रम । तरी मेघःशाम पुढे नाचे ।।८।।

म्हणोनिया आता कोणी काही करु । आमुचा निर्धारु नामी एक्या ।।९।।
ज्ञानदेव हेचि चहूं अक्षरांचे । हरिनाम साचे वाटे आम्हां ।।१०।।

चिंतनः-
योगामध्ये प्राणायाम तीव्र केला तरी इच्छित वस्तू प्राप्त होत नाही.
नाक दाबून इंद्रियांना कष्ट होतात आणि विषयांची इच्छाही तीव्र होते.
प्राणायाम सुटला की पुनः पुनः भोगामध्ये चित्त गुंतले जाते.
योग पूर्ण साधत नसल्याचे दु:ख सतत सलत राहते.
महद्भाग्याने कृपाळू श्रीगुरु भेटतांच योगातील सारे दु:ख संपून जाते.
योसाधनेत इतके कष्ट करूनही श्रीहरीचे दर्शन होत नसते, वनातच जावे लागते.
घरी राहून साधना करतो म्हटले तर गोंधळ.
वनात गेले तर काय खावे, याची चिंता.
मठ करून राहिले तर मठाची आसक्ती.
अशा अडचणीतून- आता काय करावे? या संभ्रमात सापडलेला किंकर्तव्यमूढ देखील अशी संसारात गुंतवणारी बंधने स्वत:वर कशाला लादून घेईल ?
योगा इतके सारे कष्ट नामस्मरणासाठी घेतले तर मागेपुढे सर्व ठिकाणी रासातील मेघ:श्याम नृत्य करताना दिसू लागतो.
नारायण घरीच येऊन भेटतो. अन्नवस्त्रांचीही कमी नसते.
आणि संसारात राहूनच मोक्ष मिळतो तर सद्गुरूंच्या सेवेत असताना,
संसारात बंधन होईल, अशी शंकाच उरत नाही.
खाणेपिणे, संपनता कायम राहते आणि त्यासोबत सर्व विश्वाशी आत्मैक्य होते.
किंबहुना चराचर आपण जहाला .. ही ओवी साकारते.
त्यावर पुनः श्रीगुरूंचे उत्कट प्रेम लाभते.
आणि स्वतः भगवान आपल्या बरोबर खातो पितो क्रीडा करू लागतो.
योगी ज्या संसाराला बंधन मानतात. तोच संसार संतसहवासामुळे मुक्तीरूप होऊन जातो.
आपल्याला एवढा पुण्यचिंतामणी मिळाला असतां वनात जाणे, भिक्षा मागणे हवे कशाला?
ज्ञानेश्वरांच्या कृपेमुळे आम्ही हे अनुभवले.
या संतसंगामुळे श्रीहरीच्या पायांचा आम्हाला लाभ झाला.

## ४८ / योग आणि नाम

योगामाजी सर्व इंद्रियासी कष्ट । करिताहि स्पष्ट न ये हरी ।।१।।

नामामध्ये एक वाणीचि गुंतत । इंद्रियहि होत आधीन की ।।२।।
सगुण निर्गुण दोही रूपे हरी । अंतरबाहेरी दृष्टि पडे ।।३।।
ऐसा सोपा पंथ सांडोनि साजिरा । कोण दरीखोरा शोधू जाय ।।४।।
घरीच चालोनी येतो नारायण । संतसंगे अन्न गोड भेटे ।।५।।
संसारी असोनि मोक्ष पायी लोळे । मग कां डोहळे बंधनाचे ।।६।।
खाउनी पिउनी रमा करी सेवा । सर्व विश्वभावा ऐक्य देई ।।७।।
वरी श्रीगुरूचा दृढभावे प्रेम । सवे पुरूषोत्तम खाये पीये ।।८।।
योगी ज्या संसारा बंधन मानिती । तोचि होय मुक्ति संतसंगे ।।९।।
एवढा पुण्याचा, पाशी चिंतामणि । मागावी कां वनी भिक्षा मग ।।१०।।
ज्ञानेश्वरकृपे आम्हासी प्रत्यय । संतसंगे पाय श्रीहरीचे ।।११।।

चिंतन :-

योगसाधनेत अपल्याला सर्वच इद्रियांना आवरावे लागते. फार कष्ट होतात.

तरी देखील स्पष्ट रूपाने श्रीहरीचे दर्शन होत नाही.

नामस्मरण करताना मात्र केवळ वाणी साधनेत गुंतली जाते आणि बाकीची इंद्रिये आपोआप आपल्या स्वाधीन होतात..

असे होताच हृदयात अनुभवाला येणारं आपलं निर्गुण आत्मरूप आणि बाहेर दिसणारा सगुण विग्रह ही दोन्ही रूपे आपलीच आहेत असे अनुभवल्या जाते.

असा सुखाचा सोपा मार्ग सोडून जंगलामध्ये दरी खोऱ्यात कशाला रहावे.

संतांच्या सहवासामध्ये नारायण आपल्या घरीच येतो.

त्याची पूजा करताना नैवेद्य म्हणून गोड जेवण मिळते.

संसाराच्या बंधनात असल्यासारखा असून देखिल सहजपणे, मोक्ष जणु लोटांगणच घालतो.

संसाराचे काहीही बंधन रहात नाही.

खाऊन पिऊन सुखी असतो.

स्वतः लक्ष्मी देवी हीच जणु सेवा करीत असते.

सर्व विश्वात एकच असलेला नारायण सर्व संसाराचे व स्वतःचे ऐक्य असल्याचा अनुभव देतो.

असा संसार आणि परमार्थाच्या ऐक्यानुभवात श्रीगुरूंच्या आत्यंतिक प्रेमाचा लाभ मिळत असतो.

आणि स्वतः भगवान श्रीकृष्ण आपल्या सोबत खातपीत असतो.

असे असताना- योगी ज्या संसाराला बंधन मानतात तोच संसार श्रीगुरूंच्या आणि संतांच्या सहवासात मुक्तिरूप असल्याचा अनुभव येतो.

असा परम प्रेमाचा, सर्व चिंता दूर करणारा चिंतामणी मिळत असेल तर वनामध्ये राहून भिक्षा मागण्याचे कष्ट कां करावेत?

श्रीज्ञानेश्वरांच्या कृपेने आम्हाला असा प्रत्यय आला आणि संतांच्या आशिर्वादाने श्रीहरीची पाऊले आमच्या हृदयात उमटली आहेत.

..........................................................

### ४९ / नामतत्त्व

कोण उभा आहे सृष्टी । मशी करावया गोष्टी ।
नामावीण तत्त्व दृष्टी । दुसरे दाखविता ।।१।।
मंथा मंथा चारी वेद । सोडा शास्त्रातील शब्द ।
दृढ करा आता वाद । नामबाध दावुनी ।।२।।
धुंडा सकळ पुराणे । करा जे तुम्हा करणे ।
परी आम्हासी स्मरणे । पासुनिया सोडवा ।।३।।
म्हणुनीया ऐसे आहे । नामावीण तत्त्व नोहे ।
ग्वाही ज्ञानेश्वरपाय । तुम्हाकृपे आकळी ।।४।।

चिंतन :-

माझ्याशी वाद करायला या सृष्टीत कोणाची हिंमत आहे?
नामाशिवाय दुसरे परमतत्व आहे असे दाखवणारा कोण आहे?
चारी वेदांचे मंथन करा,
सर्व शास्त्रवचनांचा आधार घ्या,
त्याने तुमचा मतवाद पुष्ट करा आणि नामबाध म्हणजे नामाची गौणता आहे, असे सिद्ध करा.
सर्व पुराणे धुंडून काढा.
तुम्हाला करायचे असेल ते करा
आणि आम्हाला नामस्मरणापासून सोडवून दाखवा !
तुम्ही असे करूच शकत नाही.
वस्तुतः असे आहे की - नामाशिवाय मूळ तत्व अस्तित्वातच नाही.
याची ग्वाही ज्ञानेश्वरांचे चरणतीर्थ प्राशन केल्यानेच मिळते.
अहो ज्ञानाई, तुमच्या कृपेनेच हे नामतत्व मला मिळाले.

५०

कथेसी आरंभ पाहुनिया देवा । रंग तो लुटावा साधुसंगे ।।१।।
यावे नारायणा सांडोनिया काम । मंचकविश्राम तोही सोडा ।।२।।
सारीपाटखेळ सोडा घडीभरी । यावे झडकरी धावूनिया ।।३।।
ज्ञानेश्वरप्रभु बोलाविती तुम्हा । यावे मेघश्यामा नावरत ।।४।।

चितनः-

हे देवाधिदेवा, माझ्या ज्ञानदेवांच्या हरिकथेचा आरंभ पहा तर खरा!
साधूंच्या संगतीत कथारसाचा मनसोक्त आस्वाद घ्या.
हे नारायणा, इतर सारी कामे सोडा, मंचकावरील विश्रांतिही सोडा.
सारीपाटाचा खेळही घडीभर सोडून द्या.
आणि झडकरी धावत साधुकथेला या.
ज्ञानेश्वर प्रभु तुम्हाला बोलावीत आहेत.
काहीहि आवरासावर न करता, जसे असाल तसे निघून या.
कथेच्या प्रसंगी भगवान तेथे आवडीने येतात म्हणून महाराजांनी त्यांना आग्रहाचे निमंत्रण दिले आहे.

५१

सर्व कीर्तीचे साधन । मुखी नाम नारायण ।।१।।
इंद्र चंद्र सूर्य ब्रह्मा । कीर्ति गाती पाहुनि प्रेमा ।।२।।
भक्तासाठी नारायण । नेईल ब्रह्मांड तारुन ।।३।।
ज्ञानेश्वरकृपाबळे । नामी रूपी मेघनीळे ।।४।।

चिंतनः-

नारायणाचे नाम मुखात असणे हेच सर्वात मोठे कीर्तीचे साधन आहे.
इंद्र चंद्र सूर्य ब्रह्मदेव वगैरे सर्वच भक्तांचे प्रेम पाहून भक्तांची कीर्ती गातात.
जशी रामाने अयोध्या तारून नेली तसे भक्तासाठी सर्व ब्रह्मांडाला भगवान् तारून नेतात.
ज्ञानेश्वरांच्या कृपेच्या बळावर सर्व नामात आणि सर्व रूपात एक मेघःशामच भरला आहे, असा साक्षात् अनुभव येतो.

५२

प्रभातसमयी म्हणा शेषशायी । देवोनीया ग्वाही पार करा ।।१।।
रामकृष्ण हरी गोविंदा माधवा । विष्णु वासुदेवा गोपवेशा ।।२।।

ऐसिया नामाने तुटतील पाश । जडेल की आस हरिपदी ।।३।।
ज्ञानेश्वरप्रभु थापटोनी आतां । उठवोनि माथां कर ठेवी ।।४।।

चिंतनः-

पहाटे विष्णुस्मरण करा.
काकुळतीने हांका मारा.
मी करीनच असा कठोर निश्चय करा.
भगवंताने दिलेल्या हमीच्या बळावर संसारसमुद्र पार करा.
रामकृष्ण हरीगोविंद माधवा विष्णुवासुदेवा गोपवेशाकृष्णा ही नामे घेत रहा.
असे केल्याने संसाराची बंधने तुटतील व श्रीहरीच्या चरणांची ओढ लागेल.
हे ज्ञानेश्वरप्रभो, मला थापटून जागे करा
आणि माझे मस्तकावर आपला कृपाकर ठेवा!

५३

रामकृष्णनामे पतित तरती । व्यासें भागवती वर्णियेले ।।१।।
नामधारकांच्या संगती लागोनी । उद्धरती जनी पक्षी पशु ।।२।।
भलतीया मिषे नाम मुखी येवो । वैकुंठीचा रावो झडपितो ।।३।।
ज्ञानेश्वरप्रभु नामाचा महिमा । नकळे निगमा स्वर घेता ।।४।।

चिंतन :-

महर्षी व्यासांनी भागवतात रामकृष्णांचे नामस्मरणाने पतित पापी देखील तरून जातो, असे वर्णन केले.
अखंड नामस्मरण करणाऱ्या नामधारकांच्या संगतीने लोक आणि पशु- पक्षी देखील उद्धरतात. त्यांना सन्मार्ग लाभतो..
कोणत्याहि निमित्ताने कां होईना, रामनाम मुखात आले तर वैकुंठीचा राणा त्याला आपल्याकडे ओढून घेतो.
स्वामी ज्ञानेश्वरांच्या नामाचा महिमा, सुस्वर वैदिक आलाप घेऊनही, वेदांना आकलन होत नाही. कारण- त्रैगुण्यविषया वेदाः । निस्त्रैगुण्यो भवार्जुन।। वेद हे सत्वगुण-रजोगुण-तमोगुण यांनी भरलेले आहेत म्हणून, हे अर्जुना, तू या त्रिगुणांहून वेगळा हो. असे गीतेत स्पष्ट सांगितले आहे.

५४

पुसती साधने न वाटोनी लाज । टाकोनी सहज विष्णुनामे ।।१।।

न मिळे जे काही, केल्याही स्मरण । ऐसे ते प्रमाण कोठे आहे ।।२।।
प्रणवापासोनी काष्ठशब्दावरी । अवघी भरोवरी नाममय ।।३।।
गौणमुख्य नामे श्रीहरीसी एका । *बोलणे हे शुकामुखे झाले ।।४।।
मुख्य नाम ते तो गुप्तचि ठेवावे । गौणाने स्तवावे नारायणा ।।५।।
जैसे वडिलासी नांव घेता दुःख । तैसे देवा सुख परोक्षाने ।।६।।
बृहदारण्यकी ऐशा नाना श्रुति । पुराणादि स्मृति हाचि ठेवा ।।७।।
कान्तकान्तामेळे आला एकरसू । बाहेरी उपसू न दाविता ।।८।।
ज्ञानेश्वरप्रभु तात सर्वभावे । म्हणताचि जीवे वृत्ति मेल्या ।।९।।
(पाठांतर - *गा किंवा ऐका संतसंगे)

चिंतनः-

विष्णूच्या नामाचे स्मरण केले असता पूर्ण परमार्थ प्राप्ती सहज रीतीने होते, हे लक्षात न घेता श्रीगुरूंना नामसाधना सोडून इतर साधना मागण्याची लाज कशी वाटत नाही!
नामस्मरण केल्याने परमार्थ मिळत नाही असे कुठे प्रमाण आहे काय?
खरोखर पाहिले असता ओंकारापासून लाकूड दगडापर्यंत सर्व पदार्थांची नावे ही परमेश्वराचीच आहेत. त्यात काही गौण तर काही मुख्य आहे. असे श्रीशुकाचार्यांनी भागवतात सांगितले आहे. गुरूंनी उपदेश केलेले नाम हे शिष्यासाठी मुख्य नाम आहे.
ते मंत्ररूप आहे. त्यामुळे ते गुप्तच ठेवावे. आणि इतर नामांनी भगवंताची स्तुती करावी.
ज्याप्रमाणे आपल्या पित्याला मुलाने नांव घेऊन हाक मारली असता त्याला आवडत नाही, दुःख होते. त्याचप्रमाणे आपल्या उपास्याचे नाम मोठ्याने घेऊ नये. हेच आपल्या देवाला आवडते.
बृहदारण्यक उपनिषद आणि स्मृतीपुराणे यासंबंधी बरेच उल्लेख आहेत.
ज्याप्रमाणे पतिपत्नीच्या दांपत्यसुखात मिळणारा आनंद आपण बाहेर प्रगट करत नाही. तसेच प्रेमाच्या सर्व भावनांच्या द्वारा ज्ञानेश्वरतातांना आळवावे म्हणजे प्रेमाच्या वृत्ती सोडून बाकी सर्व वृत्ती पुन्हा पुन्हा उत्पन्नच होत नाहीत.
केवळ प्रेमसागरच उचंबळत असतो.

................

५५

कासया शोधावे आम्ही मतांतर । कासयासी शास्त्र पहावे की ।।१।।
नामामध्ये असे आम्हां काय उणे । तुटती बंधने नाममात्रे ।।२।।
रामबळे नाम नामबळे राम । बोलिले निष्काम संतजन ।।३।।

राम तेचि नाम नाम तोचि राम । सांगताति सम वेदशास्त्रे ।।३।।
राम तारि एका अयोद्धे लागूनी । नामे उद्धरणी सर्व जनां ।।४।।
म्हणोनिया रामाहुनी नाम थोर । उक्ति ज्ञानेश्वर ऐसी देती ।।५।।

चिंतनः-

आम्ही इतर लोकांचे मतात काय आहे, हे कशाला शोधावे? इतर शास्त्रे कशाला पहावीत? नामामध्ये असे काय उणे आहे की इतर शास्त्राचा अभ्यास करायला हवा? नामाने अविद्येची बंधने तुटून जातात.

रामाच्या सामर्थ्याने नाम समर्थ होते आणि नामाच्या बळाने राम भेटतो. असे निष्काम असलेले संतजन सांगतात.

राम म्हणजेच नाम आणि नाम म्हणजेच राम असे सर्व वेदशास्त्रे गर्जून सांगतात.

रामाने एका अयोध्या नगरीचाच उद्धार केला पण नाम तर सर्व जगाचा उद्धार करते. म्हणून रामाहून नाम अधिक थोर आहे. असे ज्ञानदेवांचेही वचन आहे.

नाम आणि रूप यांचा अभेद असूनही रामनामाचे महत्व प्रत्यक्ष रामाहून थोडे अधिकच आहे.

५६

रामकृष्ण नाम म्हणा रे फुकाचे । न व्हाल चुकांचे अधिकारी ।।१।।
येथे नाही काज काही कवडीचे । व्हाल आवडीचे देवाचिया ।।२।।
मुखे मात्र म्हणा रामकृष्ण हरी । येईल तो घरी नारायण ।।३।।
एक वेळ तरी घ्यावी हे प्रचीत । ठायी एकचित्त करोनिया ।।४।।
ज्ञानेश्वरकन्ये पूर्ण भरंवसा । अनुभव ठसा ओळखोनी ।।५।।

चिंतनः-

सहज-सोपे -फुकट मिळालेले रामकृष्ण नाम म्हणा म्हणजे तुमचे कडून चुकाच होणार नाहीत.

नाम घेताना एका कवडीचा खर्च नाही, उलट देवाच्या आवडीचे तुम्ही व्हाल.

नुसते रामकृष्णहरी मुखाने अखंड म्हणा म्हणजे नारायण घरीच चालत येतो.

बसल्या जागी एकाग्र चित्त करून एक वेळ तरी याची प्रचिती घ्या.

या नामाच्या अनुभवाचा ठसा ज्ञानेश्वर कन्येच्या हृदयात पूर्ण उमटला आहे. त्याचा तिला पूर्ण भरंवसा आहे.

व्यवहारात काय किंवा परमार्थात काय आपल्याकडून चुका होऊ नये असे वाटत असेल तर नामस्मरण सतत करीत रहा म्हणजे झाले.

५७

केले करायाचे अवघे तुज ठावे । आतां माझे नांवे निमित्त कां ।।१।।
तनुमनधन अर्पिलिया पायी । देणे घेणे नाही उरले आता ।।२।।
मोकळा चाकळा जाहलो सुखाचा । रामकृष्ण वाचा जपताचि ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या जोडोनिया पाणि । पूजी चक्रपाणि तन्मयत्वे ।।४।।

चिंतनः-

मागे मी काय केले आणि पुढे काय करणार, ते सर्व तुला ठाऊकच आहे. आता हे तूं केले, ते तूं केले असे कशाला मला निमित्त तरी कां करतोस?

तन मन आणि धन तुझे पायी अर्पण केल्यावर आता देणे कशाचे?

रामकृष्णाचे नामस्मरण करतांक्षणीच मी सर्व बंधनातून मुक्त झालो, सुखी झालो. असे बोलून ज्ञानेश्वरकन्या हात जोडते, तन्मय होते, एकरूप होते आणि नंतर चक्रपाणी कृष्णाचे पूजन करते.

५८

केशव माधव गोविंद गोपाळ । नामे हा मंगळ पंडुवंश ।।१।।
विष्णु भगवान गरुडवाहन । कल्याणनिधान नारायणू ।।२।।
मंगल मंगल कमललोचन  कामनामोचन काम-तात ।।३।।
रामकृष्ण हरी मंगलस्वरूप । गुरु मायबाप ज्ञानेश्वर ।।४।।

चिंतनः-

केशवा, माधवा, गोविंदा, गोपाळा या नामस्मरणाने पांडवांचा वंश मांगल्याने उजळलेला दिसत आहे.

गरूडासन भगवान विष्णु कल्याणाचा सांठा आहेत, तेच नारायण आहेत.

कमलासारखे सुरेख नेत्र असलेले विष्णु कामने पासून भक्ताला दूर करतात. कारण ते मदनाचे पिताच होत.

रामकृष्ण हरी मंगल स्वरूप नसून श्रीज्ञानेश्वर माझे माय, बाप आणि गुरू आहेत.

५९

जंव तरावया अत्यंत आवडी । तंव घडी घडी हरी म्हणे ।।१।।
नारायण नाम वदतांचि वाणी । मन ब्रह्मखाणी लीन होय ।।२।।

सकळ इंद्रिये एकवट होती । इंदिरेचा पती आळवीता ।।३।।
ज्ञानेश्वरप्रभु तात कृपावंत । वळल्या श्रीमंत विश्व सारे ।।४।।

चिंतनः-

जर तुला संसार तरून जावयाचे असेल तर सारखे हरीनाम घे.
नारायणाचे नाम एकाग्र होऊन वाणीने घेतले की मन ब्रह्मस्वरूपात लीन होऊन जाते.
इंदिरेचा पती विष्णूला आळविले असता सर्व इंद्रिये एकवटून जातात.
कृपावंत पिता ज्ञानेश्वरप्रभु ओळले म्हणजे त्यांनी कृपा केली असता सर्व विश्वच श्रीयुक्त होऊन जाते, शोभायमान होते.

६०

नाम साजर साजर । करी फुकट अमर ।।१।।
दुजी क्रिया नको काही । मुखे गावा शेषशायी ।।२।।
पळ रिती नसो वाणी । डोळां यावे प्रेमपाणी ।।३।।
मग दुजे नको काही । मुखी गावा शेषशायी ।।४।।
म्हणे ज्ञानेश्वरबाळा । हेचि आवडे गोपाळा ।।५।।

चिंतनः-

नामस्मरणाचे साधन इतकं सुरेख आहे की ते काही कष्ट न होता जीवाला अमरत्व प्राप्त करून देतं.
मुखाने विष्णुनामाचे गायन केले की दुसरी कोणतेहि साधन करावे लागत नाही.
पळभर देखील वाणी रिकामी राहू नये - आणि डोळ्यात प्रेमाश्रु यावेत.
मग दुसरे काही लागत नाही. फक्त मुखाने शेषशाई गात जावा.
ज्ञानेश्वरकन्या म्हणते भगवंताला हेच सर्वात जास्त आवडते.
मुखाने अखंड नामस्मरण केले आणि डोळ्यातून प्रेमाश्रु येत राहिले की सर्व आत्मस्थिती आणि भक्ती प्राप्त होते.

६१

नाम भेषज भेषज । भव नाशिते सहज ।।१।।
नाम अनळ अनळ । जाळी पातकांचे मूळ ।।२।।
नाम जीवन जीवन । ताप शमविते तीन ।।३।।
नाम गोड नाम गोड । ज्ञानेश्वर पुरवी कोड ।।४।।

चिंतनः-

नाम औषधी आहे. त्याने भवरूपी संसाररूपी रोग नाहिसा होतो.

नाम अग्निरूप आहे, सर्व पातकांचे मूळ जी वासना तिलाच जाळून टाकतो.

नाम पाणीरूप आहे, त्याने आध्यात्मिक, आधि दैविक आणि आधिभौतिक दुःखांचे शमन होते.

नाम अत्यंत गोड आहे, त्याने माऊली आपले सर्व कौड कौतुक पुरविते आणखी काय हवे!

............................................................

६२

जीवे प्राणाचिया हाती । द्यावी मति सर्वदा ।।१।।
वाचे वदावा गोविंद । ब्रह्मानंदी बुद्धीद ।।२।।
मग चित्ता समाधान । नारायण सर्वत्र ।।३।।
तिन्ही दुःखनाश । सावकाश सांपडे ।।४।।
म्हणे ज्ञानेश्वरबाळा । होय मेळा गोविंदी ।।५।।

चिंतनः-

जीवेभावे करून प्राणाच्या श्वासोच्छवासाकडे आपले सर्व लक्ष केंद्रित करावे. मुखाने गोविंदाचे नाम घ्यावे आणि ब्रह्मानंदात डुंबून जावे.

मग चित्त कुठेहि भरकटत नाही. ते समाधान पावते आणि नारायणच सर्वत्र आहे असा अनुभव येतो.

तिन्ही - आध्यात्मिक, आधिदैविक व भौतिक-दुःखांचा नाश होतो.

ज्ञानेश्वरांची कन्या म्हणते की या साधनाने गोविंदाशी मिळून जाता येते.

प्राणायाम व नामस्मरण या दोघांच्या एकत्रित अभ्यासाने निर्गुण व सगुणभक्ती दोन्ही एकदम मिळतात.

६३. मी हात जोडते

तीर्थ व्रत दान केले नानापरी । जरी का अंतरी शिव नाही ।।१।।
तरी ते सकळ फलकट झाले । स्वर्गादिक फळी गोवी चित्त ।।२।।
सर्व कर्मफळ एक नारायण । नावडे त्याविण स्वर्गमोक्ष ।।३।।
त्रिवेणी संगमी नाना तीर्थे भ्रमी । चित्त नाही नामी तरी ते व्यर्थ ।।४।।
तातांचे वचन घेवोनि हृदयी । जपा शेषशायी अहोरात्र ।।५।।
ज्ञानेश्वकन्या सांगे वारंवार । जोडोनिया कर मनोभावे ।।६।। (य९पू१३)

चिंतनः-

जीवाभावाने व्रत दानादि नाना साधने केली पण अन्तःकरणात शंकराचे स्मरण नसेल - किंवा चित्त शुद्ध नसेल तर-

ते सर्व व्यर्थ होते आणि स्वर्गादिकांच्या फळात मन गुंतून जाते.

सर्व कर्माचे फळ एक नारायणच आहे असे मनात पक्के ठसल्यावर त्याशिवाय स्वर्ग मोक्ष काहीच आवडत नाहीत.

त्रिवेणी संगम किंवा अनेक तीर्थयात्रा केल्या आणि चित्तात नामस्मरण ठसले नसेल तर ते सारे व्यर्थ होय.

हे ज्ञानेश्वरमाऊलीचे हरिपाठातील वचन हृदयात ठसवून भगवंताचे अहोरात्र स्मरण करावे. ज्ञानेश्वरकन्या देखील वारंवार हात जोडून नामस्मरण करावे हेच सांगत आहे. एकूण काय तर, सर्व तीर्थांपेक्षाही नामस्मरण हे श्रेष्ठ आहे.

## ६४ / आशीर्वाद

त्या कुळी असावे अखंड कल्याण । कार्यही निर्विघ्न होवो त्याचे ।।१।।
आळंदीवल्लभनाम गाय मुखी । तिन्ही काळी सुखी तोचि एक ।।२।।
ज्ञानेश्वर माझा बैसला हृत्पटी । आतां गेली कोटि विघ्ने दुरी ।।३।।

चिंतनः-

आळंदी वल्लभाचे नाम मुखाने गाणाऱ्याचे कुळात अखंड कल्याण असो, त्याची सर्व कार्ये निर्विघ्न पार पडोत.

माझा सखा ज्ञानेश्वर हृदयपटावर विराजमान झाला की कोट्यावधि विघ्ने दूर पळतात.

## ६५ / आठव विसर विसरोनि

नलगे मजला मार्ग तो अवघड । वाचे लागे गोड नांव तुझे ।।१।।
गोविंद गोपाळ गोविंद गोपाळ । होय अळुमाळ जीव प्रेमे ।।२।।
आणिक समस्त सुटोनिया जाय । चहूंकडे होय नारायण ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या आठव विसर । विसरोनि सार पावे हरी ।।४।।

चिंतनः-

मला कठीण मार्ग नकोत. तुझे नामस्मरणच वाणीला गोड वाटते.

गोविंद गोपाळ अशी नावे प्रेमाने उच्चारली असता प्रेमाने जीव कसा थकून जातो.

असे झाले की सर्व जगातले सर्व संबंध नाहीसे होतात आणि चहूकडे एक नारायण भरलेला आहे असा अनुभव येतो.

सर्वांची आठवण आणि सर्वांचे विस्मरण दोन्ही नाहीसे होतात आणि आठवण आणि विस्मरणाचे पलीकडे असणारा हरी, म्हणजे सर्वांचे सारभूत आत्मतत्व प्राप्त होते.
नामाने प्रेम मिळते. विषय सुटतात, चहुकडे परब्रह्माचा प्रत्यय येतो आणि स्मरण विस्मरणाच्या पलीकडे असणारा सारभूत भगवान मिळतो.

६६.

चहूंहि वेदांचे काढूनिया सार । निर्मिले सुंदर भागवत ।।१।।
तया भागवती सार रामकृष्ण । सकल सहिष्णु भक्तान्याय ।।२।।
आंतर बाहेरी व्यापिले सर्वत्र । पवित्रापवित्र नाही नामी ।।३।।
विप्र क्षत्री वैश्य शूद्र चारि वर्ण । नामेचि पावन निःसंशय ।।४।।
ज्ञानेश्वरमुखे परी ते जाणोनी । हृदयी आणोनी दावी देव ।।५।।

चिंतन :-
चारी वेदांचे सार काढून भागवताची निर्मिती झाली.
त्यातील सर्वांचे सार रामकृष्ण नामस्मरण हेच आहे.
हे रामकृष्ण कसे आहेत तर भक्तांच्या सर्व चुका क्षमा करणारे आहेत.
हे भगवन्नाम आतबाहेर सर्वत्र व्यापून आहे.
म्हणजे नाम हे पूर्ण ब्रह्मच आहे.
पवित्र असतानाच नाम घ्यावे असा कोणताहि नियम नाही.
पवित्र अपवित्र कोणत्याहि अवस्थेत जप करीत रहावे.
ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र चारी वर्णांचे लोक नामाने शुद्ध होतात.
पण ते नाम सद्गुरु ज्ञानदेवांच्याच मुखाने जाणून घ्यावे.
म्हणजे ते नाम श्रीहरीला आपल्या हृदयात स्थापन करते.

६७

सांगता वचनी नायके हे मन । न करी दमन वासनांचे ।।१।।
कवण उपाय करावा ययाते । नमावे पायाते संताचिया ।।२।।
न भेटती साधु कृष्णकृपेवीण । तीनही भुवन धुंडलिया ।।३।।
म्हणोनिया आधी ज्ञानेश्वर गावा । आणिक त्यागावा योगविधी ।।४।।

चिंतन :-
मुखाने परमार्थाच्या गोष्टी करतो, पण मन ऐकत नाही आणि वासनाही आवरत नाहीत.
याला काय उपाय करावा - तर संतांचे चरणी आश्रय घ्यावा.

भगवंताच्या कृपेशिवाय गुरुरूपाने साधू त्रिभुवन धुंडाळले तरी मिळत नाहीत.
म्हणून योगादिसाधने सोडून प्रथम ज्ञानेश्वरमाऊलीचे प्रेमाने गायन करावे.
नामस्मरण हे पहिलेपासूनचे साधन आहे. शेवटपर्यंत ते कायम राहते. शेवटी फलरूपही तेच आहे असा अनुभ येतो..

### ६८ / हृदयशोभा

मिळे आवडीचे सुख । तुझे पाहता श्रीमुख ।।१।।
अवघेचि पुरती काम । मुखी गातां तुझे नाम ।।२।।
आटले जन्म मरण । तुझे वंदिता चरण ।।३।।
सख्या आळंदीवल्लभा । तुझी मूर्ति हृदयशोभा ।।४।।

चिंतन :-
तुझे कांतियुक्त मुख पाहिले की आवडीचं सुख मिळतं.
मुखानं तुझं नाम गायिलं की सर्व मनोकामना पूर्ण होतात.
तुझ्या चरणांना वंदन केलं की जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका होते.
हे सख्या आळंदीच्या वल्लभा! तुझी सगुण मूर्ति माझ्या हृदयाची शोभा आहे. ती अशीच निरंतर कायम राहो.

### ६९

नारायणनामी गुंतलिया वाणी । आणिक प्रमाणी काज नाही ।।१।।
गोविंदाचा मना लागलिया छंद । लोळे ब्रह्मानंद पायी मग ।।२।।
प्रेमे गळे चारी शरीराभिमान । न लगे साधन व्यतिरेक ।।३।।
ज्ञानेश्वरताते दिला अनुभव । अपवर्ग भव देवरूप ।।४।।

चिंतन :-
नारायणाच्या नामात वाणी गुंतली की इतर साधने हवीत कशाला?
गोविंद नामाचा मनाला छंद लागला की ब्रह्मानंद सहज प्रयत्न न करता मिळू लागतो.
प्रेम भक्तीने (भौतिक-लिंग-कारण-महाकारण) चारही देहांवरचा अभिमान गळून जातो.
व्यतिरेक म्हणजे मी देह नाही- इत्यादींचा मुद्दाम अभ्यास करण्याची गरज नसते.
ज्ञानाईने प्रेमभक्तीचा अनुभव दिला.
तेव्हा नवल घडले.
संसार आणि मोक्ष या दोही ठिकाणी सगुण भगवानच होऊन गेले.

## ७० / नाही भय चिंता

बरा शूद्रयोनि दिला जन्म मज । निगर्व सहज लीनतेने ।।१।। (य९पू१४)
समळ निर्मळ तुझे नाम गाता । नाही भयचिंता मागे पुढे ।।२।।
मौर्ख्याची न खंती विद्येचा ना गर्व । हारी जिती सर्व नारायणी ।।३।।
ज्ञानेश्वरकंठी घालोनीया माळ । जाहलो सकळ कर्मातीत ।।४।।

चिंतन :-

शूद्र जातीत जन्म झाला. त्यामुळे लीनता आली. गर्वहि निघून गेला.

शुद्धता असो की मलीनता असो, तुझे नाम गायले की मागे-पुढे भय किंवा चिंता काहीच राहत नाही.

मी मूर्ख असल्याची मला खंत नाही की तू विद्या दिली म्हणून गर्वही नाही.

हारणे जिंकणे सर्व नारायणाचे स्वाधीन.

मला त्याचे काय सुखदुःख !

ज्ञानेश्वरांच्या गळ्यात माळ घातली आणि मी सर्व चांगल्या वाईट कर्माच्या पलीकडे गेलो. स्वतंत्र झालो.

## ७१ / भावबळ

सहस्र कोटि विघ्नांचा । चुरा होय नामे साचा ।।१।।
कल्याणाचा निधि । नाकळे जो योगबुद्धि ।।२।।
ज्ञानेश्वर कृपामूर्ति । भावबळे चढे हाती ।।३।।

चिंतनः-

नाम घेतले असता सर्व विघ्ने दूर होतात.

नंतर अखंड नाम स्मरण सुरू ठेवले तर योगानेहि ज्याचे आकलन होत नाही, तो कल्याणाचा सागर, कृपेची मूर्ती, ज्ञानेश्वर प्रभू भावनेच्या बळावर प्राप्त होतो. साधन करताना येणारी विघ्ने दूर व्हावयाची इच्छा असेल तर सतत नामस्मरण करावे.

## ७२

साराचेही सार गावे ज्ञानराजा । नाही भाव माझा आना ठायी ।।१।।
तया तोषवाया नाना उपचार । न लगती फार हिरे मोती ।।२।।
मनाचे कल्पिले पुरे मानी भावे । तृप्तीच्या स्वभावे निववीतू ।।३।।
भोळा भाळा माझा आळंदीवल्लभ । जाहला सुलभ नामासाठी ।।४।।

चिंतनः-

ज्ञानेश्वर माऊली साराचेहि सार आहेत. माझी दुसऱ्याचे ठिकाणी अशी भावना होणे नाही. त्यांना संतोष देण्यासाठी हिरे मोती वगैरे श्रीमंती उपचार लागत नाहीत.

मानसपूजेत ज्याची ज्याची निर्मिती करून त्यांना जे अर्पण कराल ते त्यांना पुरेसे वाटते. ते स्वतः पूर्ण तृप्त असल्याने त्यांना थोडेसे जरी दिले तरी ते भक्ताला सर्व तापांपासून मुक्त करतात.

माझे आळंदीचे वल्लभ इतके भोळेभाळे आहेत की त्यांचे प्रेमाने नामस्मरण केले की सहज प्राप्त होतात.

ज्ञानेश्वर माउलीच्या नामस्मरणाचे महत्व महाराज सांगत आहेत. मनाने ज्ञानदेवांना जे काही द्याल ते स्वीकारतात आणि भक्तालाही नामाच्या आधाराने पूर्ण करतात, हे या अभंगात सुचविले आहे.

७३

तुझे नामसंकीर्तन । वर्णोत ये लोक तीन ।।१।।
विघ्न न येवो त्या ठायी । विश्व भरो प्रेमबाही ।।२।।
गोविंद गोविंद । गाता सर्वदा आनंद ।।३।।
षडरीचा पराजय । नाममात्रे तुमच्या होय ।।४।।
करु काज एकमेळा । ज्ञानेश्वरा जयमाळा ।।५।।

चिंतनः-

तुझ्या नाम संकीर्तनाचे वर्णन तिन्ही लोकात होवो.

कोणतेहि विघ्न त्या ठिकाणी न येवो. सर्व विश्वात तुझ्या प्रेमाने भरलेल्या हाका भरून जावोत.

गोविंद गोविंद गात असताना सर्वत्र आनंदच भरून जातो.

कामक्रोधादि सहा शत्रूंचा पराजय तुझ्या नामस्मरणाने सहज होत असतो.

ज्ञानेश्वरांचा जयजयकार करून एकाच वेळी सर्व कार्ये एकदम करून टाकू.

७४

होतो तैसा धर्म । जपताचि तुझे नाम ।।१।।
मळमूत्र विसर्जिता । बाधा नाही नाम घेता ।।२।।
रामदासे हे लिहिले । सुखे उपसंहारिले ।।३।।
आळंदीच्या राया । नामे शुद्ध माझी काया ।।४।।

चिंतनः-

तुझ्या नामाचा जप केला म्हणजे धर्म संपादन होतो.

मल मूत्रदिकांचे वेळी देखील नाम जपले तरी काही दोष उत्पन्न होत नाही. असे श्रीरामदास स्वामींनी लिहून ठेवले आहे. तेच मी थोडक्यात येथे सांगत आहे.
हे आळंदीच्या राया, नामाने माझे शरीर पूर्ण शुद्ध झाले आहे.
नामस्मरण अखंड करावे, कोणतेहि वेळी करीतच असावे. हे येथे सुचविले आहे.

७५

निज नामाचिया बळे । मन नेई एकी वेळे ।।१।।
हेचि एक स्वातंत्र्याचे । येर आघवे आनाचे ।।२।।
कंटाळली बुद्धि । नामी लागो दे समाधि ।।३।।
स्वामी आळंदीजीवना । तारा पतितपावना ।।४।।

चिंतनः-
श्रीज्ञानेश्वरा, आपण आपल्या नामाच्या सामर्थ्याने माझे मन एकदा तरी आपल्याकडे ओढून घ्या.
हेच एक स्वतंत्र होण्याचे साधन आहे. इतर सर्व साधने मायेच्या परतंत्र ठेवणारी आहेत.
माझी बुद्धी जगातील नानाविध विषयांना जाणून ते खरे आहेत असा निश्चय करणारी असल्याने कंटाळली आहे. म्हणून तुझ्या नामातच मला समाधी लागू दे.
स्वामी आळंदीजीवना, मला पतिताला तारून न्या.

७६

आवडीचे सुख । रंगे मुख गोविंदी ।।१।।
भवनदीतारु । जगद्‌गुरु कृपाळू ।।२।।
श्रवण कीर्तन । कृष्ण मन करीत ।।३।।
ज्ञानेश्वरबाळा । घाली माळा मुकुंदा ।।४।।

चिंतनः-
मुखाने नामस्मरण करून गोविंदाचे ठिकाणी रंगले म्हणजे आवडीचे सुख प्राप्त होते.
संसाररूपी नदी तरून जाण्यासाठी कृपाळू असलेले जगताचे गुरु ज्ञानेश्वर आहेत.
श्रवण आणि कीर्तन केले असता मन कृष्णरूप होऊन जाते.
अशी कीर्तन रंगात रंगलेली ज्ञानेश्वरांची कन्या मुकुंदाला माळ घालते.

७७ चार अक्षरी मंत्र

नाम झाल्यावीण नव्हे नामफळ । द्वैत ते केवळ दुःख दावी ।।१।।
चंहूही वाचेसी लाधला एकांत । वेदान्त सिद्धान्त ठेला तेथ ।।२।।

तेथेचि सांपडे नामाचा उगम । जीव शीव ब्रह्म एकवटे ।।३।।

अम म्हणजे रोग नाही जयालागी । नाम तया अंगी वाचकचि ।।४।।

ब्रह्म ते निर्गुण ना(म?) ते सगुण । दोघां एकपण प्रेमामाजी ।।५।।

ज्ञानदेवमंत्र चहूं अक्षरांचा । येणे चारी वाचा सुमंडित ।।६।।

चिंतनः-

मी नाम घेणारा आणि नाम असे द्वैत आहे तोपर्यंत (द्वितीयाद् वै भयं भवति) दुःखाची प्रतीति येणारच. म्हणून स्वतः नामाशी एकरूप झाल्याशिवाय नामाचे फळ अद्वैत स्वाभाविक ब्रह्मस्थिती कशी मिळणार?

अद्वैत झाल्यावर परा-पश्चन्ती-मध्यमा-वैखरी या चारही वाणींना खरा एकान्त लाभतो. आणि वेदान्ताचा सिद्धान्त जे निर्गुण ते पुढे सगुण होऊन उभे ठाकते.

अशा शुद्ध स्वरूपात नाम स्फुरण पावते असा अनुभव येतो. त्याच ठिकाणी जीव-शिव-आणि ब्रह्म एकवटून एक होऊन जातात.

(न + अम = नाम) अम म्हणजे रोग ज्याच्या ठिकाणी नाही ते नाम.

निर्गुण ब्रह्म आणि सगुण (स्फुरणरूप) नाम या दोघांचे एकपण भक्तीत प्रेमात होत असते.

ज्ञानदेवांच्या नामाचा हा चार अक्षरांचा मंत्र असा आहे की वैखरी-मध्यमा-पश्चन्ति आणि परा या चारही वाणी शोभा पावतात.

७८

सकळ साधन करुनी पाउटी । उरे पाठीपोटी नांव तुझे ।।१।।

काय माझे पाप तुझ्या नामापुढे । गाताती पवाडे पुराणे ती ।।२।।

जड जीवालागी करिता उद्धार । दोष नाही मात्र औषधाते ।।३।।

ज्ञानेश्वर स्वामी नामाचा महिमा । तूंचि सर्वागमा जाणतोसी ।।४।।

चिंतनः-

सकळ साधने केल्यानंतर - साधनांच्या आधी आणि नंतर म्हणजे संपुटीत घेतलेले नाम तेच शिल्लक राहते.

सर्व पुराणे नामाने कोणतेहि पाप भस्म होते असे कंठरव करून सांगतात - त्या नामसामर्थ्यापुढे माझी पापे कीती चिल्लर आहेत!

जड आणि चेतनांचा उद्धार नाम ऐकल्याने होतो. (औषधी घेऊनही पथ्य केले नाही तर औषधाचा जसा दोष नाही) तसे नामस्मरण करूनहि नामावर विश्वास ठेवला नाही तर तो दोष नामाचा नसून नाम घेणाऱ्याचा असतो.

ज्ञानेश्वर महाराज आपणच सर्व शास्त्रातील नामाचा यथार्थ महिमा जाणणारे आहात.

## ७९ / शिवस्तुति

शंभु भोळा चक्रवर्ती । वाचेप्रती येऊ द्या ।।१।।
ऐसा कवण उदार । उमावर सोडोनी ।।२।।
उपमन्युशोकासाठी । लावी ओठी क्षीराब्धि ।।३।।
देता पागोटीची चिंधी । गुणनिधि कुबेर ।।४।।
ज्ञानेश्वरबाळा बोले । शिव डोले सप्रेम ।।५।।

चिंतनः-
शंकर भोळे सम्राट आहेत. त्यांचे नाव वाणीने घेत रहा.
शंकराशिवाय उदार असे कोण आहेत बरे !
उपमन्यूला दूध हवे होते त्यासाठी त्याने शोक केला आणि भगवान शंकरानी घोटभर दूध देण्याचे सोडून दुधाचा समुद्रच दिला.
पागोटीचा तुकडा दिला तर त्याला कुबेर करून टाकले.
ज्ञानेश्वरांची कन्या मुखाने नाव घेते आणि शंकर आनंदाने डोलू लागतात.

## ८०

माझे मज काही नव्हे । कोण्या देवे आरंभू ।।१।।
आणिकांचे कोणेपरी । करु हरी प्रेक्षण ।।२।।
झाले तैसे हो का मन । नीळघन चिंतीन ।।३।।
देह जावो किंवा राहो । दृढ भावो गोविंदी ।।४।।
म्हणे ज्ञानेश्वरबाळा । वाचे चाळा नामाचा ।।५।।

चिंतनः-
माझेजवळ माझे म्हणावे असे काहीच नाही.
माझी सर्व कर्मे संपून गेली आहेत.
आता कोणतेच दैव अस नाही की ज्याच्या कर्माचे फळ भोगावयाचे राहिले आहे.
माझे मन जसे असेल तसे असो, मी घननीळाचे चिंतन करणार.
देह जावो की राहो माझा दृढभाव गोविंदाचेच ठिकाणी राहो.

८१

आनंदे कोंदले सारे त्रिभुवन । मुक्त झाले जन एकसदां ।।१।।
व्यवहारी नाही कासयाची चिंता । एकांता लोकांता सुख सारे ।।२।।
ओळगती सिद्ध न पुसता पाय । वरी गुरूमाय रक्षी सदा ।।३।।
ज्ञानदेव नामे लावोनिया झेंडा । गावया अखंडा राहूं येथ ।।४।।

चिंतनः-

ब्रह्मानंदाने सर्व विश्व भरून गेले आहे. एकाएकी सर्व जीवमात्र मुक्त झाले आहेत.
आता व्यवहारात कोणतीहि चिंता उरलेली नाही. एकान्त असो की लोकांची गर्दी असो सर्वत्र एक सुखच सुख भरले आहे.
सिद्धींच्या चरणांना नमस्कार न करताच त्या वश झाल्या आहेत.
आणि वरून पुन्हा श्रीगुरूनाथ रक्षण करताहेत.
ज्ञानेश्वरांचे नामसंकीर्तन करण्यासाठी अखंड येथेच आळंदीला राहू या.

८२

वेदशास्त्री मज नाही अधिकार । न कळेचि सार पुराणांचा ।।१।।
आणिक साधन न पुरे जीवित । सर्वांपरि आर्त दीननाथा ।।२।।
एकचि आधार आहे विश्वासाचा । मन काया वाचा तेथ राहो ।।३।।
होईल ते होवो ज्ञानराज नांवे । दिननिशी गावे तेचि परी ।।४।।

चिंतनः-

वेदशास्त्रे वाचण्याचा मला अधिकार नाही आणि पुराणांचे सारहि मला कळत नाही.
बरे दुसरी साधने करतो म्हटले तर एक आयुष्य पुरत नाही. म्हणून मी सर्वप्रकारे आर्त आहे आणि तू आर्त पुरविणारा दीनांचा नाथ आहेस.
मला एकच आधार आहे आणि तो म्हणजे तुझ्यावरचा माझा विश्वास. माझे मन, शरीर आणि वाणी तेथेच चिकटून राहिली आहेत.
मी आता ज्ञानराजांचे नाव घेणार आणि मग जे काय व्हायचे ते खुशाल होवो.
सर्वांनी देखील रात्रंदिवस ज्ञानेश्वरांचेच नामस्मरण करावे आणि काळ घालवावा.

८३

व्रत करू तरी नोहे उपवास । घेताही संन्यास तृष्णा वाढे ।।१।।
तप करू तरी अधीर जीवित । दान द्याया वित्त नाही नाही ।।२।।

पुण्य करू तरी वैगुण्याची भीति । न जाय वेदान्ती संशयचि ।।३।।
आता तुझ्या नांवे वाटे समाधान । ज्ञानदेवगान करिताचि ।।४।।

चिंतन :-

व्रत करतो म्हटले तर उपवास होत नाही.
संन्यास घेतला तर तृष्णा वासना अधिकच वाढते.
तप करतो म्हटले तर जीव अधीर होतो.
दान देतो म्हटले तर द्रव्य नाही.
पुण्य कर्म पार पाडतो म्हटले तर त्यात वैगुण्य राहील की काय याची भीति वाटते.
आणि वेदान्ताचा अभ्यास करतो म्हटले तर संशय जात नाही.
पण आता मात्र तुझे नाव वाचेने उच्चारले की  समाधान होते.
व्रत, संन्यास, तप, दान, पुण्यकर्म, वेदान्त वगैरे सर्वांपेक्षा नामस्मरण श्रेष्ठ आहे.

८४

आवडती मज विपत्तीच्या कोटी । जरी तुझ्या पोटी कळवळा ।।१।।
काय ते जाळावे घेउनिया धन । तुझिये चरण चित्ती नाही ।।२।।
तूंचि सांभाळीतां पुरे हेचि ज्ञान । इतर अज्ञान भार मात्र ।।३।।
पुरे एक जप रामकृष्ण होटी । मंत्र सात कोटी सारा शीण ।।४।।
आळंदीवल्लभ चरणी निश्चय । मग रिता ठाय नाही नाही ।।५।।

चिंतनः-

जर तुझ्या चित्तात माझे विषयी कळवळा उत्पन्न होत असेल तर कोट्यावधी विपत्ती आल्या तरी मला आवडेल.
खूप धन मिळाले पण तुझ्या पायाचे ठिकाणी जर मन नसेल तर ते काय जाळायच्याच उपयोगाचे!
सर्व ठिकाणी सांभाळून नेणारा तूच आहेस, हे ज्ञान पुष्कळ झाले.
इतर सारी ज्ञाने अज्ञानच होत. ते डोक्यावर भार मात्र आहेत.
रामकृष्णाचा एक मंत्र ओठावर असला म्हणजे झाले. सात कोटी मंत्रजप केला तरी त्याचा काय उपयोग?
आळंदीवल्लभ ज्ञानेशांचे चरणांचे ठिकाणी सत्यतेची प्रतीती आली की मग माउली सोडून रिकामी जागाच नाही, असा सर्वत्र अनुभव येतो.

८५

एक नारायणी नाही शुद्धभाव । तरी अवघे वाव पठण ते ।।१।।
एक वेळ नाही पाणी आले डोळा । नाही कळवळा भगवन्नामी ।।२।।
गुण आईकता जीव कासावीस । तोचि विष्णुदास होय जनी ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या मागे जन्मजन्म । व्यापो मनी नाम प्रेममय ।।४।।

चिंतनः-

खूप शास्त्राभ्यास केला पण जर नारायणाचे ठिकाणी शुद्ध प्रेमभाव जागृत झाला नाही तर ते सारे व्यर्थ होय.
भगवन्नामाच्या ठिकाणी कळवळा उत्पन्न होत नाही,
एकवेळदेखील डोळ्यांना पाणी येत नाही तर ते सारे व्यर्थ होय.
भगवंताचे गुणकीर्तन ऐकले असता जीव व्याकूळ होतो तोच लोकांत खरा भगवद्‌भक्त होय.
ज्ञानेश्वरकन्या जन्मोजन्मी एकच मागणे मागते की - मनामध्ये प्रेमाने ओथंबलेलं नाम व्यापून जावो.

८६

घेता गोविंदाचे नाम । सुष्ट दुष्ट होती सम ।१।।
नाममहिमा मानिता । न ये कोणा धिक्कारिता ।।२।।
क्रूर पापी साधु शांत । नाम गातां भगवंत ।।३।।
परी हेही बरवे झाले । अनौषधि रोग गेले ।।४।।
म्हणे ज्ञानेश्वरबाळा । निश्चयाचा धरी चाळा ।।५।।

चिंतनः-

गोविंदाचे नाव स्मरण केले असता, चांगले असोत की दुष्ट असोत, सर्वजण समान वंदनीय होतात.
नामाचे माहात्म्य पटले की, सुष्ट- दुष्ट कोणीहि नामधारक असो त्यांचा धिःकार करता येत नाही. (कारण नामाने सर्व पापे नाहीशी होतात असे नामाचे माहात्म्यच आहे)
क्रूर असो, पापी असो, साधू असो की शांत असो नाम घेऊ लागले की ते भगवद्रूप होतात. (तेणे चारी मुक्ती साधियेल्या)
(प्रत्येक पापाकरता वेगळेवेगळे प्रायश्चित्त घेऊन कष्ट करण्यापेक्षा) औषध न घेताच सर्व पापरूपी रोग नामस्मरणाने नाहीसे झालेत.
ज्ञानेश्वरकन्या म्हणते आता तू फक्त नामस्मरणाचा निश्चय कर म्हणजे झाले. जिभेला नामस्मरणाची संवय लावून टाक.



## ४. संतमहिमा

८७

सायासावांचोनी कल्पतरू भेटे । मग का ओखटे धातुशोध ।।१।।
तैसा संतसंगे सांपडतो हरी । मग शास्त्र करी कार्य काय ।।२।।
लाभता अमृत कासया औषध । तैसे ज्ञान शुद्ध गुरुमुखे ।।३।।
ज्ञानेश्वरप्रभु सर्वदां कृपाळ। बहु कळकळ जीवांची त्या ।।४।।

**चिंतन:-**

कष्ट केल्यावाचून सर्व कामना पूर्ण करणारा कल्पवृक्ष जर मिळाला तर लोखंडाचे सोने करणाऱ्या परिसादि धातूंचा शोध घेण्याचे कारणच काय?

त्याप्रमाणे जर संतांच्या सहवासाने श्रीहरीची प्राप्ती होते तर शास्त्रांच्या मागे लागून काय होणार आहे?

अमृत मिळाल्यानंतर साध्या साध्या औषधींची गरज काय?

तसेच जर गुरुमुखाने शुद्ध ज्ञान (अधिकारानुसार योग्य ते ज्ञान, योग्य तो मार्ग) प्राप्त होते तर इतर प्रयत्न कशाला?

ज्ञानेश्वरप्रभु अत्यंत कृपाळू आहेत त्यांना सर्व जीवांची खूप कळकळ आहे. त्यांना शरणवे, हे खरे.

८८

जळ असोनिया मनावरी कांही । परिणाम नाही करीत गंगा ।।१।।
संतचरणाची रज ते पार्थिव । परी हा स्वभाव पालटविती ।।२।।
संताचिया मागे पुढे राहे हरी । तैसा गंगातीरी नाही उभा ।।३।।
म्हणोनिया तीर्थे येती लोटांगणी । लागती चरणी हरिदासांच्या ।।४।।
विष्णूच्या अंगुष्ठापासोनिया गंगा । निघोनिया अंगा मूळ न सोडी ।।५।।
विष्णुरूप संत कळाला महिमा । बाप म्हणोनी उगमा पायी लागे ।।६।।

म्हणोनिया तेथे रज ते पवित्र । सर्व नारीनर गंगारूप ।।७।।
ज्ञानेश्वरप्रभु चरणरज शिरी । वंदिता निर्धारी प्रत्यय हा ।।८।।

चिंतनः-

जलरूप असूनही गंगास्नानाचा मनावर परिणाम होऊन ते शुद्ध होत नाही पण संतचरणांची धूळ जड मातीची असून त्याच्या प्रभावाने स्वभाव पालटतो सात्विक होतो.
संतांच्या मागेपुढे भगवान असतात तैसे गंगेच्या किनाऱ्यावर भगवान उभे नसतात.
म्हणोनी सर्व तीर्थे भगवद्‌भक्ताच्या चरणावर लोटांगण घालण्यासाठी येतात.
विष्णूच्या आंगठ्यापासून गंगा निघाली असली तरी ती मूळ आंगठा सोडीत नाही.
तिला कळले की संत हे विष्णुरूप आहेत हा महिमा कळल्यामुळे पिता म्हणून ती संतांच्या चरणांवर लोटांगण घालते.
म्हणून संतचरणाची धूळ अत्यंत पवित्र आहे तिचा स्पर्श झाला की सर्व स्त्रीपुरुष गंगारूप होतात.
ज्ञानेश्वरप्रभूंच्या चरणधुळीला मस्तकावर धारण केले की असा वरील प्रत्यय येतो.

## ८९ / संतसंग

सुखे जावे संतघरा । तोडोनी पडदा सारा ।
मग येवढ्या संसारा । तिळांजुळी मिळतु ।।१।।
नवे पुत्र दारा दास । जुने संत सावकाश ।
तेथे वाढ संसारास । मन वास पाहत ।।२।।
मग संसारचि मुक्ति । स्तब्धपण तेचि युक्ति ।
हारपते शब्दासक्ति । मनी तृप्ति आकळे ।।३।।
देव संताचा सोयरा । नाही सहज इतरा ।
देई हाक ज्ञानेश्वरा । स्वउदारा प्रस्थान ।।४।।

चिंतन :-

संतांच्या घरी आडपडदा न ठेवता खुशाल जावे म्हणजे येवढ्या मोठ्या संसाराला तिलांजली मिळते.
मग संसार हाच मुक्तिरूप होतो.
युक्तीने पटवून  देणे हे पण मौनानेच साधते;
शब्दाने समजावून देणे ही इच्छाच संपून जाते.
आणि मन तृप्त होऊन जाते.

देव हा संतांना केव्हाहि भेटणारा आप्त आहे.
इतरांना तो सहज भेटत नसतो. म्हणून ज्ञानेश्वरांना हांक देऊन बोलाव. स्वतःलाच देऊन टाकणारे असे ज्ञानदेव- त्यांचेकडे प्रस्थान कर.

९०

संतसंगतीने तुटताती पाश । आप्त सावकाश बोलियले ।।१।।
तयांचे वचन सत्य करावया । कलीत संता या जन्म झाला ।।२।।
तयांची चरित्रे ऐकता सादर । भासे हा संसार मृगजळ ।।३।।
सकळ सुखांची उमटते राशी । ज्ञानेश्वरापाशी प्रेम जडे ।।४।।

चिंतनः-
संतांच्या सहवासाने संसाराचे आशापाश तुटून जातात. असे आप्तांनी म्हणजे खऱ्या हितकर्त्यांनी स्पष्टपणे सांगून ठेवले आहे.
त्यांचे वचन सत्य करण्यासाठी कलियुगात संतांनी जन्म घेतले.
त्यां संतांची चरित्रे आदरपूर्वक ऐकली की हा सर्व संसार मृगजळाप्रमाणे मिथ्या भासू लागतो.
सर्व सुखाची अवाढव्य राशी प्रगट होते आणि ज्ञानेश्वरांचे प्रेम प्राप्त होते.

९१ देव आणि संत

देव जरी झाला सिद्ध । तरी न मोडे हा क्रोध ।।१।।
संतसंग होय जेव्हा । प्रकटत शांति तेव्हा ।।२।।
देवभेटी अभिमान । संतभेटी ब्रह्मपण ।।३।।
ऐशी सत्संगाची रीति । जडे ज्ञानेश्वरी प्रीती ।।४।।

चिंतन :-
भगवंताचा साक्षात्कार झाला तरी क्रोध नाहीसा होत नसतो.
संत सहवास केला की मग खरी शांति प्राप्त होते.
नुसत्या देवाच्या साक्षात्कारामुळे अभिमान वाढतो.
आणि संताच्या सेवेने खरे ब्रह्मपण येते.
अशी संतसंगाची रीत आहे. त्यामुळेच ज्ञानेश्वरांचे ठिकाणी अविचल प्रीती उत्पन्न होते.

९२

होता संतांची संगति । न दिसेचि कालगति ।।१।।
जेव्हा आहे मृगजळ । तेंव्हा धावण्याचा काळ ।।२।।

तैसे अध्यासे कल्पित । देश-काल-वस्तुजात ।।३।।
ज्ञानेश्वर कळे जेव्हा । तिन्ही भास जाती तेव्हा ।।४।।

चिंतन :-

संताची संगती प्राप्त झाली म्हणजे काळाची मर्यादा संपून जाते.
भूत, वर्तमान व भविष्य या कालांची प्रतीतीच येत नाही.
याक्षणी गुरूसेवा करण्याचाच ध्यास असतो.
मागील पुढील काहीही आठवत नाही.
जसे मृगजळ हरिणांना दिसते म्हणून ते धावत असतात.
तसेच संतसंगतीत राहिले की अज्ञानाचे संसाररूपी मृगजळ नाही आणि संसारातील वासनांमागे पळणेही नाही.
अज्ञान असेपर्यंतच देश-काल आणि वस्तु कल्पित असल्याने ३ काल, भिन्न स्थान व भिन्न वस्तुत्व इ. भ्रामक प्रतीती येत असतात.
ज्ञानेश्वरांचे दर्शन होताच देश,काळ,वस्तु हे तिन्ही परिच्छेद संपून जातात.
आणि एक आत्मवस्तूच अनुभवली जाते.

# संत सहवास

९३

पूजिती पाषाण मानोनिया देव । संतपदी भाव दृढ नाही ।।१।।
ऐसिया पूजका हरि वैरी मानी । देतसे घालोनी नरकात ।।२।।
संतसेवे हरि सर्वभूते होती । अखंड प्रतीति गुरूकृपे ।।३।।
ज्ञानेश्वरसुत जोडोनिया कर । पायाचा किंकर संतांचिया ।।४।।

चिंतन :-

संताच्या ठिकाणी दृढ भक्तिभाव नसलेला.
परमेश्वर म्हणजे ही समोर असलेली दगडाची मूर्ती होय, असे समजणारा.
म्हणजे पाषाणाला ईश्वर समजणारा आणि संतांना कमी लेखणारा
अशा उपासकाने पूजन केले तरी अशा पूजकालाा श्रीहरी आपला वैरी मानतो आणि नरकात टाकतो.
संत हे प्रत्यक्ष ईश्वरच आहेत अशा दृढ निश्चयाने त्यांची सेवा केली म्हणजे सर्व भूतमात्र हरिरूप आहेत असा अखंड प्रत्यय गुरुकृपेने येत असतो.

यासाठीच मी ज्ञानेश्वरांचा पुत्र, हात जोडून संतांच्या चरणांचा सेवक झालो आहे.

### ९४ (आधपद)

**भगवद्वचन...**

हरी सांगे शंकरासी । संत आवडती मसी ।
तैशी नाही रमेपाशी । प्रीति माझी विश्वेशा ।।१।।
ब्रह्मा पोटीचेंचि बाळ । त्यामागे लाविला काळ ।
भक्त करी मी निष्काळ । घननीळा सर्वदा ।।२।।
क्षीरसागरात तप । रमा तपिन्नली अमूप ।
तीही टाकोनिया रूप । गोकुळी म्यां धरियेले ।।३।।
मज भक्तांची आवडी । नाही इतरांची गोडी ।
ज्ञानेश्वरीं हे परवडी । आम्हालागी कथियेली ।।४।।

**चिंतन :-**

भगवान् श्रीहरी शंकरांना सांगतात की जसे संत मला आवडतात तशी प्रीति मी लक्ष्मीवर देखील करीत नाही.

ब्रह्मदेव माझ्या पोटचा मुलगा असूनहि त्याचे मागे मी काळ लावला आहे. पण भक्तांना मात्र मी काळाच्या पलिकडे ठेवले आहे.

हे घननीळा, भक्त सदासर्वदा काळापासून सुटलेले आहेत.

क्षीरसमुद्रात लक्ष्मीने खूप तप केले आहे, पण तिलाहि टाकून देऊन मी गोकुळात गवळ्याचे रूप घेऊन आलो.

मला केवळ भक्तांची आवड आहे. इतरांची गोडी मुळीच नाही.

ही आम्हाला ज्ञानेश्वरतातांनी  दिलेली शिकवण आहे.

### ९५ / संतभेटी

सकळ सुखाचा तेव्हा सूर्योदय । वैष्णवांचे पाय येती घरा ।।१।।
अनंत जन्मीचे फळल्या सुकृत । तेव्हा मिठी संत-पायी पडे ।।२।।
ब्रह्मा विष्णु शिव संताचेचि दास । म्हणुनी तयांस महत्व की ।।३।।
संतकुळी राजा गुरु ज्ञानेश्वर । त्यांचे पायी शिर राहो सदा ।।४।।

**चिंतन :-**

सर्व सुखे ज्यात सामावलेली आहेत अशा ब्रह्मसुखाच्या सूर्याचा उदय झाला म्हणजे

विष्णुभक्त संतांची पाउले घरी येतात.
अनंतजन्मांचे पुण्य फळाला आले म्हणजे संत पायी मिठी पडण्याचा अवसर प्राप्त होतो.
ब्रह्मदेव, विष्णु आणि शंकर हे संतांचेच दास आहेत म्हणून त्यांचे महत्व अधिक आहे.
संतकुळात सर्वश्रेष्ठ राजपद गुरू ज्ञानेश्वरांचे आहे. म्हणून त्याचे चरणावर माझे मस्तक सदैव राहो.

९६

वैष्णवांचे वंशी सुकृताच्या योगे । अवतरती अंगे वैष्णवचि ।।१।।
ज्ञाना अज्ञानाची न ठेविती चाड । वाचे गाती गोड हरिनामे ।।२।।
सोडिती सकळ आंगीचा संसार । करिती उद्धार जना इया ।।३।।
ज्ञानेश्वर कृपे नित्य तृप्त भावे । महीं या स्वभावे विचरती ।।४।।

चिंतन :-
भगवद्‍भक्त वैष्णवांच्या वंशांत पुण्यामुळे वैष्णवच जन्म घेतात.
ज्ञानी असोत की अज्ञानी असोत, ज्ञानाज्ञानाकडे लक्ष न देता, मधुर हरिनामाचे गायन करतात.
स्वतःचा संसार सर्व सोडून देतात आणि या जनांचा उद्धार करतात.
ज्ञानेश्वराच्या कृपासामर्थ्याने नित्य तृप्त होऊन त्याच भावनेने पृथ्वीवर संचार करतात.

९७

तुम्हा संता विनवणी । एवढीच दीनवाणी ।।१।।
मायबापांपरी देवा । माझा सांभाळ करावा ।।२।।
नेणे योग ब्रह्मज्ञान । नेणे आगमोक्त ध्यान ।।३।।
नेणे थोरांचिया उक्ति । नेणे वैराग्य हरिभक्ति ।।४।।
परी एक भरंवसा । चित्ती ज्ञानेश्वरठसा ।।५।।

चिंतनः-
संतांनो तुम्हाला मी दीन होऊन येवढीच विनवणी करतो-
हे देवा, मायबापा, मला सांभाळा.
मी योग जाणत नाही, ब्रह्मज्ञान जाणत नाही.
आगमांनी सांगितलेली ध्यानेहि जाणत नाही.
थोर संतमहात्म्यांच्या वचनातील उपदेश मला माहीत नाही,
मला वैराग्य नाही आणि हरिभक्तीहि नाही.
पण हे ज्ञानदेवा, माझ्या चित्तात जो तुमचा ठसा (प्रतिबिंब) उमटला आहे त्याचाच मला एकुलता एक भरंवसा आहे.

९८

चहूं युगी हरिदास । मूढ जन तारायास ।।१।।
अवतार घेती साचा । हरि स्मरती सुवाचा ।।२।।
न पाहती यातिकुळ । एक आवडे गोपाळ ।।३।।
कोठे दृष्ट कोठे गुप्त । कोठे राहती विरक्त ।।४।।
त्यांच्या कृपे विश्वमान्या । झाली ज्ञानेश्वरकन्या ।।५।।

चिंतनः-
अज्ञानी लोकांचा उद्धार करण्यासाठी चारी युगात हरीचे दास जन्म घेत असतात.
आणि उत्तम प्रकाराने परम प्रेम पाझरणाऱ्या  वाणीने हरीचे स्मरण करीत असतात.
ते जात कोणती, कूळ कोणते याकडे पाहत नाहीत. त्यांना एक गोपाळच आवडतो.
भक्तीमध्ये जातिकुळाचा उच्च नीचपणा पाहणे नसते.
कुठे ते प्रकट दिसतात,
तर कोठे गुप्त रीतीने राहतात
तर कोठे अत्यंत विरक्त असलेले दिसून येतात.
अशा साऱ्या हरिदासांच्या कृपेमुळे-
मी ज्ञानेश्वरांची कन्या सर्व विश्वाला मान्य झाली आहे.

९९

सज्जनांचे गुण करिता वर्णन । वश नारायण होतो जीवे ।।१।।
हरीहूनी थोर हरिदासकीर्ति । गाती प्रेममूर्ति ध्यानगम्य ।।२।।
हरिभक्तसेवा हरिहूनी गोड । प्रत्यय सुगड वेदशास्त्री ।।३।।
ज्ञानेश्वरप्रभु-संमतीच्या गोष्टी । येथ मिथ्या दृष्टि करू नये ।।४।।

चिंतनः-
संतसज्जनांच्या गुणांचे वर्णन केले असता नारायण जीवाभावाने वश होतो.
हरिपेक्षा भक्तांची कीर्ती थोर आहे.
ध्यानावस्थेत प्रेमाची साकार मूर्ति असलेले भक्त भक्तांच्या कथा गातात.
भक्तांची सेवा ही हरिसेवेपेक्षाहि गोड आहे. याचा वेदशास्त्रांनी भक्कम पुरावा दिला आहे.
ज्ञानेश्वरांनी हरिभक्तांच्या कथाकथनाला संमति दिली आहे,
व्यवहारात असंभव वाटणाऱ्या भक्तकथा खोट्या असतील आ मनात शंका देखील उठू देऊ नये.
वेदांतानुसार सारे संतजन सत्यसंकल्प असल्यामुळे त्यांच्या सर्व लीला परमसत्यच असतात.

१००

उचित सत्कर्म कीजे कृष्णार्पण । विरहे लोचनी अश्रू भरी ।।१।।
क्षणभरी नको हरीची विस्मृति । नारदीय भक्ती इचे नाव ।।२।।
मग तया नको कुल याति काही । भागवती पाही वाक्य ऐसे ।।३।।
संतवर्णनाचा अंत्यत उल्हास । श्रीहरीचे दास देव जया ।।४।।
अमोघ दुर्लभ अगम्य सत्संग । तयासाठी अंग झिजे ज्यांचे ।।५।।
ऐसिया रत्नांचे तेज त्रिभुवनी । सेविती कामिनी चारी मुक्ति ।।६।।
चहूं मुक्ति तोचि योग्य वरावया । ज्यांची संतपायावरी प्रीति ।।७।।
ज्ञानेश्वरप्रभु कृपेचा सागर । सर्व संताकार मूर्ति तेचि ।।८।।

चिंतनः-

स्वतःला उचित असलेले जे सत्कर्म करशील तेच श्रीकृष्णाला अर्पण कर आणि विरहप्रेमाने नेत्र अश्रूंनी भरून जाउ दे.

श्रीहरीचे विस्मरण क्षणभर देखील नको. हीच नारदांनी वाखाणलेली भक्ती आहे.

असे करणाऱ्याचे कुल जाती कोणतीहि असली तरी चालते.

कारण भागवतात तसा श्लोकच आहे.

अशांना संतचरित्रे वर्णनात अत्यंत उत्साह असतो.

श्रीहरीवर प्रेम करणाऱ्या भक्तांनाच देवरूपाने ते भजतात.

कधीहि निष्फल न होणारा, दुर्लभ, व आकलन करण्यास अत्यंत कठीण असा हा सत्संग असतो.

अशा सत्संगासाठी जे आपले शरीर झिजवितात,

ते महात्मे अमोल रत्नरूप असून त्यांचे तेज त्रिभुवनात पसरते. सलोकता, समीपता,सरूपता आणि सायुज्य या चारी मुक्ती स्त्रिया प्रमाणे आज्ञाधारक होऊन त्यांची सेवा करतात.

या चारी मुक्तींची वरमाला धारण करण्यासाठी संत चरणांवर प्रीति असलेला वरच योग्य असतो.

ज्ञानेश्वरप्रभु आपण कृपेचे सागर आहात. सर्व संतांच्या रूपाने आपणच आहेत.

१०१

माझेच हे काय कठिण हृदय । पाणी तेहि न ये नेत्रभरी ।।१।।
धन्य नयनभरी काढुनीया जळ । करिती प्रेमळ अभिषेक ।।२।।
सुखे मी जाईन तया लोटांगणी । कीर्तनरंगणी रंगले जे ।।३।।
तयांच्या वाहाणा घेउनिया शिरी । नाम ज्ञानेश्वरी चित्त ठेवू ।।४।।

चिंतनः-

माझे हे हृदय अती कठोर आहे. की माझे डोळ्यात दोन आसवांचीही मारामार.

नेत्रजलाने जे भगवंताला प्रेमाचा अभिषेक करतात कीर्तनाच्या रंगात रंगून जातात, त्यांच्या पायावर मी लोटांगण घालून सुखी होईन. त्यांच्या पायातील वाहणा मस्तकावर घेईन आणि ज्ञानेश्वरांच्या नामस्मरणात चित्त गुंतवीन.

१०२ / संतांची प्रसन्नता

संताची सामुग्री मिळवावयास । नाहीत सायास बहुतही ।।१।।
बायकोस जैसे नथ गळसरी । तैसी नाही खरी चिंता येथे ।।२।।
तृणशय्यासन प्यालाभर पाणी । आणिक चरणी शिर असो ।।३।।
इतुक्याने होती संत ते प्रसन्न । नलगे साधन अन्य काही ।।४।।
ज्ञानेश्वरप्रभु जीवींचा जिव्हाळा । तया कळवळा सर्व असो ।।५।।

चिंतनः-

संत प्रसन्न होण्यासाठी खूप कठीण प्रयत्न करावे लागत नाहीत.

बायकोला नथ गळसरी जशी घालावी लागते तशी काहीच चिंता येथे नसते.

गवताची शय्या आणि आसन, पेलाभर पाणी अन् पायावर मस्तक ठेवले की, थोडक्यात संत प्रसन्न होतात. आणखी कोणतेहि साधन लागत नाही.

ज्ञानेश्वरप्रभु माझ्या जिवाचे जिवलग आहेत. त्यांना मजविषयी अतिशय कळवळा आहे.

१०३

संतांचे संगती आकळे श्रीपति । ऐसी तो प्रतीति बहुतांची ।।१।।
तया मार्गे आम्ही चालतांचि बळे । संतवाक्यफळे हाती घेऊ ।।२।।
संत तेथे विष्णु विष्णु तेथे संत । ऐसा निगमान्त गर्जे स्वये ।।३।।
ज्ञानेश्वरमातृवचन प्रेमळ । करील तात्काळ ब्रह्मरूप ।।४।।

चिंतनः-

संतांचा सहवास आणि त्यांच्या सेवेमुळे भगवंताची प्राप्ती होते असा पुष्कळांचा अनुभव आहे.

त्याच मार्गाने आम्हीहि प्रयत्न पूर्वक गेलो तर संतांच्या उपदेशांचे फळ जो भगवंत तो मिळेल.

संत जेथे असतात तेथेच भगवान् असतात आणि भगवान जेथे असतात तेथेच संत असतात - असे वेदान्त गर्जून सांगतो.

श्रीज्ञानेश्वर माऊलीचे प्रेमळ शब्द तत्काळ ब्रह्मरूप करतील यात काय संशय !

१०४

आत्मप्रीति श्रेष्ठ वर्णिताती वेद । सांगती अभेद बहु खूण ।।१।।
आत्म्याहूनि श्रेष्ठ म्हणावा गोविंद । तेथे प्रेम शुद्ध ठेवावा की ।।२।।
ऐसे वर्णिताती जीवेभावे संत । म्हणूनी निश्चित थोर तेचि ।।३।।
स्वार्थपर वेद आत्मप्रीति सांगे । देवप्रीति सांगे संत वाणी ।।४।। म्हणोनिया वेद तोंडेचि म्हणावा । संताते घालावा दंडवत ।।५।।
वेद तो पुस्तकी ठेवावा झाकून । वंदावे सज्जन प्रेमभावे ।।६।।
वेदाहूनि थोर संतजन कोटी । भागवता पोटी हाचि भाव ।।७।।
संतदृष्टीपुढे उभा नारायण । आणिक साधन तैसे नाही ।।८।।
ज्ञानेश्वरमाय माझी सर्वाभूती । सज्जन ते चित्ती वंदोनिया ।।९।।

चिंतनः-

आत्मप्रीति ही श्रेष्ठ आहे असे वेद म्हणतात.
आणि पुष्कळ रीतीने वेद अद्वैताचा उपदेश करतात.
अद्वैताचे अनेक संकेत दाखवितात.
पण आम्ही म्हणतो -
निर्गुण आत्मप्रीतीपेक्षा सगुण भगवान् व त्यासाठी उद्‌भवलेले प्रेम हेच श्रेष्ठ आहे.
म्हणून प्रेम सगुणावरच ठेवावा.
असे अनुभवपूर्ण जिव्हाळ्याचे बोल बोलणारे संतच थोर होत.
वेद स्वार्थपर आहेत म्हणजे आत्मप्रीति स्वत:साठीच असते याचे वर्णन करतात तर संत आपल्या अमोघ वाणीने देवप्रीति करावी असे सांगतात.
म्हणून वेदांचा उच्चार मुखाने करावा.
आणि संतांना मात्र साष्टांग नमस्कार घालावा.
वेदांना पुस्तकात झाकूनच राहू द्यावे
आणि संतसज्जनांना मात्र प्रेमाने वंदन करावे.
संतसज्जनांची कोटी वेदापेक्षाही थोर आहे असा भागवताचाही आशय आहे.
संतांच्या डोळ्यासमोर नारायण साक्षात् उभा असतो.
आणि त्यांच्या वचनाने मुमुक्षूला आत्मसाक्षात्कार होतो.
यासाठी संतांच्या आशिर्वादाशिवाय इतर सारी साधने अपुरी आहेत, असे कळून येते.
असे असल्याने, मी संतांना मन:पूर्वक वंदन केले. त्यांची कृपा झाली आणि माझी मायमाउली

ज्ञानाई, सर्व चराचर सृष्टीत भरली आहे असा अनुभव आला.

१०५

दरिद्र निमित्त संताच्या भोजना । येताचि पाहुणा धन काढी ।।१।।
ऐसियांचे तोंड न पाहवे कोणी । भेटलिया स्नानीं गंगे जावे ।।२।।
तोचि एक जगी दुरात्मा पातकी । नाही जया निकी साधुप्रीति ।।३
श्रीहरिनिंदक पावले वैकुंठी । रावणादि मोठी दैत्यकुळे ।।४।।
संतनिंदकासी कोठे नाही ठाव । वेदादि स्वभाव न बोलती ।।५।।
आपणा बोलतां न बोलेंचि माय । पुत्रछळे होय क्रोधयुक्त।।६।।
तैसा स्वनिंदका न द्वेषी तो हरी । संतद्वेष्ट्या करी नरकी ने ।।७।।
आळंदीवल्लभे सांगितल्या खुणा । गति संताविना नाही नाही ।।८।।

चिंतन :-

संतांना जेवू झाालण्याचा प्रसंग अेला असतामाझे जवळ काही नाही, मी दरिद्री आहे असे सांगत सुटतो.

पण तेच, घरी नातेवाइक आले तर मात्र धनाच्या गाठी सुटतात.

अशाचे कोणी तोंड पाहू नये आणि असा भेटला तर स्नानासाठी गंगेला जावे.

ज्याच्या मनात संतांविषयी शुद्ध प्रेम नाही तो जगातला एक मोठा दुरात्मा आणि पातकी आहे.

रावणासारखी मोठमोठी दैत्यकुळे श्रीहरीची निंदा करूनहि वैकुंठाला गेलीत.

पण, संतांची निंदा करणाऱ्याला कोठेहि स्थान नाही.

वेदादि देखील त्या दुर्जनांचे विषयी शब्द काढत नाहीत.

दुर्जनांचे नाव घेवू नये, असा त्यांचा स्वाभाविक आग्रह आहे.

स्वतःला बोलले तर आई काही म्हणत नाही पण तिच्या पुत्राचा छळ केला तर मात्र ती रागावते.

तसेच, परमेश्वराची निंदा केली तरी तो शिक्षा करीत नाही, पण संतांचा द्वेष केला तर मात्र देव त्याला नरकात पाठवतो.

आळंदीवल्लभांनी परमार्थ मार्गातील अशा खुणा सांगितल्या आहेत. एकूण काय तर संतसेवेशिवाय परमार्थात गती नाही हेच खरे.

१०६ / भगवंताची संतसेवा

सकळहि तया सापडले सुख । जेणे दिले मुख माझे नामी ।।१।।
रामकृष्ण हरी गोविंदावाचोनी । जागृती स्वप्नी जिव्हा नेणे ।।२।।

षड्रसांचा स्वाद माझ्या नामापुढे । जिव्हेसी नावडे कदाकाळी ।।३।
ऐसियांचे नांव मीही जपी मनी । सर्वस्व देऊनी तयालागी ।।४।।
निजभक्त गोडी मज गोडपणा । बोलत्या वचना हाता न ये ।।५।।
ज्ञानेश्वरप्रभु वचन प्रेमळ । पर्णी व्रजपाळ ऐकुनीया ।।६।।

चिंतनः-

ज्याने आपले मुखात माझे नाव धारण केले त्याला सर्व सुखाचे सार मिळाले.
जागेपणी असो की स्वप्नात असो रामकृष्ण हरि गोविंद इत्यादि वाचून त्याची वाणी काहीच जाणत नाही.
आंबट गोडादि सहा रस देखील जिव्हेला नामापुढे फिक्के होतात.
भगवान म्हणतात- अशा या भक्ताचे नाव मीहि जपत असतो.
माझे सर्वस्व त्याला देतो.
माझ्या भक्तांची मला असलेली गोडी, हीच माझ्यातली खरी माधुरी आहे.
पण ती बोलून दाखवितो म्हटले तर ती शब्दात मावत नाही.
ज्ञानेश्वरमहाराजांचे असे प्रेमळ वचन ऐकून श्रीकृष्णाने त्यांच्या कन्येचा स्वीकार केला.

१०७

तो एक संसार-पार उतरला । जेणे उद्धरला दीनगण ।।१।।
कदाकाळी जो की काम क्रोधलोभा । राहो नेदी उभा जवळीके ।।२।।
तो एक जाहला मोक्षपटी राव । गुरू आणि देव अभिन्न ज्या ।।३।।
तो एक जाहला वेदान्ती पंडित । जेणे दिले चित्त भूतदये ।।४।।
तोचि एक पूज्य तो एक मंगळ । उमाजाश्वनीळ मुखे गाय ।।५।।
तोचि एक धन्य ज्याने तनुमन । केले समर्पण ज्ञानेश्वरी ।।६।।

चिंतनः-

ज्याने दीन लोकांचा उद्धार केला तोच संसाराचे पलीकडे जाऊन त्याने परमार्थ साधला.
तो काम, क्रोध, लोभ या विकारांना आपल्याजवळ येऊ देत नाही.
मोक्षपदाचा राजा तोच होय की ज्याला देव आणि गुरू एकरूप वाटतात.
ज्याचे चित्त भूतदयेने करूण होते तोच खरा वेदान्ती पंडित होय.
जो उमाशंकराचे नाव मुखाने गातो तोच सर्वांना पूज्य.
आणि त्याचेच दर्शन मंगलकारक.
ज्याने आपले शरीर आणि मन ज्ञानेश्वरांचे ठायी समर्पण केले तोच एक धन्य होय.

१०८

केलियावांचोनि संताची संगती । नाकळे श्रीपति कोण्या गुणे ।।१।
पढताहि वेद वाचिता पुराणे । चित्त अभिमाने जाकळीले ।।२।।
पूर्वपुण्ये भेटे संतसमागम । तेव्हा भवभ्रम सर्व जाय ।।३।।
ज्ञानेश्वर कन्या सांगत आवडी । प्रेमाच्या कावडी संतसंगे ।।४।।

चिंतन :-

संताची संगत केल्यावाचून इतर कोणत्याहि गुणाने भगवान् प्राप्त होत नाही.
वेदांचे पठन केले असता, पुराणे वाचली असता, चित्त अभिमानाने भरून जाते. पण जेव्हा पूर्ण पुण्यामुळे संताचा सहवास प्राप्त होतो तेव्हा त्यांच्या उपदेशाने सर्व संसाररूपी भ्रम नाहिसा होतो.
ज्ञानेश्वरकन्या अत्यंत आवडीने सांगते की-
संतसंगामुळे प्रेमाच्या कावडी भरभरून वाहतात आणि तृप्तीला अवसरच रहात नाही, अशी परम प्रेमावस्था प्राप्त होते.

१०९

आपुले सुकृत न उच्चारि वाणी । तया चक्रपाणी आवडता ।।१।।
अवयव जैसे झाकी कुलांगना । न ये अनुमाना साधु तैसा ।।२।।
एकसरे करी अनाथ-उद्धार । आंगी अहंकार येवो नेदी ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या संतरजधूळ । वंदोनिया भाळ कृष्णी वाहे ।।४।।

चिंतन :-

आपण केलेल्या पुण्याचा जो उच्चार करीत नाही त्यालाच कृष्ण आवडतो.
जशी कुलस्त्री आपले अवयव झाकून ठेवते तसा संत स्वतःला झाकून ठेवतात.
एक संत अनाथांचा उद्धार एका क्षणात करतात. पण मी उद्धार केला असा अहंकार मनाला येऊ देत नाहीत.
ज्ञानेश्वरांची कन्या संतचरणांच्या धूळीला वंदन करते. आणि मस्तक कृष्णचरणांवर ठेवते.

११०

तनुमनभावे न सोडी जो वेदा । तयाचिया पदा शिर लावी ।।१।।
दीनास पाहोनी जननीसा धावे । त्याचे गुण गावे वाटे मज ।।२।।
आपपर नेणे जैसा पंचप्राण । तयाचे चरण शिरी माझ्या ।।३।।

सबाह्य अंतर गंगेसा निर्मळ । त्याची रजधूळ प्रिय मज ।।४।।
याहीवरी जीवे गोविन्दाचा सखा । पायीच्या पादुका तयाच्या मी ।।५।।
आळंदीवल्लभ मायबाप गुरू । दंडवत करू तनुमने ।।६।।

चिंतन :-

वैदिक धर्मानुसार जो शारीरीक करणारा आणि मनाने वेदान्त चिंतन करणारा त्याच्या चरणावर मी नतमस्तक आहे.

दीन दुबळ्याला पाहून जो आईप्रमाणे त्याचेकडे धावून जातो त्याच्या गुणांचे वर्णन करावेसे वाटते.

प्राणवायूला जसा आपला आणि परका नसतो - तो प्रत्येकाचेच जीवन चालवितो, त्याची पाऊले माझे शिरावर असोत.

जो मनाने आणि शरीराने गंगेसारखा निर्मळ आहे त्याची चरणधूली मला अत्यंत प्रिय आहे.

वरील चारी गोष्टीबरोबर जो श्रीकृष्णाचा प्रेमाने मित्र झाला आहे. त्याच्या पायाच्या पादुका होण्यात मी धन्य आहे.

आळंदीचे वल्लभ माझे माय बाप आणि गुरु आहेत त्यांना शरीराने मनःपूर्वक दंडवत असो.

१११

अनंत जन्माचे फळले सुकृत । देखिलिया संत डोळेभरी ।।१।।
आपण ते मुक्ति मग लोळे पायी । नाचे शेषशायी मागे पुढे ।।२।।
सकळहि वर्णा मोकळीच वाट । अभेद अलोट हरिप्रेम ।।३।।
ज्ञानेश्वरप्रभु ओळल्यावाचूनी । गाउनी नाचुनी प्राप्ति नाही ।।४।। १११

चिंतन :-

संताचे डोळ्यांना दर्शन होणे म्हणजे अनंत जन्माचे पुण्य फळले असे समजावे.

आपणहून मुक्ती पायी लोळते.

आणि भगवान भक्ताच्या प्रेमासाठी त्याच्या मागे पुढे राहून त्याला सावरतात.

संतसंगतीची ही वाट सर्व जातीच्या लोकांना मोकळी आहे.

या वाटेने जाताना अद्वैत व अलोट असे हरिप्रेम लाभते.

ज्ञानेश्वरप्रभूंची कृपा झाल्याशिवाय नुसत्या नाचण्या गाण्याने भगवंताची प्राप्ती होत नसते.

११२ / आपुले कर्तव्य

संताचे संगती हाता येतो हरी । ऐसे वेद चारी बोभाविती ।।१।।
शब्दाने आरब्ध, शब्दाने हारपे । ज्ञानी सपडपे शब्दमात्र ।।२।।

आपुले कर्तव्य विषयनिरास । सज्जनी विश्वास धरोनिया ।।३।।
शब्दलक्ष्य कळे विषयी विरक्ति । उच्च नाही स्थिति याहुनिया ।।४।।
संतशिरोमणि ज्ञानेश्वर रावो । जन्म जन्म राहो हृदयी माझ्या ।।५।।

चिंतन :-

संताच्या संगतीत राहल्याने श्रीहरीची प्राप्ति होते, असे चारी वेद मोठ्या आवाजात सांगतात. शब्द उच्चारल्या बरोबर सृष्टी उत्पन्न होते आणि (स भुवामित्युक्त्वा भुवमसृजत् ।।)शब्दाने नष्ट होते आणि तेही सारे ज्ञान शब्दमात्रच असते.

आपले कर्तव्य काय तर विषयांचा निरास करणे,

तोही कसा तर सज्जनांवर विश्वास ठेवल्याने विषयरूपताच संपून जाते. विषय हरिरूप होतात. शब्दाचा लक्ष्यार्थ विषयविरहित ज्ञान आहे म्हणजेच म्हणजे ज्याचे ज्ञान

होते त्यासंबंधी असक्ती नसते. विरक्त असून केवळ ज्ञानसंपन्नता असते. यापेक्षा उच्च ज्ञानस्थिति कोणतीच नाही.

अशी उच्च स्थिती प्रदान करणारे संताचे शिरोमणी जे ज्ञानेश्वर महाराज आहेत ते जन्मोजन्मी माझ्या हृदयात निवास करोत.

११३

बंधनाचे नाही नांव । जीवे देव जाहल्या ।।१।।
ऐसी सापडते खूण । संतकरूणा ।।२।।
संतसंग तेव्हा घडे । कृपा जोडे देवाची ।।३।।
गुरू ज्ञानेश्वरपाय । समन्वय सर्वांचा ।।४।।

**चिंतन :-**

जीवत्व जाऊन देवत्व आले म्हणजे बंधन राहतच नाही.

संतजनांच्या करुणेमुळे अशी युक्ती सांपडते.

संताचा सहवास झाला की देवाची कृपा होते.

श्रीसद्‌गुरु ज्ञानेश्वरांचे चरणांचे ठिकाणी परस्पर विरोधी भासणाऱ्या सर्वांचा समन्वय होतो.

११४

अनंत जन्माचे फळले सुकृत । झाली अवचित पायी भेटी ।।१।।
माझे मायबाप तुम्हीच सज्जन । नाही तुम्हावीण गणगोत ।।२।।
आता मज आला पूर्ण भरंवसा । तरेन सहसा भवसिंधु ।।३।।
ज्ञानेश्वरप्रभु कल्पतरु हातां । आल्या भयचिंता हारपली ।।४।।

**चिंतन :-**

अनंत जन्माचे पुण्य कळाला आले आणि अचानक आपल्या पायाची भेट झाली.
तुम्ही साधुसज्जनच माझे मायबाप आहात, तुमचे शिवाय मला कोणी सखे सोयरे नाहीत.
संसाररूपी सागर मी नक्की तरून जाणार असा आता मला पूर्ण भरंवसा आला आहे.
ज्ञानेश्वरप्रभुरूपी कल्पवृक्ष हाती आल्यावर सर्व प्रकारचे भय आणि चिंता हरवल्या.

११५

धन्य दिन आजी देखिला साजणी । पाहिले लोचनी साधुजन ।।१।।
जयांचिया देव मागेपुढे नाचे । अखंडचि वाचे कृष्णनाम ।।२।।
ज्ञानगर्व गेले मुळी हारपोनी । निर्गुणी सगुणी समभावे ।।३।।
जान्हवीहृदय गोविंदसागरी । मिळता लहरी प्रेममय ।।४।।
संतशिरोमणि आळंदीचा राणा । तेथे राही मना जन्मोजन्म ।।५।।

चिंतन :-

आज डोळ्यांनी साधुजन पाहिले आणि हे साजणी, आजचा दिवस धन्य झाला.
अशा त्या साधुसज्जनांचे मागेपुढे श्रीहरी नृत्य करतो, त्यांना सांभाळतो आणि त्यांचे वाणीवर श्रीकृष्णाचे नाम अखंड वास करते.
ज्ञानाचा गर्व मुळापासून हारपून गेला निर्गुणात आणि सगुणात दोहोतही एकच वस्तू असल्याने ज्ञानाचा गर्व पूर्ण नष्ट झाला.
हृदय हे गंगा असून गोविंद हा सागर आहे. प्रेमाची गंगा  भावनारूपी सागरात मिळाली की ज्या लहरी उत्पन्न होतात त्या निव्वळ प्रेममय असतात.
असा अनुभव प्रदान करणारे संताचे शिरोमणी आळंदीचे राणे आहेत.
हे मना तू त्यांचे ठायी जन्मोजन्म निवास कर.

११६

तयाची पाउले धरीन मी शिरि । जयाच्या अंतरी अनुराग ।।१।।
तयाला जाईन जीवे लोटांगणी । आळंदीआंगणी नाचत जो ।।२।।
तयाच्या पाउला होईन पादुका । ज्याचा आत्मसखा स्वामी माझा ।।३।।
तयाचिया सेवे लागो हे जीवित । ज्याचे चित्त-वित्त ज्ञानेश्वर ।।४।।

चिंतन :-

ज्याच्या अन्तःकरणात भक्तिप्रेम आहे त्याच्या पाऊलावर मी मस्तक ठेवीन.
आळंदीच्या अंगणात जो प्रेमाने नृत्य करतो त्याचे ठिकाणी मी जीवाभावाने लोटांगण घालीन.

ज्याचा आत्मसखा जीवीचा जीवलग माझा स्वामी आहे त्याच्या पाऊलासाठी मी पादुका होईन. ज्याचे मन आणि सर्व संपत्ती ज्ञानेश्वरच एक आहेत, त्याच्या सेवेसाठी माझे हे जीवित उपयोगी पडो.

११७

आजचि पाहिजे हाती जों गोविंद । तंव गुरुपद प्रणमावे ।।१।।
आणिक उपाय नाही तिही लोकी । श्रुतिस्मृतिश्लोकी बोलिले हे ।।२।।
योगयज्ञदान अवघे अप्रमाण । न ये तीर्थाटण फळ द्याया ।।३।।
एक संतसंग आकळतो देवा । ऐसेचि उद्धवा कृष्ण सांगे ।।४।।
आळंदीवल्लभ संतशिरोमणि । तयाचे चरणी वास कीजे ।।५।। ११७

चिंतन :-

आजच जर श्रीहरीचा साक्षात्कार हवा असेल तर श्रीगुरुचरणांना भक्तीने शरण जावे.
तिन्ही लोकांत याशिवाय दुसरा उपाय नाही, हे श्रुतिस्मृतीत वर्णन केले आहे.
योग-याग हे सर्व श्रीहरीच्या साक्षात्काराला उपयोगी नाहीत. तीर्थाटनही उपयोगी नाही.
एका संतसंगानेच देव प्राप्त होतो. असे भगवान् कृष्ण उद्धवाला सांगतात.
आळंदीचे स्वामी श्रीज्ञानेश्वरमहाराज सर्व संतांमध्ये श्रेष्ठ आहेत त्यांच्या चरणांचा आश्रय घ्यावा.

११८

तुम्हा सज्जनांची कृपा । भेटवील मायबापा ।।१।।
आणिकांची नाही आशा । वृत्ति धावे दाही दिशा ।।२।।
सर्वस्वाची ओवाळणी । तुमचिया पायाहुनी ।।३।।
स्वामी ज्ञानेश्वरा ताता । नुपेक्षावे मज आता ।।४।।

चिंतनः-

श्रीज्ञानेश्वरमहाराजा, आपली सज्जनांची कृपा मातापिता असलेल्या परमेश्वराला भेटवील.
दुसरा कोणी कृपा करील किंवा साह्य करील ही मला आशाच नाही. पण वृत्ती मात्र भलभलतीकडे धावत असते.
माझ्या सर्वस्वाची तुमच्या पायाहून ओवाळणी करावी.
स्वामी ज्ञानेश्वरा मायबापा, आता माझी उपेक्षा करू नका.

## ११९ / तुलसीदास-स्तुति

**शरीर सांडावे कुर्वंडी करुन । कवितेवरुन जयाचिया ।।१।।**
**रामनाममय झाली ज्याची काया । माझे तया पाया दंडवत ।।२।।**
**रामायण-सुधा-सागर निर्मूनी । केली संयमिनी नित्य ओस ।।३।।**
**तुलसीदास तो कृपेचा सागर । भेटो ज्ञानेश्वर होवानिया ।।४।।**

**चिंतनः-**

**ज्यांच्या कवितेवरून शरीराला ओवाळून टाकावे,**
**ज्यांचे शरीर देखील रामनाममय झाले आहे. त्यांच्या चरणांवर माझे दंडवत असो.**
**रामायणरूपी अमृताचा सागर निर्माण करून त्यांनी यमाची यमपुरी देखील ओस रिकामी करून टाकली.**
**असे ते कृपेचे सागर तुलसीदास मला ज्ञानेश्वरांच्या रूपाने येऊन दर्शन देवोत.**

## १२० / देवाचे मनोगत

**मजपाशी नाही द्याया मजवीण । आघवेचि आन जीवकृत ।।१।।**
**जीवाचेचि जीवां सुफळ देवोन । मज मोठेपण नसतेचि ।।२।।**
**ऐसिया श्ववृत्ति कंटाळला देव । मग धरी हांव साधुसेवे ।।३।।**
**कोठे धूत घोडे कोठे काढी पात्र । ज्ञानेश्वरपुत्र जाणती हे ।।४।।**

**चिंतनः-**

**देव म्हणतात -मी सोडूनमजजवळील साऱ्या वस्तू जीवानेच निर्मिलेल्या आहेत. मी जीवाला जीवनिर्मित वस्तूच उपासनेचे फळ म्हणन देत असतो.**
**आणि मला मोठेपणानपणा मिळतो. असे झाल्याने देव कंटाळली आणि त्यांनी संतसेवा करण्याचे ठरविले. त्यांनी कोठे अर्जुनाचे घोडे धुतले तर धर्मराजाचे यज्ञात जेवणावळीती उष्टी पात्र उचललीत. महाराज म्हणतात हे देवा, तुझ्या यासाऱ्याकथा आम्हाला माहीत आहेत.**

## १२१

**कृतयुगी धर्म तप अनुष्ठान । तेणे नारायण आकळेना ।।१।।**
**त्रेतायुगी धर्म यज्ञाचमी आवडी । तेणे स्वर्गगुढी हरीविण ।।२।।**
**द्वापरी तो धर्म दास्यत्व करणे । नारायण तेणे अल्पतृप्त ।।३।।**
**कलीमाजी धर्म तीर्थव्रतदान । तेणे नारायण संतोषेना ।।४।।**
**म्हणोनिया येती श्रीहरीचे दास । युगायुगी वास करोनिया ।।५।।**

उद्धरिती जन करूणेच्या बळे । जाहले सोज्वळे नारायणी ।।६।।

हरिपायी प्रेमा अन्य नसे ठाव । ज्ञानेश्वरी भाव दृढ ज्यांचा ।।७।। १२१

चिंतन :-

तप आणि अनुष्ठान हे कृतायुगातील धर्म. यांनी परमेश्वर प्राप्ती होत नाही.

त्रेतायुगींच्या यज्ञधर्माने श्रीहरिप्राप्ति ऐवजी स्वर्ग मिळतो.

द्वापारातल्या दास्य धर्माने नारायण थोडासा तृप्त होतो.

तीर्थयात्रा, व्रते आणि दान या कलियुगातील धर्माने नारायणाचा संतोष होत नाही.

म्हणून श्रीहरीचे भक्त सर्व युगात राहण्याला येतात आणि लोकांवर दया करून उद्धार करतात. आणि नारायणाचे ठिकाणी सोज्वळ होऊन मिळून जातात.

ज्ञानेश्वरांवर ज्यांचा दृढभाव आहे त्यांचे शिवाय हरिचरणांच्या प्रेमाला दुसरे वसतिस्थान नाही.

१२२

धन्य तेचि जाती धन्य तेचि कुळ । जन्मला प्रेमळ विष्णुभक्त ।।१।।

रामकृष्णहरि गाती सदा मुखे । संतसंग सुखे आवडती ।।२।।

विषयाची चाड दिधली सोडोनी । निजात्मा जोडोनी ज्ञानगम्य ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या ऐसियांचे पायी । लोळे शेषशायी भेटावया ।।४।।

चिंतन :-

ज्या जातीमध्ये, ज्या कुळामध्ये प्रेमसंपन्न विष्णु भक्ताने जन्म घेतला, ती जाती, ते कुळ धन्य होय.

ते रामकृष्णहरी ही हरिनामे अखंड गात असतात आणि संतसंगतीत राहणे आवडते.

केवळ आत्मज्ञानाने प्राप्त होणारा आत्मा मिळवून विषयांची इच्छा ज्याने सोडून दिली आहे. त्याच्या चरणांवर ज्ञानेश्वरांची कन्या लोटांगण घालते - कशासाठी तर भगवान विष्णूची प्राप्ती होण्यासाठी.

१२३

तीव्र व्रत दान ज्ञान । योग जप तप ध्यान ।।१।।

भेटविती न गोविंदा । म्हणोनिया संत वंदा ।।२।।

संतसंगतीने किती । उद्धरिले नाही मिती ।।३।।

देव दानव मानव । स्त्रिया पक्षी जड जीव ।।४।।

ज्ञानेश्वरकन्या म्हणे । संता साहाय्य मागणे ।।५।।

चिंतन :-

कडक व्रते, खूप दान देणे, ज्ञान मिळविणे, योगमार्गाने मंत्राचा जप किंवा ध्यान ही सारी साधने भगवंताला प्राप्त करून देत नाहीत. म्हणून संतांच्या मार्गदर्शनाप्रमाणेच वागले पाहिजे.

संतसंगाने कितीक उद्धरले, त्यांचे मोजमाप नाही.

देव, प्रल्हादि दानव, मनुष्य, स्त्रिया, पक्षी आणि जड जीवांचाहि उद्धार संतसंगतीने होतो.

म्हणून ज्ञानेश्वरकन्या म्हणते संतांना सहाय्य मागा आणि भगवत्प्राप्ती करून घ्या.

१२४

देवाच्या पूजेला बैसला आपण । तो आले सज्जन घरालागी ।।१।।
सांडोनिया पूजा जावे संतघरी । लोटांगणी परी क्षणोक्षणां ।।२।।
संतवाक्यासाठी बिदोबिदी हरी । नांदे घरोघरी ऐसे वाटे ।।३।।
ज्ञानेश्वरस्वामी आलिया प्रत्यया । मग अंतर्बाह्य देवराया ।।४।।

चिंतन :-

आपण देवपुजेला बसलो असताना जर सज्जन आले तर पूजा सोडून संतांचे घरी जावे आणि त्यांना वारंवार लोटांगण घालावे.

संताचे वाक्य खरे करण्यासाठी घरोघरी उंबरठ्यावर श्रीहरीचा प्रत्यय येतो.

असा ज्ञानेश्वर स्वामींचा प्रत्यय आला म्हणजे आंत आणि बाहेर देवरायाचा अनुभव येऊ लागतो.

१२५

जरी तुझे चित्ती सुखाची आवडी । तरी तूं सावडी संतरंज ।।१।।
आणिक सायास सोडोनि सकळ । होई ध्यानशीळ श्रीगुरूचा ।।२।।
आळंदीच्या वाटे खेळे लोटांगण । देई आलिंगन सिंहासना ।।३।।
ज्ञानेश्वरनांवे भरी श्वासोच्छवास । प्यावा ब्रह्मरस ब्रह्मत्वेचि ।।४।।

चिंतन :-

तुला चित्तात जर सुखाची इच्छा असेल तर तू संतांच्या पायांची धूळ जमा करून आदराने मस्तकी धारण कर.

सर्व प्रकारचे इतर प्रयत्न सोडून देऊन श्रीगुरूच्या ध्यानाची संवय लावून घे.

आळंदीच्या वाटेवर लोटांगणे घाल. आळंदीच्या माऊलीच्या सिंहासनाला म्हणजे समाधीला आलिंगन दे.

प्रत्येक श्वासागणिक ज्ञानेश्वरांचे नाम घे. आणि स्वतः ब्रह्म होऊन मग ब्रह्मरसाचे पान कर.

१२६

तोचि एक संत म्हणू त्रिभुवनी । ज्याची नारायणी वृत्ति दृढ ।।१।।
आणिक सर्वथा नाही मनी आशा । एका जगदीशा वांचोनिया ।।२।।
सकळ सुखाचा स्वामी पांडुरंग । तोडियला संग षडरींचा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या नमी त्याचे पाय । आणिक उपाय सांडूनिया ।।४।।

चिंतन :-

ज्याच्या सर्व वृत्ती नारायणाचे ठिकाणी दृढ आहेत. म्हणजे कोणतीहि वृत्ति सगुण परमेश्वरावाचून इतरत्र जातच नाही तोच त्रिभुवनात एक संत आहे असे आम्ही म्हणतो.

आता माझ्या मनामध्ये एका जगदीशावाचून दुसरी कोणतीहि आशा नाही.

ज्याने षड्रिपूंची (काम-क्रोध-लोभ-मोह-मद-मत्सर) संगती सोडून दिली तोच सकळ सर्वोच्च सुखाचा पांडुरंग स्वामी होय.

आणखी इतर सर्व परमार्थाचे उपाय सोडून देऊन ज्ञानेश्वरकन्या त्याचे चरणी वंदन करते.

१२७

आजी आनंदाचा दिन । घरी आलेती सज्जन ।।१।।
मुखी नाम हाती टाळ । गळा तुळशीची माळ ।।२।।
आंगी झालेती अद्वैत । वरी हरिपायी प्रीत ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या संती । अधिष्ठिली स्वात्मशांति ।।४।।

चिंतन :-

घरी संतजन आलेत म्हणून आज खरा आनंदाचा दिवस आहे.

गळ्यात तुळशीची माळ, हातात टाळ आणि मुखात नाम असलेले हे संत.

हे अद्वैतरूप होऊन राहिले असून हरीचे चरणावर प्रेम असलेले असे आहेत.

आत्मशांती ही संतांच्या ठिकाणी अधिष्ठान रूपाने आहे किंवा आत्मशांतीला संत हेच आधार आहेत.

असे ज्ञानेश्वरकन्या सांगते.

१२८ (आधपद)

ऐसा पवित्र तो कोण । संतपायी इच्छी स्नान ।।१।।
जयापायी शतगंगा । येती घेवोनी श्रीरंगा ।।२।।
ज्याच्या चरणीची माती । सुरमुनि वंदिताती ।।३।।

**ज्ञानेश्वर मायबाई । सर्व संता जन्मदायी ।।४।।**

**चिंतन :-**

संतांच्या चरणाने पवित्र झालेल्या जलात स्नानाची इच्छा करणारा भाग्यवान कोण आहे बरे!

संतचरणाचे तीर्थात शेकडो गंगास्नानाचं पुण्य आहे.

कारण ते श्रीरंगाला भेटवून देतात.

त्यांच्या चरणाच्या धूळीला देवमुनी वंदन करतात.

सर्व संतांची माता म्हणजे ज्ञानेश्वर माउली हीच आहे.

१२९

**भूषण काजळ दोन्ही बाळ नेणे । माउलीच जाणे सर्व काही ।।१।।**
**सदगुण दुर्गुण नेणताती भक्त । एक भगवंत ओळखीत ।।२।।**
**भूषणाचे सूख मायेच्या नयना । तेवी नारायणा भक्तसुख ।।३।।**
**बाळासी तो मायेवाचोनिया नाही । तैसा शेषशायी भक्तिमंता ।।४।।**
**आळंदीवल्लभे सांगितले गूज । बोलिले सहज तुम्हापुढे ।।५।।**

**चिंतन :-**

लहान लेकराच्या डोळ्यात काजळ घला की त्याला अलंकार घाला त्याला काही कळत नाही. त्याच्या आईलाच सर्व काही त्याचा आनंद असतो.

स्वतःचे सद्‌गुण किंवा दुर्गुण भक्त जाणत नाही. एक भगवंतच त्यांना ओळखीत असतो.

दागिण्यांचे सुख आईच्या डोळ्यांना होते. त्याप्रमाणे भक्ताचे सुख नारायणाला होते.

बाळाला आईवाचून काही नको असते, तसे भक्तांना एक भगवानच प्रिय असतो.

आळंदीवल्लभांनी हे गुह्य जे मला सांगितले ते तुम्हाला सहजपणे सांगत आहे.

१३०

**नवल हा देव भक्तीसाठी पिसा । करु नये तैसा करी कामे ।।१।।**
**रोहिदासा घरी रंगवी कातोडे । चोख्यामेळ्यापुढे ढोरे ओढी ।।२।।**
**सजनाचे घरी मांसाचा विकरा । करिता उजारा लाज नाही ।।३।।**
**गोपीमध्ये नाचे निरिया धरोनी । मुळी उपेक्षूनि मोठेपणा ।।४।।**
**तो माझ्याकरिता धावया आळसा । करील सहसा हे न घडे ।।५।।**
**माझा मज नाही चित्ती भरंवसा । तुज जगदीशा नाही बोल ।।६।।**

परंतु स्वीकारा भलतिये रीती । आळंदीच्या पती आर्तबंधो ।।७।।

चिंतन :-

नवलाचे असे की हा सगुण परमेश्वर भक्तिसाठी वेडा आहे. त्या विश्वानियंत्याने जी कामे करू नयेत ती तो करतो.

रविदास भक्ताचे घरी मेलेल्या जनावराचं कातडे रंगवतो.

चोखामेळासाठी मेलेली ढोरे ओढत नेतो.

सज्जनकसायांचे घरी रजरोसपणे मांस विकताना त्याला लाज वाटत नाही.

रासात गोपींच्या निरिया धरून -आपल्या मोठेपणाची उपेक्षा करून नाचतो.

तो माझ्यासाठी धावून येण्यास आळस करील, हे कधीच शक्य नाही.

पण मलाच माझ्या चित्ताचा भरंवसा नाही त्यामुळे तू आला नाहीस तर तुला कसे बोल लावणार!

पण हे आळंदीच्या नाथा, आर्तबंधो, मी कसाही असलो तरी माझा स्वीकार करा.

१३१

संतांचे संगती आकळे मुकुन्द । पद वाक्य शब्द ब्रह्ममय ।।१।।

आणिक उपाय सर्व उधाराचे । एकविध साचे दृष्टी आले ।।२।।

आळंदीवल्लभ सज्जन सोयरा । मागेपुढे खरा रक्षो माते ।।३।।

चिंतन :-

संतांचया संगतीने श्रीहरीची प्राप्ति होते-

संताचे शब्द वाक्य पद वगैरे सर्वच वेदरूप असतात.

संतसंगति शिवाय सर्व इतर उपाय हे केवळ आश्वासनेच देतात, हेच एक दिसून येते.

आळंदीवल्लभ हेच खरे सज्जन आणि खरे आप्त आहेत तेच मागे पुढे माझे रक्षण करोत.

१३२

भाग्योदय झाला । संतमेळा गृही आला ।।१।।

नाही नाही आन लाभ । मायासागरी अक्षोभ ।।२।।

संत-वचनाच्या पायी । वनी नांदे शेषशायी ।।३।।

माये आळंदीवल्लभे । कडिये घे मज लोभे ।।४।।

चिंतनः-

संतमंडळी घरी आली हाच माझा खरा भाग्योदय.

मायारूपी सागर शांत झाला - याच्याहून अधिक लाभ तो कोणता?

संतवचनाच्या सामर्थ्याने रासक्रीडेसाठी श्रीहरी वनात येतो, याहून अधिक काय हवे? हे माये आळंदीवल्लभे मला लोभाने कडेवर घे ना!

## ५. सद्‌गुरुमहिमा

१३३

सकळ योगाच्या स्वामी अष्टसिद्धि । त्यांचा कृपानिधि हरी एक ।।१।।
हरीचाही स्वामी दाता गुरुरावो । पाहे पुत्रभाव शिष्यासी जो ।।२।।
ऐसी माउली का सांडोनी धुंडावे । उगेचि मरावे श्रमामाजी ।।३।।
सकळ मिळोनी म्हणा ज्ञानेश्वर । वाक-काय-अंतर ऐक्य करा ।।४।।

**चिंतन :-**

अष्टसिद्धी या सकळ योगांच्या स्वामिनी आहेत. पण त्यांचेवर कृपा करणारा जो आहे तो हरी आहे.

आणि हरीला प्राप्त करून देणारा दाता श्रीगुरुराणा आहे. तो शिष्यांना पुत्रभावाने सांभाळतो. ऐसी गुरुमाऊली सोडून इतरत्र कशाला शोध घ्यावा आणि मरेस्तोपर्यंत श्रम कशाला करावे? सर्व मिळून ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर म्हणा, आणि शरीर, वाणी व अंतःकरण यांना हरिरूप करा.

१३४

प्रयत्न करोनी गुरु हाती आणा । मग नारायणा प्रिय तुम्ही ।।१।।
देव मिळण्याचा नलगे प्रयत्न । साह्य गुरु पूर्ण होता एक ।।२।।
सूर्य येता घरा दीपाचा प्रयत्न । सांगा करी कोण आजवरी ।।३।।
अनंत दिव्यांची समष्टि तो भानू । प्रकाशी सदनू म्हणोनिया ।।४।।
तैसा गुरुराव अनंत शिष्यांसी । कृपे हृषीकेशी दान देत ।।५।।
म्हणोनी सदगुरू हरीची समष्टि । तो भेटता व्यष्टि कांहो घेतां ।।६।।
समष्टि घरासी आलिया सदगुरू । मग शारंगधरू पायी लोळे ।।७।।
नुस्ता हरी घेता एकदेशी भेटे । व्यापक प्रकटे गुरुकृपे ।।८।।
म्हणोनिया आता पिटोनिया टाळ । ज्ञानेश स्नेहाळ नाम गावे ।।९।।

चिंतन :-

प्रयत्न करून श्रीगुरूंना स्वाधीन करून घ्या म्हणजे तुम्ही नारायणाला प्रिय व्हाल.
श्रीगुरु एकदा साह्य झाले की देव मिळण्यासाठी वेगळा प्रयत्नच करावा लागत नाही.
उजेड करण्यासाठी सूर्य उगवला असता कोणी दीप लावण्याचा प्रयत्न करतो काय? सांगा बरे.
अनंत दिव्यांचा समष्टि एकत्र असलेला सूर्य घरात प्रकाश करतोय ना!
त्याप्रमाणे गुरुमहाराज आपल्या अनंत शिष्यांना श्रीहरीचे दान देत असतात.
म्हणून सद्‌गुरु हेच भगवंताचे समष्टीरूप आहेत. तेव्हा गुरु भेटल्यानंतर पुनः एकदेशीय दिसणाऱ्या व्यष्टीला कशाला घेता!
समष्टिरूप गुरु घरासी आल्यावर मग भगवान् विष्णु भक्ताच्या पायी लोळू लागतात.
नुसत्या श्रीहरीची प्राप्ती झाली तर तो एकदेशी भेटतो. आणि तोच व्यापक आहे. हे गुरुकृपेमुळे कळते.
म्हणून आता टाळ्या वाजवून स्नेहमय ज्ञानराज माऊलीचे प्रेमपूर्ण नामाचे गायन करा.

१३५

देव तो सगुण संत ते निर्गुण । म्हणोनि चरण त्यांचे वंदू ।।१।।
देवाहूनी गुरू श्रेष्ठ सांगे श्रुति । ती शुद्ध प्रतीति अभंगी या ।।२।।
देव तो साकार ध्यात्याच्या आधीन । गुरू तो निर्गुण ध्यातृसाक्षी ।।३।।
साधर्म्य वैधर्म्य चुकला सिद्धांत । अभेदचि पंथ शुद्ध एक ।।४।।
दोन डोळे परी एक दिसे वस्तु । दो ओठी निघतू एक शब्दू ।।५।।
तैसे द्वैतामध्ये पहावे अद्वैत । परम सिद्धान्त निगमाचा ।।६।।
ज्ञानेश्वरकृपेवीण हाता न ये । म्हणोनिया पाय वंदू त्यांचे ।।७।।

चिंतन :-

देव हा सगुण असतो, आणि संत ते निर्गुण असतात. म्हणून सद्‌गुरूंचे चरणांना वंदन करू.
वेद सांगतात की देवाहून गुरु हे श्रेष्ठ आहेत. तीच शुद्ध प्रतीति कशी आहे ते मी येथे सांगतो.
ध्यान करणाऱ्याचे अधीन देव असतो. परंतु गुरु हे निर्गुण असून ध्यान करणाऱ्यालाही जाणणारे साक्षी असतात.
पण जाऊ द्या, गुरु आणि देव यांच्यात समता आहे की वेगळेपणा आहे या चर्चेत काही अर्थ नाही. हा साधर्म्य वैधर्म्याचा सिद्धान्त चुकीचा आहे. येथे सर्व अभेदच आहे.
गुरु - ध्याता - देव हे तीन वाटले तरी सर्व एकच आहेत.
ध्यात्याकडून देवाकडे जाणे हा एकच प्रवास आहे.

दोन डोळे असले तर वस्तु एकच दिसते. ओठ दोन असले तरी त्यातून शब्द एकच निघतो. त्याप्रमाणे द्वैतामध्ये अद्वैत पहावे हाच वेदान्त सिद्धान्त आहे.
परंतु हा सर्व सिद्धान्ताचा अनुभव ज्ञानेश्वरगुरुकृपेशिवाय हाती येत नाही. म्हणून आता त्यांचे पायांना वंदन करू.

१३६

सूर्य नित्य देतो सर्वांसी प्रकाश । परी आंधळ्यास उमजेना ।।१।।
तयासी पाहिजे वैद्यचि निधान । केवळ सूर्यउष्ण कामा न ये ।।२।।
तैसा सर्वांपुढे उभा नारायण । परी अहंपण दिसूं नेदी ।।३।।
तैसा व्हावा गुरू दीनबंधु तात । अंजन घालीत तोचि डोळां ।।४।।
तेणे कृष्णसूर्य डोळ्यांमाजी भरे । मग या तिमिरे मरिजेचि ।।५।।
त्रिभुवनी गुरू ज्ञानेश्वरमाय । हृदयी ते पाय सदा राहो ।।६।।

चिंतन :-
सूर्य सर्वांना नेहमी प्रकाश देतो परंतु आंधळ्याला ते कळत नाही.
त्याला सूर्याचा प्रकाश जाणण्यासाठी नेत्रांवर वैद्याचाच उपचार हवा.
केवळ सूर्याच्या उष्णतेने सूर्याचा प्रकाश समजू शकत नाही.
तसा सर्वांपुढे साक्षात नारायण उभा असतो पण आपला अहंकार ते कळू देत नाही.
तसेच गुरु हे दीनबंधु आणि पिता होऊन डोळ्यात अंजन घालतात.
तेव्हा मग कृष्णरूपी सूर्य डोळ्यामध्ये भरून जातो.
मग अंधःकार मरून जातो.
त्रिभुवनात सर्वत्र गुरु ज्ञानेश्वर माउली भरली आहे.
त्यांची पाऊले माझे हृदयात अखंड राहोत.

१३७

सद्गुरुचे पायी नाही दृढभाव । पूजो जाती देव पाषाणाचे ।।१।।
हरि म्हणे वैरी तेचि माझे जाणा । संतपायी मना न देती जे ।।२।।
सद्गुरूवाचोनी सफळ जीवित । नाही हा सिद्धान्त वेदशास्त्री ।।३।।
ज्ञानेश्वरी कळवळा अघटित । परिच्छेदातीत पूर्ण करी ।।४।।

चिंतन :-
सद्गुरूचे पायी दृढनिष्ठा नाही आणि दगडाचे देवांवर निष्ठा ठेवून त्यांची पूजा करणारे असे जे असतात त्यांना श्रीहरी स्वतःचे वैरी समजतो. कारण त्यांचे मनाची भावना संतांचे चरणांचे

ठिकाणी नसते.

सद्गुरु शिवाय जीवन सफल होऊच शकत नाही हा वेदशास्त्रांचा सिद्धांत आहे. ज्ञानेश्वर गुरुमाऊलीचे ठिकाणी अघटित कळवळा आहे. ते शिष्याला अमर्यादा करुणेने पूर्ण करतात.

१३८

जैसा देव तैसा गुरू । ऐसा श्रुतीचा निर्धारू ।।१।।
देव न दावी सदगुरू । गुरू दावी शारंगधरू ।।२।।
म्हणोनि सदगुरू महिमा । नाही कळला निगमा ।।३।।
देवाहुनी गुरू श्रेष्ठ । श्रुति उणे बोले स्पष्ट ।।४।।
ज्ञानेश्वरप्रभु तात । सर्ववेद अधिष्ठित ।।५।।

चिंतन :-

श्रुतींनी असे निश्चित केले आहे की जसा देव तसेच गुरु.
परंतु - देव गुरुप्राप्ति करून देत नाही, उलट गुरु देवाची प्राप्ति करून देतात.
म्हणूनच सद्गुरुचा महिमा वेदांनाहि कळला नाही असे दिसते.
खरोखर देवाहून गुरु श्रेष्ठ आहेत - म्हणून वेद पूर्ण वस्तुस्थिती सांगत नाहीत.
माझे सद्गुरु पिता ज्ञानेश्वरप्रभू हे सर्व वेदांना आधार आहेत. म्हणून त्यांना शरण जावे.

१३९

सकळही गोत माझे अलकापुरी । वैकुंठाभीतरी नाही कोणी ।।१।।
मृत्युलोकी भक्ति अभिमानातीत । तैसी वैकुंठात न दिसे की ।।२।।
हरिसंन्निधाने अभिमानी लोक । म्हणताती मूर्ख मर्त्य भक्तां।।३।।
म्हणोनिया हरि म्हणे नारदास । मज वैकुंठास न गमे रे ।।४।।
ऐसी कृष्णाप्रती अभिमान भीती । तैसी आम्हांप्रती न दिसे की ।।५।।
गुरूकृपे हरि झाला अभिमान । परि गर्वपण न ये तेथे ।।६।।
ऐसी ज्याची सत्ता तया गुरूपाया । ओवाळिली काया जीवेभावे ।।७।।
चला गे सख्यांनो आधी अलकावती । सद्गुरुची मूर्ति दृष्टि पाहा ।।८।।
मग कृष्णासहित क्षेत्रवृंदावन । येईल धावोन सेवेसाठी ।।९।।
ज्ञानेश्वरकृपे तुम्हा ही प्रतीती । दावावया चिंती येथेचि वो ।।१०।।

चिंतन :-

माझे सर्व गणगोत आळंदीला आहे, वैकुंठात कोणीहि नाही

मृत्युलोकातली भक्ती अभिमान रहित आहे, पण वैकुंठात मात्र अभिमानपूर्ण भक्ती दिसून येते. हरीचे सान्निध्य असल्याने तेथील भक्तांना त्याचा अभिमान वाटतो आणि ते मर्त्यलोकांतील भक्तांना मूर्ख समजतात.

म्हणून श्रीभगवान नारदांना म्हणतात की मला वैकुंठात करमत नाही.

याप्रमाणे श्रीकृष्णाला भक्तांच्या अभिमानाचे भय वाटते. मर्त्यलोकांत मात्र अहंकाररहित भक्ती दिसून येते.

गुरूंच्या कृपेने आमचा अभिमान हाच हरिरूप होऊन जातो म्हणून तेथे गर्व उत्पन्नच होत नाही.

अशा ज्या गुरूपावलांची सत्ता आहे त्या पावलांना माझी ही काया जीवेभावे ओवाळून टाकतो.

हे सख्यांनो, आधी आळंदीला चला. श्रीगुरूची मूर्ति डोळ्याने पहा.

असे केल्यावर भगवान कृष्णासहित संपूर्ण वृंदावन क्षेत्र तुमच्या सेवेसाठी धावून येईल.

ज्ञानेश्वरांच्या कृपेमुळे हा अनुभव येण्यासाठी येथे आत्मचिंतन करा.

१४०

सदगुरुच्या कृपें जाण । घरी येत वृंदावन ।।१।।
तैसी न ये अलकावती । म्हणूनी जावे तया क्षिती ।।२।।
गुरूकृपे नारायण । अवघे प्रकटी पै मन ।।३।।
तैसा नोहे ज्ञानेश्वर । शरण चला तेथवर ।।४।।

चिंतन :-

सद्‌गुरुंनी कृपा केली की वृंदावनातील भगवान वृंदावनासह घरी येतात.

पण तशी आळंदी घरी येत नाही म्हणून तिथे गुरुदर्शनाला, आळंदी क्षेत्राला स्वतःच गेले पाहिजे.

गुरुकृपेमुळे मनाने ध्यान केले असता नारायण वैकुंठादी सर्व प्रकट होतात.

म्हणून श्रीगुरु ज्ञानेश्वर महाराजांचे जवळ चला. त्यांना शरण जा. म्हणजेच सारे काही प्राप्त होईल.

१४१ / जावे अलकावती

जया लागी शक्ति । तेणे जावे अलकावती ।।१।।
जे कां नि:शक्त पामर । त्यांनी स्मरोनी ज्ञानेश्वर ।।२।।
होय हृदय अलकावती । प्रगटेल गुरूमूर्ति ।।३।।

आळंदीसी चला चला । ज्ञानेश्वर मुखी बोला ।।४।।
तेणे न ये दुजा जन्म । ऐसे वदले तुकाराम ।।५।।
तेचि प्रमाण वचन । मानुनीया हे स्मरण ।।६।।
ज्ञानेश्वर मुखी नाम । ज्ञानेश्वरपायी प्रेम ।।७।।
ज्ञानेश्वर जीवभाव । ज्ञानेश्वर गुरूदेव ।।८।।
ज्ञानेश्वराचे दर्शन । तेव्हा देह नारायण ।।९।।
ऐसा माझा अनुभव । ज्ञानेश्वर कृपाठाव ।।१०।।
ऐसी आज्ञा ज्ञानेश्वर । देवोत की एकसर ।।११।।
लोकां देउनि ज्ञानेश्वरी । ज्ञानेश्वर विश्व करी ।।१२।।
विश्वप्रतीति साजिरी । ज्ञानेश्वररूपे येरी ।।१३।।
विश्व झाले ज्ञानेश्वर । आम्ही दासचि सुंदर ।।१४।।
विश्वदास्य घडे जेव्हां । जाय विरोध तो तेव्हा ।।१५।।
मग विश्व नारायण । ज्ञानेश्वर अधिष्ठान ।।१६।।
ऐसी ज्ञानेश्वरमाळा । गुरू स्तवी मिळुनी मेळा ।।१७।।
ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर । मुखी म्हणा एकाकार ।।१८।।
ज्ञानेश्वर नामे टाळी । पिटा देहगर्व होळी ।।१९।।
ज्ञानेश्वर पायी शेखी । व्हावे अर्पण एकाएकी ।।२०।।

चिंतन :-

ज्याला आळंदीला जाण्याची शक्ती आहे त्याने आळंदीला जरूर जावे.
ज्याला शक्ती नाही अशा पामराने ज्ञानेश्वरांचे स्मरण येथे करीत राहावे.
स्मरणाने हृदयच आळंदीरूप होऊन जाईल आणि तेथे गुरूमूर्ती प्रकट होतील.
चला आळंदीला चला अन् ज्ञानेश्वरांचे नाव मुखाने घेत राहा.
असे केल्याने दुसरा जन्मच होत नाही असे तुकाराम महाराज निश्चयाने सांगतात.
ते तुकारामांचे वचन प्रमाण मानून स्मरण करीत रहा -
ज्ञानेश्वरांचे नाम मुखात असो आणि त्यांचे पायावर प्रेम असो.
माझा जीवभाव म्हणजे श्रीज्ञानेश्वरच होत आणि गुरूदेवहि तेच आहेत.
ज्ञानेश्वरांचे दर्शन झाले की आपला देहही नारायणरूप आहे असा अनुभव येतो.
ज्ञानेश्वरांच्या कृपेनेच मला असा अनुभव आहे.

येथे तू ब्रह्म आहेस असा अनुभव घेण्याची आज्ञा ज्ञानेश्वर महाराजांनी एकदम सर्वांना द्यावी म्हणजे लोकांना ज्ञानेश्वरी देऊन सर्व विश्वच ज्ञानेश्वररूप आहे असे अनुभवाला आणून द्यावे, हीच त्यांचे चरणी प्रार्थना!

मग सर्व विश्वप्रतीति ज्ञानदेवरूपाने भासू लागते.

अशा प्रकारे सर्व विश्वात ज्ञानेश्वर दिसू लागले तरी सुद्धा आम्ही दासच राहू.

मग ज्ञानेश्वर रूपाने सर्व विश्वाची सेवा केली की परस्पर विरोधच नाहीसा होतो.

मग सारे विश्व नारायण असल्याचा अनुभव आला की त्याचे अधिष्ठान श्रीज्ञानेश्वर आहेत असाहि अनुभव येतो.

अशी ज्ञानेश्वरांच्या जपाची माळा जपून गुरूची स्तुती सर्वांनी मिळून करावी.

ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर मुखाने म्हणा आणि त्यांचेशी एकरूप व्हा.

ज्ञानेश्वर म्हणून टाळ वाजवा म्हणजे देहाभिमानाची होळी होऊन जाईल.

याप्रमाणे शेवटी ज्ञानेश्वर चरणांचे ठिकाणी स्वतःला पूर्ण अर्पण करा.

## १४२ / गोपिकांची रीती

जेव्हा गुरू कृपावंत । तेव्हा घरा येती संत ।।१।।
मग तयांचिया मेळे । मध्ये नाचे चित्सांवळे ।।२।।
जेथे जेथे जाय दृष्टि । तेथे कृष्णरूप सृष्टि ।।३।।
कृष्णरूप जीवभाव । कृष्ण आणी आत्माराव ।।४।।
गेला कृष्ण कृष्णभक्त । अवघा झाला कृष्णनाथ ।।५।।
गोपिकांची ऐसी रीती । ज्ञानेश्वरकन्यायुक्ति ।।६।।

चिंतन :-

जेव्हा श्रीगुरू कृपा करतात तेव्हा आपल्या घरीच संत येऊन भेट देतात.

मग त्यांच्या मेळाव्यात सांवळे परब्रह्म रासनृत्यात नृत्य करताना दिसते.

मग जेथे जेथे दृष्टि पडते तेथे तेथे कृष्णरूप आहे असा साऱ्या सृष्टीचा अनुभव येतो.

जीवभाव जो असतो तोहि कृष्णरूप होऊन जातो. आणि आपण स्वतः कृष्णरूप आहोत असा अनुभव येतो.

मग वेगळा दिसणारा कृष्णहि नाहिसा होतो व कृष्णाचा भक्तहि वेगळा राहत नाही. दोन्ही ठिकाणी एक भगवान् कृष्ण..च होऊन जातो.

गोपिकांची अशीच रीती होती आणि ज्ञानेश्वरकन्येचीहि युक्ती म्हणजे एकरूप होण्याची रीतीही तीच आहे.

१४३

सांभाळावया जनी । नाही दुजे साच कोणी ।।१।।
ऐसी नोहे बापमाय । तारु जैसे सदगुरूपाय ।।२।।
आठविता मनोभावे । करी मुक्तचि स्वभावे ।।३।।
ज्ञानमहिम्याचा ठेवा । जया गुणे फळी यावा ।।४।।
ज्ञानेश्वर-आश्वासन । तेणे अंग नारायण ।।५।।

चिंतन :-

या लोकात मला सांभाळून नेण्यासाठी खरोखर दुसरे कोणीहि नाही.
सद्गुरूंचे चरण जसे तारणारे आहेत तसे आईवडील देखील तारत नाहीत.
मनोभावाने त्यांना आठविले म्हणजे ते आपोआप आपल्याला मुक्त करतात.
आणि ज्ञानमाहात्म्याचा जो साठा आहे तो आपल्याला सद्गुरुंच्या कृपेमुळेंच मिळतो म्हणजे आपला देह देखील ब्रह्मरूप आहे असा अनुभव येतो. हे श्री ज्ञानदेवांचे आश्वासन आहे.

१४४

सदगुरूवाचोनी कर्मकांडबळे । कधीही नाकळे चित्तशुद्धि ।।१।।
सदगुरूवाचोनी ईश्वरोपासना । कधीहि सगुणा भेटवीना ।।२।।
सदगुरूवांचोनी ब्रह्मज्ञानठेवा । कधीही न जीवां मुक्त करी ।।३।।
देवाचिये ठायी जैसी भक्ति परा । गुरूचरणी थारा तैसा व्हावा ।।४।।
तरीच ते कळे बोलियले काही । अन्यथा तो नाही उपायचि ।।५।।
ज्ञानेश्वरप्रभु कृमेचा सागर । करी दीनोद्धार दृष्टिमात्रे ।।६।।

चिंतन :-

कर्म केल्याने चित्तशुद्धी होते पण सद्गुरुशिवाय नव्हे.
सद्गुरुशिवाय ईश्वरोपासना कीतीहि जरी केली तरी ती जीवाला मुक्त करीत नाही. किंवा सगुण साक्षात्कार देखील होत नाही.
सद्गुरुशिवाय ब्रह्मज्ञान झाले तरी ते जीवाला मुक्त करीत नाही.
देवाचे ठिकाणी जशी पराभक्ती केली जाते तशीच श्रीगुरुचरणी ती असावी.
तेव्हा कुठे मग सद्गुरु जे बोलतात त्याचा अर्थ समजतो. याशिवाय दुसरा उपायच नाही.
ज्ञानेश्वरप्रभु हे कृपेचे सागर आहेत. ते आपल्या कृपाकटाक्षाने दीनाचा उद्धार करतात.

१४५

सदगुरुची कीर्ति वर्णिताचि वाणी । ब्रह्मविद्याखाणी जय पावे ।।१।।
गुरूरित्याख्यया ऐसिया पदांनी । प्रभु मोक्षदानी बोलियेले ।।२।।
सकळही संत श्रीगुरूविभूती । सम सर्वांभूती मिळाले जे ।।३।।
म्हणूनी सदगुरूवर्णनी उल्हास । पूर्ण प्रेमग्रास घेवोनिया ।।४।।
सर्व पातकांस हेचि प्रायश्चित्त । वर्णावे सदभक्त श्रीहरीचे ।।५।।
ज्ञानेश्वरप्रभु सदगुरूकृपाळ । घालूं कंठी माळ कृपे त्यांच्या ।।६।।

**चिंतन :-**

सद्गुरूंची कीर्ती मुखाने गायिली म्हणजे ब्रह्मविद्येच्या खाणीवर जय मिळतो. असे गुरुरित्याख्यया-या वचनांनी भगवंताने स्पष्ट सांगितले आहे.

सर्व भूतमात्रांच्या ठिकाणी जे मिळून गेले आहेत. ते सर्व संत आपल्या श्रीगुरूच्या विभूती असतात.

पूर्ण प्रेमाच्या घासांनी पोट भरून गेले असता मग सद्गुरूंचे वर्णनात उल्हास वाटतो.

सर्व प्रकारची पातके नाश पावण्यासाठी श्रीहरीच्या सद्भक्तांची चरित्रे वर्णन करणे हाच मोठा उपाय आहे.

ज्ञानेश्वरप्रभू हेच माझे कृपाळू सद्गुरू आहेत. त्यांच्या कृपेने त्यांच्याच गळ्यात हार घालू.

१४६

तोचि पै म्हणावा उदैला सुदिन । पावती लोचन प्रकाशाचे ।।१।।
गुरू गृहीं येता सुखाचा संसार । बंधु कांता पुत्र दास होती ।।२।।
नाही ऐसे सुख चवथ्या आश्रमी । व्यर्थ होणे श्रमी न पडे की ।।३।।
गुरू आम्हां घेती स्वये कडेवरी । आम्ही खांद्यावरी घेऊ तया ।।४।।
निवटिला भेद झाले एकरूप । ज्ञानेश्वरदीप हृदयात ।।५।।

**चिंतन :-**

ज्ञानदृष्टीला अंकुर फुटावेत त्याप्रमाणे आपल्याला प्रकाशाचे नेत्र मिळावेत तोच उदय पावलेला उत्तम दिवस होय.

(मूळ संसार दुःखमय असला तरी) श्रीगुरू घरी आले की तोच संसार सुखाचा होतो. बंधू, स्त्री, पुत्र दास होऊन सेवा करू लागतात.

असे सुख संन्यासाश्रमात नाही. संन्यास घेतल्यानंतर परमार्थाच्या प्राप्तीकरीता पुष्कळ श्रम करावे लागतात. त्याप्रमाणे संसारात राहून गुरूसेवा केली असते. संसार आनंदमय होतो.

श्रीगुरू आम्हाला कडेवर घेऊन बालकाप्रमाणे कोडकौतुक करतात. आणि आम्ही मात्र त्यांना खांद्यावर घेऊन नाचू लागतो.
गुरुशिष्य भेद नाहीसा होतो. एकरूपता येते आणि हृदयात ज्ञानेश्वररूपी दीप प्रकाशू लागतो.

१४७

राजसेवा घडे जेव्हापासोनियां । तैं अनुगामिया धन मिळे ।।१।।
जैं पासुनी गुरूसेवेचि प्रवृत्ति । तैंहुनीच वृत्ति ब्रह्माकारा ।।२।।
प्रपंच परमार्थ होती हरिरूप । जाती तिन्ही ताप न दवडितां ।।३।।
विश्वात विपत्ति चित्ती समाधान । नारिकेळ जाण होय जैसे ।।४।।
ज्ञानेश्वरप्रभु भेटलियावरी । मग दैन्य वरी, मूढचि तो ।।५।।

चिंतन :-
राजसेवा सुरू झाली की तेव्हापासून सेवकाला धन मिळण्यास प्रारंभ होतो.
त्याप्रमाणे गुरूसेवेची सुरूवात झाली की वृत्ती आपोआप ब्रह्माकार होऊ लागते.
प्रपंच आणि परमार्थ दोन्ही हरिरूप होतात.
तिन्ही ताप (आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक) प्रयत्न न करता आपोआप नाहीसे होतात.
विश्वात विपत्ती आणि चित्तात समाधान - अशी नारळाप्रमाणे (आत गोड पाणी व खोबरे आणि बाहेर मात्र नारळाचा काथ्या) - अशी उत्तम स्थिती असते.
ज्ञानदेवांची भेट झाल्यावर मी दीन आहे असे म्हणून स्वतःला कमी लेखणे हे मूढ मनुष्याचे काम होय.

१४८ / भाग्य उदय

भाग्य उदय झाला । प्राणप्रिय तुम्ही आला ।।१।।
गीतार्थाच्या कावडी । बाळां देतसां आवडी ।।२।।
प्रेमे अंगिकारा जया । मग वंद्य तो ब्रह्मिया ।।३।।
स्वामी ज्ञानेश्वरकन्या । यश गाउनिया धन्या ।।४।।

चिंतन :-
हे प्राणाहून प्रिय ज्ञानदेवा, माझ्या भाग्याचा उदय झाला आणि तुम्ही माझेकडे आलात.
भगवद्गीतेचे अनेक सूक्ष्म अर्थ काढून कावडी भरून भरून तुम्ही आपल्या लेकरांना प्रेमाने देत आहात.

तुम्ही ज्याचा प्रेमाने अंगीकार करता तो ब्रह्मदेवालाही पूज्य होतो.
हे स्वामी, ही ज्ञानेश्वरकन्या तुमचे यश गावून धन्य झाली आहे.

१४९

तुम्हांपुढे ज्ञानेश्वरा । काय पातकाचा चिरा ।।१।।
देवा, सिंहापुढे कोल्हा । काय कधी जिंकोनि गेला ।।२।।
प्रळयाग्नीपुढे तृण । कैसे खेळेल जी रण ।।३।।
मायबापा ज्ञानदेवा । आम्हां पायांवरी ठेवा ।।४।।

चिंतन :-
श्रीज्ञानदेवा, तुमच्यापुढे पातकांचे पर्वतही नगण्यच आहेत.
देवा, कोल्हा कधी सिंहाला जिंकून पुढे गेला आहे काय?
प्रलयाच्या अग्नीबरोबर गवत काय युद्ध खेळणार आहे?
ज्ञानदेवा मायबापा आम्हाला तुमच्या पायापाशी जागा द्या, येवढेच मागणे आहे.

१५०

ध्यानाचेही ध्यान माझा ज्ञानदेव । ज्ञेय ज्ञाता भाव नाही जेथे ।।१।।
शिष्याचिये साठी जाहला सगुण । तया आवाहन प्रेमभावे ।।२।।
होवावे प्रगट भक्तांच्या हृदयी । जैसी लवलाही भावातुनी ।।३।।
पाय धुवोनिया सेवू पायवणी । करा शुद्ध मनीं, महाराजा ।।४।।
दोही हाती देऊ प्रेमे अर्घ्यदान । ज्ञानेश्वर पूर्ण करूनि घोष ।।५।।

चिंतन :-
ध्यानाच्या पलीकडे असलेले शुद्ध ध्यान म्हणजे ज्ञानदेव होत. त्यांचे ठिकाणी ज्ञेय ज्ञाता आणि ज्ञान ही त्रिपुटी नाही.
शिष्याच्या प्रेमासाठी ते सगुण झाले त्यांनाच आम्ही प्रेमभावनेने आवाहन करीत आहोत.
ज्ञानदेवा तुम्ही भक्तांच्या हृदयात, किंचित प्रेमभाव असला तरी प्रगट व्हा.
तुमचे चरणावर अभिषेक करून ते तीर्थ प्राशन करू. त्या तीर्थाच्या प्रभावाने आमची मने शुद्ध होतील.
दोन्ही हातांनी तुम्हाला प्रेमाचे अर्घ्य देऊ. आणि ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर या नामाच्या घोषाने आसमंत भरून टाकू.

## १५१ / पायपूजन

पायपूजनाचा आम्हा अधिकार । इतर निर्धार काही नेणो ।।१।।
बोबड्या बोलाची करूनिया क्षमा । एकदृष्टि समा उघडवा ।।२।।
मायबाप तुम्ही बंधु गोतगण । तुमचे सज्जन गुण गाती ।।३।।
ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर हीच नांवे । आम्हां जपवावे जन्मोजन्म ।।४।।

चिंतन :-

तुमचे पाय पूजावयास मिळणे हाच आम्हाला मिळालेला सर्वात मोठा अधिकार आहे. याशिवाय इतर कोणताही आमचा संकल्प नाही, हाच एक आमचा पक्का निश्चय आहे.

आमच्या बोबड्या, निरर्थक बडबडीची क्षमा करा आणि

आमचे ठिकाणी असलेली द्वैत दृष्टी जाऊन अद्वैत ज्ञान दृष्टी एका दृष्टिक्षेपाने आम्हाला समबुद्धी ची संकेत दृष्टी द्या.

आईवडील बंधु गोत्रज वगैरे सर्व तुम्हीच आहात. असे सारे तुमचे गुण भक्तजन गात असतात.

जन्मोजन्म ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर हीच नावे आमचे मुखातून उमटतील असे करा.

## १५२

सकलहि तीर्थे येती तया ठाया । पंढरीच्या राया वास जेथे ।।१।।
पंढरीचा राव वसे संतांठायी । सोडुनी सर्वही वैकुंठादि ।।२।।
म्हणूनिया आम्हां चित्ती हा विश्वास । तेथे द्यावा श्वास जीवभाव ।। ज्ञानेश्वरपाय संतांत वरिष्ठ । जीवे भावे कष्ट तेथे करुं ।।४।।

चिंतन :-

ज्या ठिकाणी पंढरीचा राजा राहतो तेथे सर्व तीर्थे येऊन राहतात.

हा पंढरीचा स्वामी वैकुंठादी सर्व लोक सोडून संतांचे जवळ येऊन राहतो.

म्हणून आमच्या मनात हा विश्वास आहे की त्या संताचे ठिकाणीच आपले प्राण आणि जीवभाव ओवाळून टाकावेत.

सर्व संतामध्ये ज्ञानदेवांची चरणकमळे सर्वात श्रेष्ठ आहेत. म्हणून तेथेच जीवाभावाने सेवेचे कष्ट करू.

## १५३

सदगुरुची सेवा बंधविमोचक । सांगताती देख श्रुतिशास्त्रे ।।१।।
बहू भाग्ये आम्हा लाधला श्रीगुरू । जेणे परेश्वरू चित्ती राहे ।।२।।

गुरूवीण देव स्वीकार न करी । मिळे वेदांतरी ग्वाही ऐसी ।।३।।
वेदवेत्ता आणि ब्रह्मनिष्ठ मुनि । कैवल्याचा दानी ज्ञानेश्वर ।।४।।

चिंतन :-

परमेश्वर आणि वेदशास्त्रे सर्वजण हेच सांगतात की सद्गुरूची सेवा ही बंधनापासून मुक्त करणारी आहे.

आमच्या मोठ्या भाग्याने श्रीगुरू मिळाले. त्यामुळेच परमेश्वर चित्तात येऊन राहिला आहे. परमेश्वर कोणाचाहि स्वीकार श्रीगुरूशिवाय करीत नाही, अशी वेदान्तात ग्वाही दिली आहे. वेदांचे मर्म जाणणारे आणि ब्रह्मानुभवी (श्रोत्रियो ब्रह्मनिष्ठश्च) मुनी आणि कैवल्याचे दान देणारे असे एक ज्ञानदेवच आहेत.

१५४ आळंदी तीर्थ

सकळही माझे गोत आळंदीये । मायबाप स्वये दीनबंधू ।।१।।
सकळही तीर्था इंद्रायणी वासू । तुटे अभिलाषू अन्य सारा ।।२।।
सिद्धेश्वर तीर्थ प्रत्यक्ष कैलास । वैकुंठविलास विठ्ठलू तो ।।३।।
सकळ देवांचे दैवत श्रीगुरू । सखा ज्ञानेश्वरु बाप माझा ।।४।।

चिंतन :-

माझे सर्व सोयरे संबंधी आळंदीलाच आहेत, अन् ते कोण तर स्वतः दीनबंधू मायबाप श्री ज्ञानेश्वर महाराज.

सर्व तीर्थे इंद्रायणीमध्ये वस्तीला आली आहेत, त्यामुळे इतर तीर्थांची यात्रा करण्याची अभिलाषा राहिलेली नाही.

आळंदीचे सिद्धेश्वर मंदिर हेच प्रत्यक्ष कैलास असून वैकुंठाचे स्वामी प्रत्यक्ष विठ्ठलही ज्ञानदेवांचे पाठिशी आहेत.

या सर्व देवतांचे दैवत श्रीगुरू आहेत. तसेच सखा, मातापिता सर्वकाही माझे श्रीज्ञानदेवच आहेत.

१५५

इंद्रायणीतटी झाला सूर्योदय । प्रकाशिले होय त्रिभुवन ।।१।।
दोही डोळां देखे भानुबिंब दृष्टी । प्रतीति ये, गोष्टी न करितां ।।२।।
रूपी रूप आहे प्रेमी प्रेम दाटे । आत्मत्व प्रगटे दोन्ही ठायी ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या पाहोनी प्रकाश । तोडोनी आभास मीनलिये ।।४।।

चिंतन :-

इंद्रायणीच्या काठी सूर्योदय झाला आणि सारे त्रिभुवन प्रकाशून गेले.

दोन्ही डोळ्यांनी ज्ञानेश्वररूपी सूर्यबिंब मी पाहत आहे. काही न बोलता शब्दाशिवाय अनुभव आला. शब्दाआधी झोंबिजे । प्रमेयासी ।। असे झाले.

बिंबाच्या ठिकाणी ज्ञानेश्वरांचे साकार रूप आहे. असे ज्ञान कायम राहीले. त्याचवेळी अन्तःकरणात प्रेमाचा आनंद देखील मिळत असतो. अशा रीतीने रूप पाहत असता परमप्रेमही कायम असते.

अशा चित् आणि आनंद या दोन्ही ठिकाणी एक आत्मरूपच प्रगट असते.

ज्ञानेश्वरकन्येने हा ज्ञानसहित आनंदाचा प्रकाश पाहिला आणि विश्वाचा खोटा आभास दूर करून आत्मरूप ज्ञानसूर्याशी ती एकरूप झाली.

## १५६ ज्ञानेश्वरीतील आचार्योपासना

नवल साजणी देखिले लोचनी । संसृतिमोचनी भाव उभा ।।१।।
पाठीपोटी लाहे आचार्योपासना । जाहल्या वासना हरिरूपा ।।२।।
मुखामाजी मुख हातांमाजी हात । आलिंगन होत हृदयाचे ।।३।।
मृदुल चुंबन डोळियां देखणे । अंगुष्ट चाखणे प्रेममय ।।४।।
ज्ञानेश्वरतात द्विदळीचा राजा । तयाते सहजा लोटांगणी ।।५।।

चिंतन :-

संसार सोडविणारा मूर्तिमंत भाव समोर उभा आहे - असे नवल डोळ्यांनी पाहिले.

सद्गुरूची उपासना (ज्ञानेश्वरीतील तेराव्या अध्यायातील) मागे पुढे सर्वीकडे व्यापून गेली.

सर्व कामना एका हरिवाचून इतरत्र जातच नाहीत.

ओठावर ओठ टेकलेले आहेत.

हाता माजी हात घेतले आहे.

हृदयाचे आलिंगन झालेले आहे.

हळुवारपणे चुंबन घेऊन डोळ्याने हरिरूप पाहणे होत आहे, आणि माऊलीच्या पायाचा प्रेममय आंगठा मुखाने चोखत आहे.

असा भ्रूमध्यावरील म्हणजे द्विदल चक्रावरील दिसणाऱ्या सत्पुरुषातील मधोमध असणारे श्रीगुरू म्हणजे ज्ञानेश्वर महाराज होत.

त्यांना साष्टांग नमस्कार असो.

१५७

ध्यानयोगे होती नानाविध भाव । संसाराची हाव मावळोनी ।।१।।
चक्राकाररूपी गुरू सिंहासनी । पुढे इंद्रायणी शुद्ध वाहे ।।२।।
सव्य भागी स्वामी यतिवरराव । युक्त प्रेमभाव सम जया ।।३।।
हृदयात रवि नयनी प्रकाश । प्रीतीचा विकास शिरावरी ।।४।।
सर्व आंगी कळा विवेकाची फांके । निर्धारीता टिके निर्धारुचि ।।५।।
मुखी मुख सुखे जाहले उज्वळ । नयनीचे जळ पाद क्षाळी ।।६।।
ज्ञानेश्वरप्रभु एवं ध्येय चित्ती । संताची संगति मिळुनी राहे ।।७।।

चिंतन :-

ध्यानयोगाने शुद्ध सात्विक भावविश्वाचे वेगवेगळे उन्मेष दिसू लागतात आणि ते कसे तर संसारातल्या स्वसुखाच्या सर्व वासना निवळून जाऊन.

हृदयातील चक्राच्या आकारावरील सिंहासनावर श्रीगुरू विराजमान असून पुढे शुद्ध इंद्रायणी वाहत आहे असा साक्षात्कार होतो.

उजव्या बाजूला भगवान् शंकर असून त्यांचेहि ठिकाणी सारखाच प्रेमभाव युक्त असतो.

हृदयात ज्ञानसूर्याचा उदय आणि नयनाद्वारे ज्ञानरूपी प्रकाशाची किरणे बाहेर फाकलेली दिसतात. आणि मस्तकावर प्रेमाचा विकास होतो.

सर्व अंगावर विवेकाची कळा फाकलेली दिसते. निर्धार म्हणजे निश्चय केला असता एका श्रीगुरूच शेवटपर्यंत टिकून असलेले दिसतात.

त्यांचे मुख पाहिले असता ते ब्रह्मसुखाने उज्वळ झालेले दिसते.

आणि प्रेमामुळे नयनातील जलाने श्रीगुरूचरणांना अभिषेक होतो.

ज्ञानेश्वरप्रभु हेच ध्येय चित्तात कायम होऊन राहते. अन् त्यासोबत संतांची संगती असते.

१५८

जन्मजन्म मना ऐसीच आवडी । भरीन कावडी गुरूगृही ।।१।।
नेत्रप्रेमळे क्षाळीन चरण । जनन मरण निवारुनी ।।२।।
मोलाविण दास्य साधीन पुरुषार्थ । म्हणतील समर्थ आपुले जेणे ।।३।।
संतसंगतीचा धरुनी आदर । गुरू ज्ञानेश्वर गाईन मुखे ।।४।।

चिंतन :-

श्रीगुरुंचे घरी पाण्याच्या कावडी भरून सर्व सेवा करण्याची आवडी मला जन्मो जन्मी असावी.

नेत्रातील प्रेमाश्रूंनी त्यांचे चरण क्षाळन करीन जन्ममरणाची खोटी कल्पना सोडून देईन.

श्रीगुरूसमर्थ मला आपले म्हणतील यासाठी मी मोल न घेता सेवा करीन आणि धर्म आणि मोक्ष पुरुषार्थ साधीन.
संतसंगतीचा आदर धरून गुरूज्ञानेश्वरांचे नाम मुखाने सतत गायन करीन.

१५९ / पाहियेले पाय जेव्हां

पाय पाहियले जेव्हां । भव तेव्हां भूललो ।।१।।
पादसेवा जेव्हां केली । तेव्हां गेली वासना ।।२।
जंही शिरी दिला हात । झालो नाथ विश्वाचा ।।३।।
जेव्हां प्यालो प्रेमदुग्ध । शुद्धाशुद्ध आटले ।।४।।
जेव्हां ऐकिले वचन । झालो पूर्ण अनादि ।।५।।
जेव्हां पाळियली आज्ञा । गुरूसंज्ञा पावलो ।।६।।
जेव्हां सेवियले तीर्थ । सतासत हारपले ।।७।।
जेव्हां पूजिले भक्तीने । होणे जाणे मीटले ।।८।।
ज्ञानेश्वर मायबाई । सुख ठायीं व्यापक ।।९।।

चिंतन :-
जेव्हा पायांचे दर्शन झाले तेव्हा संसार विसरून गेलो.
पायाची सेवा केली तेव्हा वासना नाहीशा झाल्या.
तुम्ही मस्तकावर वरदहस्त ठेवला तेव्हा मीच विश्वाचा स्वामी आहे असे मला कळले.
मायबाई जेव्हा तुझे प्रेमदुग्ध प्यायलो तेव्हा (सर्वच ब्रह्मरूप झाल्याने) शुद्ध अशुद्ध ही भावनाच नाहीशी झाली. सर्व शुद्ध ब्रह्मच झाले.
जेव्हा तुझे शब्द ऐकले तेव्हा मी पूर्ण आणि अनादि अनंत झालो.
जेव्हा तीर्थ प्राशन केले तेव्हा सत्य आणि असत्य हे द्वैत संपले.
जेव्हा भक्तीने पूजा केली तेव्हां जन्म मरण संपले.
हे ज्ञानेश्वरे मायबाई तुझ्या ठिकाणी मला मिळालेले सुख एकदेशीय, एक कालीन नसून व्यापक आहे, हा अनुभव आहे.

१६०

भाग्ये तो बाळक मायेचिया पुढे । सर्व सुख कोडे अंगे भोगी ।।१।।
तैसे धन्य साधु सद्गुरूवचनी । विषयरचनी विसरले ।।२।।
गेला देहभाव हारपली वाचा । श्रीकृष्णनामाचा छंद मना ।।३।।

भेद नाही प्रेम भासे चहोंकडे । चित्त ते रोकडे ब्रह्म झाले ।।४।।
आपणही पूर्ण लोकां पुरवीती । कृष्णनाम चित्तीं गाउनियां ।।५।।
जीवशिवभ्रांति गेली अमंगळ । चरण मंगळ सद्गुरूचे ।।६।।
मायबापगुरू आळंदीचा राजा । ब्रह्मभाव माझा तोचि सर्व ।।७।।

चिंतन :-

बालक जर आई समोर असले तर ते बाळाचे महाभाग्यच होय.
सर्व प्रकारचे सुख त्याला कोडकौतुक होउन मिळते.
तसेच,
जे सद्गुरुवचनाच्या आज्ञेत राहिल्याने विषयांची रचना करण्यासच विसरून जातात, ते साधू धन्य होत.
त्यांचा देहभाव नाहीसा होतो.
वाणी अनुभव सांगण्यासाठी शिल्लक नसते.
श्रीकृष्ण नामस्मरणाचा छंद मनाला लागलेला असतो.
चहूंकडे भेदरूपी द्वैताचा आभासही नसतो.
ते एक प्रेमच अनुभवत असतात.
चित्त ब्रह्मरूप झालेले असते.
आपण पूर्ण तर असतातच पण ते इतरांनाही ते पूर्ण करीत असतात.
त्यांचे ते हृदयाकाशातील हरिनामाचे गायन भक्तहृदयातील प्रेमांकुर पल्लवित करीत असतात.
जीव आणि शिव हे वेगळे आहेत, ही अमंगळ खोटी भ्रांती दूर होते.
केवळ सद्गुरूंचे मंगळ चरणच सर्वत्र दिसू लागतात.
मला अनुभवायला मिळालेला हा ब्रह्मभाव तोच सर्व काही आहे.
माझे आई, बाप, गुरू सर्वकाही आळंदीचे राजे आहेत.
माझ्या या आईच्या प्रेमळवात्सल्यात मी माझा मी-पणाच विसरून गेलो.

१६१

सर्व सुख आले हातां । पाणी माथां गुरुचा ।।१।।
डोळां पाहतांचि पाय । दुरपाय १ आटले ।।२।।
विघ्ने निवारिली कोटी । सुख पोटी फावले ।।३।।
आतां ज्ञानेश्वरगुरू । नमस्कार निर्भय ।।४।।(१.दुर्+अपाय)

चिंतन :-

शिरावर श्रीगुरूचा हस्त ठेवला गेला आणि सर्व श्रेष्ठ सुख हाती आले.
डोळ्यानी त्यांची पाउले पाहताच (दुरपाय) दुःख देणारे अपाय नाहीसे झाले.
कोट्यावधि विघ्ने निवारण झाली आणि पोटी सुखच सुख मिळू लागले.
आता निर्भयपणाने श्रीगुरु ज्ञानदेवांना नमस्कार करू.

## १६२ / सर्व भार

**येथे नलगे नैराश्य । हृषीकेश आठवा ।।१।।**
**माझ्या भक्ता नाही नाश । जगदीश बोलिले ।।२।।**
**देवाचेचि व्हावे । तीर्थी न्हावे गुरुच्या ।।३।।**
**मायबाप ज्ञानेश्वर । सर्व भार साहतो ।।४।।**

चिंतन :-

हृषिकेशाचे स्मरण केले की नैराश्याचे कामच नाही.
माझ्या भक्ताचा कधी नाश होत नाही असे श्रीकृष्ण गीतेत, न मे भक्तः प्रणश्यति, असे आश्वासन देतात.
देवाचेच होऊन जा, सांसाहिरक लोकांचे राहू नका आणि श्रीगुरूंच्या चरणोदकात स्नान करा.
म्हणजे मायबाप ज्ञानेश्वरमाऊली सर्व भार सहन करते, तिच्या स्वाधीन व्हा.

## १६३

**काय होऊं उतराई । सखे आई सद्गुरू ।।१।।**
**भवनदींत वाहतां । दिले हातां तराया ।।२।।**
**ब्रह्म तें तो तुझे दिले । येर झाले कल्पित ।।३।।**
**विनवी ज्ञानेश्वरबाळा । पायी लळा धरुनी ।।४।।**

चिंतन :-

सखे सद्गुरु आई, मजवरील तुझे ऋण कशाने उतराई होणार?
संसाररूपी नदीत वाहून चाललो होतो,
तेव्हां तरून जाण्यासाठी तू मला हाताचा आधार दिलास.
आणि तू परम कृपाळू होऊन मला परमोच्च ब्रह्मवस्तू प्रदान केलीस.
ती मिळाली व त्या क्षणीं इतर दिसणारे सारे काही कल्पित होऊन गेले.
ज्ञानेश्वरकन्या पायाशी लळा धरून विनवणी करते,
आता तू मला दूर लोटू नकोस.

१६४

**वास करी माझ्या मना । तया आळंदी-आंगणा ।।१।।**
**गाई गाई माझे वाणी । ज्ञानेश्वर गुणखाणी ।।२।।**
**विषयात नाही हित । शेखी सकळांचा अंत ।।३।।**
**ज्ञानेश्वर माय । ध्यावोनियां धन्य होय ।।४।।**

**चिंतन :-**
हे माझ्या मना, आळंदीश्वराच्या आंगणात, तू निवास कर.
हे वाणी तू ज्ञानेश्वरांच्या गुणखाणीचे गायन कर.
कारण विषयांचा शेवटी नाशच होतो म्हणून त्यात हित नाही,
हे लक्षात घे आणि विषय मिळविण्याचे प्रयत्न सोडून दे.
आता केवळ ज्ञानेश्वरमाउलीचे ध्यान कर आणि धन्य हो.

१६५

**इंद्रायणीचे तटी । आळंदीये शिवपीठी ।।१।।**
**प्रगट ज्ञानमणि । माया-तम निवारणी ।।२।।**
**पांडुरंग करी सेवा । कोण पाड अन्य देवा ।।३।।**
**ज्ञानेश्वर मोक्षदानी । आम्ही देखिले लोचनी ।।४।।**

**चिंतन :-**
इंद्रायणीचे कांठावर - आळंदीला - शिवपीठावर
मायेच्या अंधःकाराला नाहीसा करण्यासाठी
साक्षात ज्ञानमणी प्रगट झाला.
या परमपावन तीर्थक्षेत्रात साक्षात पांडुरंग ज्ञानदेवांची सेवा करतात तर इतर देवतांचा काय पाड?
असे मोक्षाचे दान करणारे ज्ञानदेव आम्ही डोळ्यांनी पाहिले.

१६६

**श्रुति युक्ति अनुभव । एकीएक ब्रह्मभाव ।।१।।**
**आहे म्हणोनि देवाचें । अवघी तुझी सत्ता नाचे ।।२।।**
**घेवोनिया द्रष्ट्रु-ज्ञान । उमटत दृष्यभान ।।३।।**


स्वामी परप्रेमास्पद । एक तुझे निजपद ।।४।।
सर्व ब्रह्मानंद-ठेवा । तूंचि स्वामी ज्ञानेदवा ।।५।।

चिंतन :-
श्रुतींचे श्रवण, युक्तीने मनन, आणि अनुभवाने निदिध्यास या सर्वांनी ब्रह्मभाव प्राप्त होतो. हे सर्व परमेश्वरस्वरूपच आहेत. या सर्व ठिकाणी केवळ तुझीच सत्ता म्हणजे तुझे अधिष्ठान असल्याने तुजवरच ते भासत आहेत.
पाहणारा  द्रष्टा जो आहे त्याच्याच सत्तेवर दृश्यपदार्थांचा आभास होतो. हे स्वामी, तुझे निजपद हेच एक परमप्रेमास्पद आहे.
सर्व ब्रह्मानंदाचा ठेवा स्वामी ज्ञानदेवा तूच आहेस.

१६७

मिळे आवडीचे सुख । तुझे पाहता श्रीमुख ।।१।।
अवघेचि पुरती काम । मुखी गातां तुझे नाम ।।२।।
आटले जनिमरण । तुझे वंदितां चरण ।।३।।
सख्या आळंदीवल्लभा । तुझी मूर्ति हृदयशोभा ।।४।।


चिंतन :-
तुमचे मुख पाहिले की आवडणारे सुख मिळते.
तुमचे नाम मुखाने उच्चारले की सर्व कामना पूर्ण होतात.
तुमचे पायांना वंदन केले की जन्ममरण परंपरा नाहीशी होते.
सख्या आळंदीवल्लभा तुझी सगुण मूर्ति माझ्या हृदयाची शोभा आहे.

१६८ / अविद्या- परोक्षविद्या-अपरोक्षविद्या 

अविद्या-विद्या या दोन्हीही कल्पना । तिष्ठति आपणा अधिष्ठुनी ।।१।।
अविद्येचे कार्य देहादि संसार । जो की दोषाकर वेददृष्टी ।।२।।
परोक्षविद्येचे कार्य कृष्णतनू । धारणानुगुणू चित्ती नांदे ।।३।।
अपरोक्षविद्या स्वानंदशरीर । स्वामी ज्ञानेश्वर गुरूराणा ।।४।।

चिंतन :-
आपल्याच ठिकाणी अविद्या आणि विद्या या दोन्ही कल्पना उठतात.
१...अविद्येमुळे पंचभूतात्मक देहादि संसार भासतो (अविद्येचे कार्य) आणि हाच सर्व दु:खादि दोषांचा समुद्र आहे.

२...वेद दृष्टीने पाहता परोक्ष विद्येचे कार्य श्रीकृष्णाचे शरीर आहे.
आपल्या धारणे प्रमाणे आपल्या ध्यावस्थेत ते नांदते म्हणजे ते मानसप्रत्यक्ष असते.
अनुमानप्रमाणाने ते जाणल्या जात असते, मनाला दिसत असते.
यात मी ध्यान करीत आहे ही जाणीव कायम असते.
ही ज्ञातता आनंदाला कमीकमी करणारी आहे.
३...अपरोक्ष विद्या म्हणजे श्रीगुरुदेव ज्ञानेश्वरांचे स्वानंदशरीर होय.
हे माया निर्मित अविद्याजन्य पांचभौतिक नसते.
सच्चिदानंदातील ज्ञानांशाचे प्रधान्य नसते.
ज्ञातता उत्पन्नच होत नसते.
भक्तीत जाणीव न उद्‌भवल्यामुळे गुरूदेवांच्या स्वानंद शरीराशी ऐक्य होते. केवळ आनंदाच्या अविरत प्रवाहात भक्त भिजत असतो.

## १६९ रस-निर्मितीची प्रक्रिया 

स्थायीभाव ध्याननिविष्ट परोक्ष । रस अपरोक्ष ब्रह्मानंद् ।।१।।
स्थायीभावालागी भावना कारण । रसाचे साधन काव्यशब्द ।।२।।
शिवकृष्णतनू ध्याने ये अंतरी । परोक्षाचे परी म्हणोनी ते ।।३।।
ब्रह्मरसशब्द बोधक सदगुरु । स्वये आविष्कारु अपरोक्ष ।।४।
तोचि स्वामी माझा आळंदीवल्लभ । हृदयी स्वयंभु ज्ञानेश्वर ।।५।।


चिंतन :-
ध्यानाने गोचर होणारा - ध्यानात व्यक्त होणारा परोक्ष साकार म्हणजे स्थायिभाव.
अपरोक्ष म्हणजे प्रत्यक्ष असलेले ज्ञान.
परोक्ष म्हणजे अनुमानाने झालेले ज्ञान.
स्थायीभाव आहे हे अनुमानाने कळते.
काव्यशास्त्रातील स्थायीभाव हा प्रत्यक्ष कधी होत नसतो.
तो हृदयात आहे हे अनुमानाने कळते.
कवितेचा आस्वाद घेताना स्थायीभाव उद्दीप्त होतो आणि रसरूपाला येतो.
काव्यातील शब्दांच्या सामर्थ्याने रसाची अनुभूती होते.
। रसो वै सः । या श्रुतीनुसार हा ब्रह्मानंदच असतो.
ध्यान करताना भगवंताचे रूप अंतरंगात येते.
ते परोक्ष असते. म्हणजे स्थायीभाव आणि ध्यानातील मूर्ती अपरोक्ष नसून परोक्ष असतात.

परंतु ब्रह्मरसाचा बोध करणारे सद्गुरू हे स्वतः शिष्याचे समोर साक्षत् असतात.
म्हणून ते अपरोक्ष असतात.
पुढे शिष्याला अंतर्बाह्य ब्रह्मानुभूती आल्यानंतर आत बाहेर श्रीगुरूंचेच अस्तित्व अनुभवाला येते.
हेच आळंदीचे राजे माझे स्वामी आहेत.
ते बाहेरही आहेत आणि आतही स्वयंभू आहेत असा माझा अनुभव आहे.
अशा अतर्बाह्य व्यापून असलेल्या ज्ञानदेवांचा जयजयकार असो.

१७०

जिता भेटता सद्गुरू । आता कां मी पुण्य करु ।।१।।
जाहलिया जीवन्मुक्ति । इच्छूं का मी मृत्यूप्रती ।।२।।
स्वये मी प्रणवरूप । आता कां शास्त्रसंकल्प ।।३।।
ज्ञानेश्वर मायबाप । तेणे नेले तिन्ही ताप ।।४।।

चिंतन :-
प्रत्यक्ष साक्षात् सद्गुरू भेटले असता,मला आता पुण्यकर्माची काय गरज?
सद्गुरुप्राप्तीमुळे मला जीवन्मुक्तीच मिळाली आहे.
मेल्यानंतर विदेहमुक्ती मिळते, पण मला चैतन्यघन असे सद्गुरू मिळाले असता, मेल्यानंतर मला विदेहमुक्ती मिळेल, अशा कल्पना मी कशाला करू?
मी स्वतःच ॐ कारस्वरूप आहे.
मीच वेदादीसर्व शास्त्रांचे बीज म्हणजे प्रणव आहे.
तर आता पुनः मी शास्त्र अध्ययन वगैरे कशाला करू?
ज्ञानेश्वर माझे मायबाप आहेत.
त्यांनी माझी आधिभौतिक, आधिदैविक आणि आध्यात्मिक ही सर्व दुःखे संपविली आहेत.
मी मुक्तच आहे.
मला आता मरणाची गरज नाही किंवा विदेहमुक्तीचीही गरज नाही.
असा परम परमार्थ प्रदान करणाऱ्या माझ्या ज्ञानाईला नमो नमः।।



१७१

## ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णकांता

गुरू देव दोन्ही देखिले लोचनी । आधी तो वंदनी श्रेष्ठ कोण ।।१।।
माझे मन म्हणें गुरू आधी वंदा । तेणेचि गोविंदा देवपण ।।२।।
सर्वाभूती वस्तु दाखवी कृपाळ । तैसा हा गोपाळ नव्हे देख ।।३।।
ज्ञानेश्वर मेळवूनी गोपीकांता । कन्या आणि कांता जाहले मी ।।४।।

चिंतन :-
श्रीगुरू आणि देव या दोघांनाही मी डोळ्यांनी पाहिले.
पण मनात आले की आधी वंदन कोणाला करावे !
माझे मन म्हणाले की गुरूला आधी वंदन कर,
कारण त्यांचेशिवाय देवाचे देवपण समजूच शकत नाही.
म्हणजे त्यांचेमुळेच देवाला देवपण आहे.
श्रीगुरू सर्व चराचर सृष्टीत कृपाळू होऊन ब्रह्मवस्तू दाखवितात, तसे हा गोपाळ दाखवीत नाही.
म्हणून मी ज्ञानेश्वरांना आणि कृष्णाला एकरूप केले.
आणि मी स्वतः ज्ञानेश्वरांची कन्या आणि कृष्णकांता झाले.

१७२

पुंडलीकासाठी गुंतला विठ्ठल । आणिक सकळ विश्व पुरे ।।१।।
म्हणूनि निरूता दासकळवळा । विठ्ठल वेल्हाळा शोभविसी ।।२।।
इंद्राणी-जान्हवी संगम सुंदर । जेथे चंद्रधर तप करी ।।३।।
तेथे माझा स्वामीनाथ कृपामूर्ति । त्रिभुवनी कीर्ति वेदवाणी ।।४।।
ज्ञानेश्वरनाम चहूं अक्षरांचे । जपतां जीवाचे ब्रह्म होय ।।५।।

चिंतन :-
पांडुरंगाला आपल्या भक्ताशिवाय इतर विश्वाचे काय करावयाचे आहे?
विठ्ठलाला केवळ पुंडलिकाची काळजी आहे.
केवळ भक्तांच्या कळवळ्यामुळे विठ्ठल हा पुंडलिकासमोर विटेवर
अनंतकाळापासून उभा आहे.

हे विठ्ठला, तूं आळंदीला विलक्षण सौंदर्याने शोभवीत आहेस.
इतर विश्वाच्या उद्धारासाठी इंद्रायणी व भागीरथींच्या संगमाकाठी निवास करून,
इंद्रायणी आणि जान्हवीचा आळंदीला संगम आहे. (इंद्रायणीच्या पात्रात समाध्यांच्या बाजूला जान्हवी तीर्थ असून त्यातून पाण्याचा झरा वाहत असतो.)
तेथे चंद्रमौळी शंकर तप करीत आहेत.
तेथेच माझ्या स्वामी ज्ञानदेव- ज्यांची कीर्ती त्रिभुवनी वेद गात आहेत, ते निवास करून आहेत.
त्यांचे ज्ञानेश्वर हे चार अक्षरी नाम जपले असता जीव ब्रह्मरूप होतो.
हा सर्व भक्तांचा अनुभव आहे.

१७३

आजी फळला पुण्यतरू । देखिला आळंदीश्वरू ।।१।।
माय निमाली वासना । करितांचि उपासना ।।२।।
एकवटली इंद्रियें । वंदिता श्रीगुरूपाय ।।३।।
उरले ते आता पोटी । जप ज्ञानदेव ओठी ।।४।।

चिंतन:-
आज आळंदीश्वराला पाहिले आणि माझा पुण्याचा वृक्ष फळाने लदबदून गेला.
हे माउली, तुझी उपासना केली आणि माझी सर्व वासना नाहीशी झाली.
श्रीगुरुचरणांना वंदन केले आणि सर्व इंद्रिये चरणांचे ठिकाणी एकवटली.
आता माझ्या ठिकाणी एकच गोष्ट शिल्लक राहिली आहे अन् ती म्हणजे ज्ञानदेवांचे ओठाने जपले जाणारे नामस्मरण.

१७४

लाचावला जीव सगुणीच्या सुखा । न पाहे आणिका साधनांते ।।१।।
चंचळ हे मन जाये बहुस्थानी । परी जीव गुणी राहे तेथे ।।२।।
मायबाप माझा आळंदीये नांदे । वंदिताती पदे ब्रह्मादिक ।।३।।
नयनी पाहता तो सुखसोहळा । भाग्यवंत भोळा ज्ञानी वाटे ।।४।।
ज्ञानदेवनामें रंगलिया वाणी । मग चारि खाणी सुखरूप ।।५।।

चिंतन:-
माझा जीव सगुण भगवंतांच्या सुखाला लाचावला आहे, त्यामुळे इतर परमार्थाच्या साधनांकडे तो ढुंकूनहि पाहत नाही.
माझे चंचल मन सारखे पुष्कळ ठिकाणी जाते,

पण माझा जीव मात्र सद्‌गुणी आहे. तो तेथेच राहतो.
म्हणजे भक्त सर्व काही मनाप्रमाणेच करतो पण त्या सर्व क्रिया सगुणाच्या प्रेमालाच धरून असते.
माझा मायबाप ज्ञानदेव आळंदीला राहतात.
अन् तेथे त्यांचे वंदन करण्याला ब्रह्मादिक सर्व देवता येतात.
तो सुखाचा सोहळा पाहिला असता, भोळा भाग्यवंत देखील ज्ञानी आहे असेच जाणवते.
ज्ञानदेव या चतुराक्षर मंत्रात वाणी रंगली की (उद्‌भिज - सारज- अंडज) या चारी जीवांच्या योनी सुखरूप वाटतात.
म्हणजे कोणत्याही जन्मात गेलो तरी दुःख होत नाही,
तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ।।

१७५

सद्गुरूवांचोनी त्राता त्रिभुवनी । नाही, हे पुराणी वेदी वाक्य ।।१।।
गोविंदाहुनीही वरिष्ठ आचार्य । धरावे ते पाय त्यांचे आधी ।।२।।
आळंदीवल्लभ स्वामीकृपा मोठी । तेणे पोटीपाठी नारायण ।।३।।

चिंतन :-
वेद आणि पुराणात स्पष्ट वाक्याने सांगितले आहे की सद्‌गुरुशिवाय.
या त्रिभुवनात रक्षण करणारा कोणीही नाही.
ईश्वरापेक्षाही श्रीगुरु श्रेष्ठ आहेत. त्यांचे पाय आधी पूजले पाहिजेत.
आळंदीवल्लभ स्वामीची कृपा येवढी मोठी असते की तीमुळे आत बाहेर पाठीशी भगवान नारायण रक्षण करीत असतात.

१७६

लेकुराचे आसे । माउलीचे चित्त पिसे ।।१।।
तैसा देव भक्तासाठी । धांवतसे पुढे पाठी ।।२।।
असो नसो भाव । उद्धरितो घेता नांव ।।३।।
माझ्या आळंदीजीवना । जन्य-दुःख साहवेना ।।४।।

चिंतन :-
लहान मुलाच्या ओढीने आईचे मन वेड्यासारखे होऊन जाते.
त्याप्रमाणे परमेश्वर भक्ताच्या मागेपुढे राहून त्याचे रक्षण करतो.
प्रेमभाव जरी नसला तरी परमेश्वर हरीनामस्मरण केले असता त्याचा उद्धार करतो.

माझ्या आळंदीश्वराला आपल्या लेकुरांचं दुःख सहन होत नाही, हेच खरे.

१७७

जे जे आम्ही दिली नांवे । ते ते साच केली देवे ।।१।।
ऐसी कनवाळू माउली । नित्य प्रेमे पान्हावली ।।२।।
याचे मवाळू की मन । दासदोषा मानी गुण ।।३।।
माझ्या ज्ञानेश्वराठायी । कोप येथे उणा बाई ।।४।।

चिंतन :-

जशी जशी आम्ही शब्द उच्चारले, त्या त्याप्रमाणे ज्ञानदेवांनी सर्व पदार्थ निर्माण करून समोर आणले.
अशी अत्यंत प्रेमळ कणवा असलेली आमची माउली आहे. ती वेळीअवेळी केव्हाही प्रेमपान्हा पाजायला उत्सुक आहे.
यांचे मन इतके मवाळ आहे की दासाच्या दोषांनाही ती गुणच मानते आणि प्रेम करते.
अशा माझ्या ज्ञानदेवांचे ठिकाणी एकच उणीव आहे अन् ती म्हणजे कोप नाही.

१७८

आवडो की माझ्या मना । प्रिय आळंदीचा राणा ।।१।।
ज्याचे मंगळ हे नांव । मंगळचि गांवी ठाव ।।२।।
सर्व सुखा अधिष्ठान । सद्‌गुरूचेचि चरण ।।३।।
ज्ञानेश्वरा मायबापा । नांवे वारा तिन्ही तापा ।।४।।

चिंतन :-

माझ्या मनाला प्रिय आळंदीराजाच्या ठिकाणी मला आवडी उत्पन्न होवो.
त्याचे नाव हे मंगलकारक आहे.
त्याचे राहण्याचे गाव आळंदी हेही मंगलच आहे.
सद्‌गुरुचे चरण हे सर्वोत्तम सुखाचे अधिष्ठान आहे.
हे ज्ञानेश्वरा मायबापा, तू आपल्या नामस्मरणाने माझे तिन्ही ताप निवारण कर.

१७९

सांपडली वाट । भवन्नामे घडघडाट ।।१।।
साधन मी आन नेणे । योग साध्य झाला येणे ।।२।।
वायु वाणी मन जीव । नामे द्वारकेचा राव ।।३।।

आळंदीवल्लभ । करूणार्णव सुलभ ।।४।।

चिंतन :-

भगवंताच्या नामाचा घोष चालला आहे अशी वाट मला सापडली.

आता मी कोणतेही साधन जाणत नाही. मला सर्व योग वरील वाटेनेच साध्य झाला आहे.

प्राणांच्या श्वासोच्छवासात,

वाणीच्या बोलण्यात,

मनाच्या चांचल्यात आणि

जीवाच्या आन्तर् स्वरूपात,

एक द्वारकेचा राणा श्रीकृष्णच भरला असल्याचा अनुभव नामस्मरणाने येतो.

आळंदीचे स्वामी ज्ञानदेव करुणेचे सागर असल्याने ते अत्यंत सुलभ आहेत.

१८०

सद्‌भावाचे बळ । आठविता एक वेळ ।।१।।
उडी घाली हांकेसवे । सुख दावी नित्य नवे ।।२।।
ऊंच नीच नेणे काही । धांव घाली सर्वां ठायी ।।३।।
स्वामी आळंदीचा राणा । करी अंतरी शहाणा ।।४।।

चिंतन :-

सद्‌भावनेच्या सामर्थ्याने एकवेळ जरी आठवण केली तरी हाक मारल्याबरोबर, श्रीज्ञानेश्वर महाराज आपल्या संकटात क्षण न लागता येतात आणि नित्य नव्या सुखाची प्रतीती आणून देतात.

हांक मारणारा मोठा असो की लहान असो ते सर्वांसाठी धावून येतात.

आणि त्या भक्ताला, अन्तरंगात (योग्य काय अयोग्य काय हे सर्व समजेल असाश शहाणा करून सोडतात.

१८१

व्यष्टिचि हे जाता समष्टीच्या वाटे । तेणे वाक्य थाटे शास्त्रमय ।।१।।
यालागी रक्षावा गुरूसंप्रदाय । श्रुतियुक्ति होय प्रत्ययही ।।२।।
दुग्धाचे ते घृत प्रत्येक मंथनी । टाकिल्या विरजणी करणे लागे ।।३।।
आदिनाथापेक्षा माझा कळवळा । अधिक वेल्हाळा आळंदीशा ।।४।।

चिंतन :-

व्यष्टी (म्हणजे जीव) ही समष्टीच्या वाटेने जाऊ लागली म्हणजे व्यापकतेकडे जीवनाची

वाटचाल सुरू झाली की त्या व्यक्तीचे बोल शास्त्रमय होऊ लागतात.
सत्पुरुषांची वचने हीच वेद होतात, शास्त्रे होतात.
म्हणूनच गुरुसंप्रदायाचे रक्षण करावे. म्हणजे श्रुति-युक्ती-अनुभव हे तिन्ही प्रत्यय येऊ लागतात.
दूध विरजण टाकून मगच त्या विरजलेल्या दह्यातून तूप निघत असते.
तसेच गुरुसंप्रदायाचे रक्षण करून अनुभव घ्यावा लागतो.
भगवान शंकरापेक्षा आळंदीशाला माझा कळवळा अधिक आहे.
हे मी जाणून अहे.

१८२

सुखी राहो स्वामी माझा । सर्व मंगळांचा राजा ।।१।।
ज्याच्या सौख्यलेशे सारे । सुखी ब्रह्मा-हरि-हरे ।।२।।
मंगळ या दाही दिशा । आठविता विश्वाधीशा ।।३।।
सखा आळंदीवल्लभू । वसो अंतरी स्वयंभू ।।४।।

चिंतन :-
सर्व मांगल्याचा स्वामी माझा आळंदीवल्लभ आहे. तो सुखी राहो.
ज्याच्या सुखांच्या एका लेशाने ब्रह्मा, विष्णु, महेश सुखी आहेत, असा तो सुखाचा साठा आहे.
अशा त्या विश्वाच्या सम्राटाला आठविले असता दाही दिशा मंगळ होतात.
माझ्या अन्तरात माझा सखा आळंदीचा स्वामी स्वयंभू होऊन राहो, हीच प्रार्थना!

१८३

करावे सकळ एकाचेचि साठी । मग आटाआटी भय नाही ।।१।।
संसाराच्या मिषे उमटे वैराग्य । सांपडते भाग्य गुरूसेवा ।।२।।
अचळ चंचळ सर्व सेवे सुख । मीपणा प्रमुख अविकारी ।।३।।
आळंदीजीवनु नुपेक्षी सर्वथा । त्याचे म्हणविता जीवेभावे ।।४।।

चिंतन :-
सर्व कर्मांच्या प्रत्येक क्रिया एका भगवंतासाठीच कराव्या म्हणजे मग कितीहि कष्ट पडले तरी भय राहत नाही.
असे केले असता, संसारात असले तरी वैराग्य अंगी बाणते,
तो संसारात गुंतून असलेला जरी वाटत असला तरी तो अलिप्त असतो. आणि त्याचे गुरुसेवेचे भाग्य उदय पावते.

स्थिर बसून ध्यान करा की,
गुरुसेवेत अतिशय चंचल होऊन कामे करा,
आत्मसुखच प्राप्त होते.
इतरांना मीपणा वाटत असला तरी तो शिष्य मनात अत्यंत निर्विकारी असतो.
त्यांचा मी आहे अशी दृढ भावना बाणली की, आळंदीचे नाथ, कधीही उपेक्षा करीत नाहीत.

***



